# आपला भारत ६

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.



REFBK-0019005

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 MAR 1976

9/99/9

[ क्रु. मा. प. ]

आपला भारत : ६

REFBK-0019005

# कामरूप आसाम

राजा
मंगळवेढेकर

नितीन प्रकाशन
पुणे

प्रकाशक
सौ. सुधा वसंत गोगटे
नितीन प्रकाशन
११८२ सदाशिव पेठ
पुणे - ३०

प्रथमावृत्ती
१५ ऑगस्ट १९७३

© राजा मंगळवेढेकर

किंमत
चार रुपये

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे - ३०

**प्रिय भाऊ धर्माधिकारी**

इवल्याशा रोपाला आप्तपणाचा
आधार दिलात.

□ □

भारत देश महान आहे !
या महानतेत विपुल विविधता आहे.
विविध प्रान्त, विविध भाषा,
विविध साहित्य, विविध कला...
घरदार, राहणीमान, खाणेपिणे,
सणसमारंभ, वेषभूषा .
विविधता हे भारताचे वैशिष्ट्य.
आणि या विविधतेतही एकता
हा भारताचा आत्मा !
हेच भारतीयत्व !
आपण सारे भारतीय आहोत.
भारताचा आत्मा जाणून घेऊ या !
भारतीयत्व ओळखू या !
त्यासाठीच हा एक प्रयत्न.

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... दि:
क्रमांक ... नों दि ... २/१०/६३

## भिन्नतेत या अभिन्न

भिन्नतेत या अभिन्न आज गाऊ आरती
लक्ष हस्त, लक्ष पाद, हृदय एक भारती ।
भिन्न वेष, भिन्न भाष, भिन्न धर्मरीती
भिन्न जात, भिन्न पंथ, तरीही एक संस्कृती ॥ १ ॥

भिन्न रंग, भिन्न ढंग, भिन्न भाव आकृती
भिन्न छंद, भिन्न बंध, आगळी कलाकृती ।
भिन्न वाणी, भिन्न गाणी, अर्थ एक वाहती
भिन्न शौर्य, भिन्न धैर्य, घोष एक गर्जती ॥ २ ॥

भिन्न भवन, भिन्न हवन, भिन्न क्षेत्र मानिती
लहर लहर भिन्न तरी, एक गगन-माती ।
भिन्न तार, ताल तरी, एक मधुर झंकृती
कमलपुष्प हासते पाकळ्यांतुनी किती ॥ ३ ॥

राजा मंगळवेढेकर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आगळा आसाम | ... | ९ | साक्षी इतिहास | ... | २१ |
| लोक आणि लोकाचार | ... | ३७ | भाषा आणि साहित्य | ... | ६४ |
| कलाप्रिय आसाम | ... | ८३ | स्थलयात्रा | ... | ९६ |
| अर्वाचीन आसामचे शिल्पकार | | १०२ | विकासोन्मुख आसाम | ... | १०७ |
| असमिया लोकसाहित्य | ... | १११ | संभाषण | ... | ११७ |

आसाम गीत

१२००५

# आगळा आसाम

बाजक डंबा, बाजक शंख,
बाजक मृदंग खोल ।
असम आकौ उन्नति – पथत,
जय आइ असम बोल ॥

— डंका वाजवा, शंख फुंका, मृदुंग आणि खोल पण वाजवा !
आसाम देश पुन्हा उन्नतीच्या मार्गावर चाललेला आहे.
आसाम देशाचा जयजयकार करा !

निळ्या डोंगर-टेकड्यांनी गजबजलेला आणि हिरव्यागार पाचूसारख्या वनश्रीने नटलेला आसाम भारताच्या पूर्वोत्तर उंबरठ्यावर उभा आहे ! उगवत्या सूर्याचे दर्शन भारतात आसामी पहाडांना आधी घडते. उदयाचलावर येणाऱ्या अरुणाची सुवर्ण-माया आसामला कुरवाळते. आसामची उंच– सखल भूमी सूर्योदयाच्या मांगल्यात रोज रामप्रहरात न्हाऊन निघते.

आसाम– म्हणजेच ' अ-सम '– जिथे सम-सारखी भूमी नाही असा प्रदेश. ठायी ठायी उभ्या असलेल्या आणि चोहोबाजूंनी वेढलेल्या डोंगर– दऱ्या– टेकड्यांनी ही भूमी ' असम ' आहे खरीच ! ' असम ' या संस्कृत शब्दाचेच पुढे आसाम हे रूप झाले.

भूमीच्या भौगोलिक रूपावरून जसे हे ' आसाम ' नाव प्रचलित झाले, तसेच तेराव्या शतकात येथे होऊन गेलेल्या ' अहोम ' लोकांच्या राजवटीवरूनही ' आसाम ' हे नाव प्रचारात आले असावे. अहोम हे मूळचे ' शान ' जातीचे. शान शब्दाचा उच्चार ' अशान ', मग ' अशम ' आणि नंतर ' असम ' असा बदलत आला.

फार प्राचीन काळी आसामचे नाव होते– ' कामरूप. '

एक पौराणिक आख्यायिका आहे :

भगवान शिव एकदा ध्यानस्थ बसले होते. ध्यानसमाधीत दंग होते. अशा वेळी शृंगाराचा अधिपती कामदेव याने शिवाच्या ध्यानात व्यत्यय आणला. शिव भगवानांची समाधी मोडली. त्यामुळे ते अस्वस्थ झाले. क्रुद्ध झाले. आणि त्यांनी आपल्या विशाल भाळावरचा तृतीय नेत्र उघडला. त्या नेत्रातून भयंकर ज्वाळा बाहेर पडल्या आणि कामदेवाचे जळून भस्म झाले !

कामदेवाची पत्नी ' रती ' अतिशय दुःखी-कष्टी झाली. शोकविव्हल बनली. रतीने शिवापुढे बसून खडतर तपश्चर्या आरंभिली. रतीच्या तपाने शिव भगवान प्रसन्न झाले. त्यांनी रतीला वर दिला. त्या वराने रतीने आपल्या पतीचे– कामदेवाचे जीवन परत मागितले. भगवान शिव प्रसन्नतेने " तथास्तु ! " म्हणाले.

भस्मातून कामदेव जिवंत होऊन उठला.

ज्या ठिकाणी ही घटना घडली व कामदेवाला त्याचे ' रूप ' जिथे परत मिळाले, त्या परिसराला ' कामरूप ' हे नाव प्राप्त झाले.

आसामी लोकांची मुख्य देवता आहे ' कामाख्या ' देवी. ' कामाकी ' ह्याचा हा अपभ्रंशही असावा, आणि ह्या देवतेवरून आजूबाजूच्या प्रदेशाला ' कामरूप ' असे संबोधले गेले असावे.

कामरूपाचा उल्लेख महाभारत, कालिकापुराण आणि योगिनीतंत्र ह्या प्राचीन ग्रंथांमधून आढळतो. महाभारतात या प्रदेशाचे वर्णन म्लेंच्छ किंवा असुर-अनार्य लोकांचा देश असे केलेले आहे. कालिदासाच्या ' रघुवंश ' नामक काव्यातही कामरूपाचा उल्लेख, ' कामरूपाधिपतीने रघुराजाला हत्तींचा नजराणा दिला ' अशा शब्दात आहे. यावरून प्राचीन काळापासूनच आसामची भूमी हत्तींच्या वास्तव्याबद्दल प्रसिद्ध होती असे दिसते.

कौटिल्याच्या ' अर्थशास्त्रा ' त आणि कल्हणाच्या ' राजतरंगिणी ' नामक ग्रंथातही कामरूपाचा उल्लेख सापडतो.

सुमारे दीड हजार वर्षांपूर्वी कामरूप देशात ब्रह्मपुत्रा नदीचे खोरे, पूर्व बंगाल आणि भूतानची उत्तुंग पर्वतराजी यांचा समावेश होत असे.

इ. स. ६४० मध्ये चिनी यात्रेकरू ह्युएनत्संग हा भारतामध्ये आला होता.

त्याने कामरूपलाही भेट दिली होती. कामरूपच्या राजगादीवर त्या वेळी कुमार भास्करवर्मा हा राजा होता. कनौजच्या हर्षवर्धनाचा हा समकालीन होता. ह्युएन-त्संगने आपल्या प्रवासवृत्तात लिहिले आहे, 'कामरूप देशाचा विस्तार सुमारे १०,००० ली (अंदाजे २,९०० किलोमीटर) आहे. राजधानी पाच मैलाच्या परिघात वसलेली आहे. भूमी सखल, परंतु पिकाऊ आणि नियमितपणे लागवडी-खाली आणली जाते.


कामरूपच्या राजधानीचे तत्कालीन नाव होते 'प्राग्ज्योतिषपूर'— म्हणजे 'पूर्वेकडील प्रकाश' त्याच ठिकाणी आजच्या आसामची राजधानी 'गोहाटी' हे शहर उभे आहे. ब्रह्मपुत्रेच्या काठावर असलेल्या या शहराला आसा-मचे प्रवेशद्वार मानतात.

नरकासुर नावाच्या अनार्य राजाने प्राग्ज्योतिषपूर ही नगरी वसवली व आपली राजधानी तेथे स्थापन केली. या नरकासुराची कहाणी अशी सांगतात :

फार प्राचीन काळची कथा. भगवान् विष्णू यांच्या पासून धरतीमातेला एक मुलगा झाला. तो प्रवृत्तीने असुरांसारखा होता. मिथिलेचा राजा जनक याला हा मुलगा माणसाच्या घाणीमध्ये पडलेला आढळला. त्यामुळे याचे नाव 'नर-क' अथवा नरक पडले. कात्यायनी नावाच्या स्त्रीने सोळा वर्षांचा होईपर्यंत याचे पालन पोषण केले. हा मोठा बलवान व तामसी प्रकृतीचा झाला. एके दिवशी हा गंगाकिनारी गेला होता. त्या वेळी भगवान विष्णूंनी प्रकट होऊन याला त्याचे जन्म-रहस्य सांगितले.

किरत वंशातील राजा घटक याच्याशी याने युद्ध केले व त्याचे राज्य हिरा-वून घेतले. विदर्भाची राजकुमारी माया हिच्याशी याने विवाह केला. प्राग्ज्योतिष-पुरची स्थापना करून मिथिलेहून विद्वान, ब्राह्मण आणि अनेक प्रकारचे कला-कार तिथे आणले. ज्या मूळच्या स्थानिक लोकांनी त्याला विरोध केला होता, त्यांना याने आपल्या नव्याने स्थापन केलेल्या राज्याच्या पश्चिमेकडील करतोया नामक नदीच्या पार हाकलून लावले. अशा रीतीने नरक राजा बनला.

राजा बनल्यानंतर आपला दरारा व वचक सर्वत्र वाढविण्यासाठी नरका-सुराने शोणितपुरचा राजा बाणासुर याच्याशी मैत्री केली आणि सर्वत्र धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. नाना तऱ्हेने तो लोकांना छळू लागला. त्याच्या असुर-वृत्तीने एवढा ताळतंत्र सोडला की एकदा वसिष्ठ ऋषी कामाख्या देवीच्या दर्शनासाठी



आसामी जंगलातील हत्ती

याच्या राज्यातून चालले असता याने त्यांना बंदी केली. वसिष्ठांना आपल्या राज्यात पाऊल टाकू दिले नाही. वसिष्ठांना राग आला आणि त्यांनी, 'जोवर नरकासुर जिवंत आहे तोवर कामाख्या देवी अदृश्य राहील' असा शाप दिला.

परंतु नरकासुरावर याचाही काही परिणाम झाला नाही व त्याचे अत्याचार चालूच राहिले. त्याने देवलोकातील स्वर्गाचे राज्य जिंकले. तिथून वरुणाचे छत्र आणि अमितीची कर्णफुले घेऊन तो आला.

नरकासुराच्या दुष्कृत्याने कहर केला तशी त्याचे पारिपत्य भगवान श्रीकृष्णाला करावे लागले. श्रीकृष्णाने आपले सुदर्शनचक्र सोडले आणि नरकासुराचा वध केला. नंतर प्राग्ज्योतिषपूरच्या गादीवर नरकासुराचा पुत्र भगदत्त यास बसवले.

याच भगदत्ताने, राजसूय यज्ञाच्या वेळी अर्जुन विजययात्रा करीत या प्रदेशात आला असताना त्याच्याशीं युद्ध केले. परंतु सामोपचाराने ते मिटले आणि अर्जुन व भगदत्त यांचे सख्य झाले.

भारतीय युद्धच्या वेळी मात्र भगदत्त दुर्योधनाचा कैवारी बनून कौरवपक्षाला मिळाला. त्या वेळी त्याची गजसेना बरोबर होती. या वेळी भगदत्त बराच वृद्ध झाला होता. त्याची गात्रे आणि स्नायू शिथिल झाले होते. डोळ्यांच्या वरच्या पापण्याही त्याला रोखून धरता येत नव्हत्या. मांसल, जड पापण्यांनी त्याचे डोळे झाकले जात असत. म्हणून त्यावर तो रेशमी वस्त्राची पट्टी बांधून ठेवत असे. युद्धाचे वेळी अर्जुनानेच भगदत्ताचा वध केला.

अशी ही प्राचीन आसामची भूमी भारताच्या ईशान्य सीमेवर आहे.

आसामचे क्षेत्रफळ १,२१,९०३ चौरस किलोमीटर आहे. याच्या उत्तरेस ईशान्य सरहद्द विभाग–‘ North East Frontier Agency ’—( N. E. F. A. ) ‘ नेफा ’ चा काही भाग आहे. पूर्वेस नागभूमी, मणिपूरचा शेजार आहे. दक्षिणेला त्रिपुरा व बांगला देशाची सोबत आहे, तर पश्चिमेला पश्चिम बंगाल आणि बांगला देश आहे.

स्वाभाविक रचनेच्या दृष्टीने आसामचे दोन भाग पडतात.

( १ ) पूर्व आणि दक्षिणेकडील डोंगराळ प्रदेश. या भागात मुख्यतः दक्षिणेकडील गारो, खाशी, जयंतिया व उत्तर काचार ह्या डोंगरटेकड्या येतात. ह्या सर्व डोंगररांगा पूर्व-पश्चिम पसरलेल्या आहेत. या प्रदेशात राहणाऱ्या जमातींच्या नावावरून या डोंगरांना ही नावे मिळालेली आहेत. या भागातील सर्वांत उंच शिखर खाशी पर्वतावरील शिलाँग हे असून त्याची उंची ६४५० फूट आहे. या खाशी पर्वतावरच जगातील सर्वांत जास्त पाऊस पडणारी चेरापुंजी व मानसीनराम ही ठिकाणे याच पर्वताच्या दक्षिण उतारावर आहेत. चेरापुंजी येथे वर्षाला सरासरी ६०० इंच पाऊस पडतो, तर मानसीनराम येथे सरासरी ८२५ इंच पाऊस पडतो. मानसीनराम हेच आता जगातील सर्वांत जास्त पाऊस पडतो असे ठिकाण मानले जाते. पूर्वी चेरापुंजी मानले जात असे. या विपुल पर्जन्यवृष्टीमुळे येथे सततच आभाळात मेघ गर्दी करून असतात. त्यामुळेच या भागाला ‘ मेघालय ’ असे म्हणतात.

याच विभागात पत्कोई, नाग, लुशाई व चिन हे पर्वत आहेत. हे सर्व उत्तर-दक्षिण पसरलेले आहेत. भारत-ब्रह्मदेश या दोन देशांना हेच पर्वत विभागून

अलग करतात. यातील सर्वोच्च ' जाप्या ' हे शिखर १०,०००० फूट उंचीचे आहे. या डोंगराळ भागात राहणाऱ्या नाग जमातीच्या लोकांमुळे एका पर्वतास ' नाग ' असे नाव पडले आहे.

( २ ) ब्रह्मपुत्रेचे खोरे— दोन्ही बाजूंना डोंगराच्या रांगा असलेली ही एक चिंचोळी अशी ५०० मैल लांबीची व ५० मैल रुंदीची दरी आहे. हिच्या मध्यभागातून ब्रह्मपुत्रा वाहते.

ब्रह्मपुत्रा हीच आसामची प्रमुख प्राणदायिनी आहे. ईजिप्तला जशी नाईल तशी आसामला लाभलेली ब्रह्मपुत्रा ही मोठी देणगी आहे. आसामचा इतिहास, आसामची संस्कृती आणि आसामची सुधारणा ब्रह्मपुत्रेच्या काठीच निर्माण झाली. ' ब्रह्मपुत्रा ' म्हणजे ' ब्रह्माचा पुत्र '. म्हणूनच याला महानद असे म्हणतात. आसामी लोक हिला आदराने ' बाबा ब्रह्मपुत्र ' म्हणतात. ब्रह्मपुत्रेचा उगम मानसरोवराजवळ हिमालयात होतो. तिथून ती ' त्सांग-पो ' नावाने पूर्वेकडे तिबेटमधून वाहते. नंतर ती दक्षिणेकडे हिमालयाचा कणा फोडून वळते आणि नेफा विभागातील पालीघाट या प्रदेशात उतरते. पालीघाटच्या दक्षिणेकडे सुमारे बत्तीस किलोमीटर अंतरावर, सदियाच्या पश्चिमेला ती लोहित नदीला भेटते. दिबाँग, सुबनसिरी, दिसाँग, धनश्री, बूढी दिरिंग, भरली, बरनदी, कोलांग या आणखी नद्या ब्रह्मपुत्रेला मिळतात. ब्रह्मपुत्रेचे पात्र विशाल असून पावसाळ्यात तर सागराचेच स्वरूप प्राप्त होते. ब्रह्मपुत्रेच्या प्रवाहाला वेगवान गती आहे. दरवर्षी वर्षाकाळात हिच्या महापुरामुळे आसामला बरीच झळ पोचते. काठच्या दिब्रुगड शहराला तर सतत धोका असतो.

ब्रह्मपुत्रा हा बुलुमबुथुर नामक बडो शब्दाचे संस्कृत रूप आहे असे मानतात. बुलुमबुथुर याचा अर्थ आहे ' बुलबुलांची नदी '. अहोम भाषेत हिला ' नाम—दाओ—फी ' असे म्हणतात. याचा अर्थ आहे— ' तारकदेवाची नदी '. संस्कृत ग्रंथांमधून हिलाच - लोहित म्हटले आहे. पौराणिक काळात ब्रह्मपुत्रालाच लोहित असे जुने नाव होते. महर्षी परशुरामांनी आपली माता रेणुका हिचा वध केल्यावर तिच्या रक्ताचे आपल्या परशुवरील डाग या लोहित नदीच्या पाण्याने धुऊन, पश्चात्तापदग्ध बनून स्नान केले होते, अशी आख्यायिका आहे; व या आख्यायिकेनुसार लोहित नदीचे पाणी लाल झालेले आहे म्हणतात.

ब्रह्मपुत्राच्या प्रवाहात दोन बेटे आहेत. एक गोहाटीजवळ असून त्यावर

प्रसिद्ध उमानंद मंदिर आहे. दुसरे आहे शिवसागर जिल्ह्यात माजुळी नावाचे. सुबनसिरी आणि ब्रह्मपुत्राच्या संगमस्थानीच हे बेट आहे. याचे क्षेत्रफळ ४८५ चौरस मैल असून बेटावरील लोकसंख्या ५९,००० आहे. जगातील हे सर्वांत मोठे नदी-द्वीप मानले जाते. माजुलि बेटावर वैष्णवांची अनेक महाविद्यालये असून त्यात दक्षिणपाठ, गडमूर, आउनी आटी व कमला बारी ही प्रमुख आहेत. वैष्णवांचे हे तीर्थस्थान म्हणूनच विख्यात आहे.

आसाममध्ये मोसमी हवामान आहे. सखल भागात जानेवारी महिन्यात सरासरी किमान तपमान ११° सें. व जुलै महिन्यात सरासरी कमाल तपमान २५° सें. असते. या काळात इतर ठिकाणी सरासरी तपमान २३° सें, ते २६° सें. असते.

वसंत ऋतूमध्ये विजा चमकतात व मोठ्या सोसाट्याची वादळे होतात. जून ते सप्टेंबर या काळात तेथे सर्वांत जास्त पाऊस पडतो. साधारणपणे वार्षिक पाऊसमान ७५ इंच इतके असते. अर्थात खाशी व जयंतिया डोंगराच्या दक्षिण उतारावरील चेरापुंजी व मानसीनराम आणि अन्य-काही ठिकाणी अपरंपार पाऊस पडतो. आसामची हवा वर्षभर तशी दमटच असते. मात्र सप्टेंबरमधील दमटपणा मार्चच्या मानाने बराच अधिक असतो. हिवाळ्यात तर पर्वतमाथ्यांवर हिमवृष्टीच होत असते.


आसामची भूमी डोंगराळ आणि मैदानी अशी दोन प्रकारची आहे. मैदानी भागाची भूमी प्राचीन व नवीन गाळाची बनलेली आहे. ही वाळूयुक्त गाळाची ‘ लोम ’ भूमी आहे. पण त्यात चिकणमातीची ‘ क्ले ’ भूमीही आहे.

डोंगरावरील जमिनीमध्ये प्राणिज पदार्थ अधिक आहेत. वाळूयुक्त गाळाच्या भूमीपासून चिकणमातीपर्यंत क्रमाक्रमाने या जमिनीचा पोत बदलत जातो. सखल आणि डोंगराळ जमिनीत नैट्रोजन आणि फॉस्फरस बऱ्याच प्रमाणात आहे; पण त्यामानाने पोटॅशियमचे प्रमाण मात्र कमी आहे. आसाम-दरीच्या काही भागात वाळूची मोठमोठाली मैदाने आहेत. पावसाळ्यात ती सारी पाण्याखाली बुडून जातात; व त्यामुळे त्यांच्यावर थोडासा गाळाचा थर पसरला जातो.

आसामात वारंवार भूकंपही होतो. कारण जमिनीचे स्तर नवीन व अस्थिर आहेत.

आसामच्या एकूण भूमीच्या एकतृतीयांशाहून अधिक, म्हणजे १७,५५३

चौरस मैल एवढ्या भागात जंगले आहेत. त्यातील ६,३६८ चौरस मैलांचे जंगल संरक्षित आहे. ह्या आसामी जंगलांतून सदाहरित व पानझडी असे दोन्ही प्रकारचे



आसामी गेंडा

वृक्ष आढळतात. जंगलाच्या तळभागी खैर, शिशवी, साल, साग, कळक, वेत इत्यादी झाडे विपुल आहेत. सालवृक्षाचे लाकूड मूल्यवान असते. लाख, रबर व मसाल्याचे पदार्थ ही या जंगलातील मुख्य संपत्ती आहे.

आसामच्या जंगलात विविध प्रकारचे व विपुल प्राणी आहेत. असे म्हणतात की, आफ्रिकेचा जंगली प्रदेश सोडल्यास इतके वैविध्यपूर्ण व विपुल प्राणी पृथ्वीच्या पाठीवर आसामशिवाय अन्यत्र नाहीत. आसामच्या जंगलातील हत्ती व गेंडे फार विख्यात आहेत. त्याशिवाय बलाढ्य व खुनशी म्हणून प्रसिद्ध असलेले गवे व रानरेडे हे भयंकर प्राणीही येथे आहेत. वाघ, चित्ते, बिबळे, अस्वल, चितळ, सांबर, हे प्राणीही पुष्कळ आहेत.

या प्राण्यांप्रमाणेच विविध तऱ्हेच्या पक्ष्यांनीही आसाम गजबजलेला आहे. त्यात अन्यत्र सहसा न आढळणारी पिंगट चोचीची बदके, फ्लोरिकेन मोर आणि धनेश हे पक्षीगण वेधक आहेत. अनेक जातींचे सर्प व विशेषतः नाग येथे खूपच आहेत. या सर्व वैपुल्यामुळे शिकारी लोकांचे हे प्रदेश म्हणजे क्रीडास्थान बनले

आहे. परंतु दुर्मिळ जातीच्या पशु-पक्ष्यांच्या संरक्षणासाठी शासनाने अलिकडे काझिरंगा, मानस, सोनाईरूपा व पभा ही चार अभयारण्ये काढली आहेत.

शेती हाच आसामी लोकांचा प्रमुख व्यवसाय असून भात, मोहरी, जवस, ऊस, बटाटे, कडधान्ये, मका, बाजरी, नाचणी, गहू, मिरची ही येथील पिके आहेत. ब्रह्मपुत्रेच्या काठी नारळी-पोफळीच्या बागाच बागा आहेत. नारळ सुपारीचे पीक पुष्कळ निघते. परंतु आसामला पैसा देणारी मुख्य पिके आहेत— चहा, ज्यूट, तंबाखू व कापूस.

आसाम राज्यात चहाचे उत्पादन महत्त्वाचे आहे. सुमारे हजारावर चहाचे मळे असून ते मुख्यतः शिवसागर, लखीमपूर व काचार भागात आहेत. चहाचे खालोखाल महत्त्वाचे पीक म्हणजे ज्यूट-ताग. या दोन्हींनाही मागणी वाढती असल्या-मुळे चहा व तागाच्या लागवडीखालील जमीन दिवसेन्‌दिवस वाढत आहे.

केळी, अननस, संत्री व इतर फळे, भाजीपाला यांची लागवड बरीच होते. सिलीगुडी भागात संत्र्याच्या बागा विपुल आहेत.

गाई, म्हशी, घोडे, तट्टे, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या व बदके आदी पाळण्याचा उद्योगही मोठा आहे.

आसामची भूमी खनिजसंपन्न आहे. दगडी कोळसा व पेट्रोल यांचे मोठाले साठे आहेत. माकुम व नाजिरा येथे कोळशाच्या खाणी असून शिवसागर व लखीमपूर जिल्ह्यातील दिग्बोई, नाहरकोटिया व मोरान या ठिकाणी तेलाच्या खाणी आहेत. याशिवाय लोखंड, कोरंडम्, इमारती दगड, चिनीमाती, सोने, चुनखडी, सैंधव व सिलिमेनाइट इत्यादी खनिजे येथे मिळतात.

भारतातील इतर राज्यांशी तुलना करता आसाममध्ये मोठे उद्योगधंदे फारच कमी आहेत. चहाच्या कारखानदारीशिवाय, खाणीतील तेलाचे शुद्धीकरण करणे, दगडी कोळसा वर काढणे, हेच काय ते मोठे उद्योगधंदे. याशिवाय रेशमी कापड विणणे, लाकूड कापणे, भात सडणे इत्यादींच्या गिरण्या व चुनखडीच्या भट्ट्या, नौका बांधणे इत्यादी उद्योगही चालतात.

आसामची जडणघडण एकसारखी बदलत आलेली आहे. इ. स. १८२६ मध्ये ब्रह्मी युद्धाच्या अखेरीस आसाम ब्रिटिशांच्या संरक्षणाखाली गेला. पुढे १८३२ साली काचारचा प्रदेश त्याला जोडण्यात आला. १८३५ मध्ये जयंतिया टेकड्या ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यात समाविष्ट झाल्या. १८३९ साली आसामचा उत्तर

भाग बंगाल प्रांताला जोडण्यात आला. १८७४ मध्ये बंगाल प्रांतापासून आसाम स्वतंत्र करून तो एका चीफ कमिशनरचा प्रांत बनविण्यात आला.

१९०५ मध्ये कर्झनने बंगालची जी फाळणी केली त्या वेळी पूर्व बंगाल-मधील काही जिल्ह्यांबरोबर आसाम विभाग जोडण्यात येऊन तो एक लेफ्टनंट गव्हर्नरचा प्रांत करण्यात आला. पुन्हा १९१२ मध्ये वंगभंग रद्द झाल्यावर आसामला चीफ कमिशनरचा विभाग हा दर्जा मिळाला.

१९२१ मध्ये मात्र आसामला प्रांताचा दर्जा लाभला व त्यासाठी गव्हर्नरची स्वतंत्र नेमणूक झाली.

१९४७ साली स्वातंत्र्याबरोबरच भारताची फाळणी झाली. भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे अस्तित्वात आली. त्या वेळी आसाममधील सिल्हेट जिल्ह्यातील बहुसंख्य मुस्लिम भाग पूर्व पाकिस्तानात सामील करण्यात आला.

आसामच्या उत्तर कामरूपमधील देवनागरी हा भाग १९५१ मध्ये भूतान-मध्ये समाविष्ट करण्यास भारत सरकारने मान्यता दिली व तो भाग भूतानकडे गेला. ‘ नेफा ’ नावाने ओळखला जाणारा हा भाग आजवर आसामच्या राज्यपालाच्या अखत्यारीतील म्हणजे केंद्रशासित विभाग होय.

जुन्या आसाम राज्यातून ‘ नागभूमी ’ म्हणून ओळखला जाणारा प्रदेश १९६३ सालीच स्वतंत्र झाला. एक स्वायत्त राज्य म्हणून तो आता अस्तित्वात आहे. त्यानंतर गारो, खासी आणि जयंतिया टेकड्यांचा डोंगराळ प्रदेशही १९७० साली ‘ मेघालय ’ या नावाने स्वायत्त राज्य म्हणून अस्तित्वात आला. ‘ मणिपूर ’ आणि ‘ त्रिपुरा ’ ह्या इतके दिवस केंद्रशासित असणाऱ्या प्रदेशांनाही आता स्वतंत्र राज्याचा दर्जा लाभलेला आहे. आणि ‘ नेफा ’ व ‘ मिझो ’ नावाने ओळखला जाणारा आसामचा डोंगरी भाग अनुक्रमे ‘ अरुणाचल ’ व ‘ मिझोरम ’ ह्या नावाने केंद्रशासित प्रदेश म्हणून २० जानेवारी १९७२ रोजी भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी उद्घाटित केले. या एकाच दिवशी इंदिराजींनी त्रिपुरा, मणिपूर, मेघालय ही तीन स्वतंत्र स्वायत्त राज्ये व अरुणाचल व मिझोरम हे दोन केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आणून भारताच्या पूर्वोत्तर सीमेवर शासकीय व्यवस्था व विकास ह्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असा इतिहास घडविला आहे, व नव्या इतिहासाच्या घडणीला रस्ता मोकळा करून दिलेला आहे. त्याच संदर्भात, ह्या प्रदेशाचे वेगळेपण साकार होत असतानाच इंदिराजींनी North Eastern

Zonal Council पूर्व-उत्तर विभागाची एक संघटना असावी अशी सूचना केली होती. म्हणजे त्यायोगे या सर्व लहान लहान घटक राज्यांना एकत्र येऊन आपल्या प्रश्नांचा सामूहिकरीतीने विचार करता येईल असा त्यात हेतू होता. कारण राजकीयदृष्ट्या जरी हे विभाग स्वतंत्र झाले तरी त्यांच्यामधील भौगोलिक व सांस्कृतिक समानता लक्षात घेऊन त्यांचा विकास एका विशिष्ट पद्धतीने व सत्वर व्हावा, आणि तो साधत असताना त्यांचे आपआपसात सख्य रहावे, सहकार्य नांदावे, सर्वांच्या कल्याणासाठी सर्वांनी भावनात्मक ऐक्याची जपणूक करावी हीच इच्छा व कल्पना अभिप्रेत आहे. या संघटनेत नागभूमी व आसाम या राज्यांचाही सामावेश होता. परंतु या कल्पनेला अद्याप मूर्त स्वरूप आलेले नाही.

पूर्वीच्या अकरा जिल्ह्याच्या आसाममधून खासी–जयंतिया टेकड्यांचा जिल्हा अरुणाचलमध्ये व 'मिझो' जिल्हा मिझोरममध्ये समाविष्ट झाल्यामुळे ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यापुरताच आजचा आसाम उरलेला आहे.

आसामची लोकसंख्या आता सुमारे १,४६,००००० आहे आणि राज्यात पुढील ९ जिल्हे आहेत.

| | |
|---|---|
| (१) काचार | (२) दारांग |
| (३) गोलपारा | (४) कामरूप |
| (५) लखिमपूर | (६) नॉगाँग |
| (७) शिवसागर | (८) मिकिर टेकड्या |

(९) उत्तर काचार टेकड्या

आसामच्या लोकसंख्येत बहुसंख्य–सुमारे ६७ टक्के हिंदू असून त्या खालो खाल मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, शीख आणि इतर स्थानीय वन्यधर्मीय जमातीचे लोक आहेत.

एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेले फक्त एकच–गोहाटी–नावाचे शहर आसाम राज्यात असून त्याची लोकसंख्या १,२२,९८१ इतकी आहे. पाच हजार ते एक लाख वस्ती असलेली लहान–मोठी गावे आसाममध्ये ७५ आहेत आणि कमी लोकसंख्येची २५,७०२ खेडी आहेत.

साक्षरतेचे प्रमाण २८ टक्के असून असामिया ही राज्याची मुख्य भाषा आहे. ५७ टक्के लोक असामिया बोलतात. १७ टक्के लोक बंगाली बोलतात, आणि

बोडो २%, खाशी ३%, मिझो १-८% आणि मिकिर १-३% अशा स्थानीय भाषा बोलणारे गिरिजन-आदिवासी वगैरे लोक आहेत. अरुणाचल, मिझोरम या नव-केंद्रित शासित प्रदेशाची राज्यभाषा तर इंग्रजी आहे.

निसर्गलावण्याने नटलेली आणि विविधतेने बहरलेली अशी आसामची आगळी भूमी आहे. भारताच्या नकाशात पर्वतांच्या घरट्यात एखाद्या पक्ष्याप्रमाणे आसाम दिसतो. या पक्ष्याकडे अखिल भारताचे अकस्मात लक्ष वेधले ते १९६२ साली चीनने केलेल्या आक्रमणापासून. भारताच्या पूर्व सीमेवरील राखणदार म्हणून या प्रदेशाला फारच महत्त्व आहे.

□ □

# साक्षी इतिहास

आसामला बराच प्राचीन इतिहास आहे. महाभारतात 'कामरूप' नावाने आसामचा आणि तत्कालीन नरकासुर, भगदत्त, बाणासुर आदि राजांचाही उल्लेख आहे.
षोणितपूर– म्हणजे आजचे तेजपूर, येथील राजा बाण याची लावण्यसुंदर कन्या उषा हिचा विवाह श्रीकृष्णाचा नातू अनिरुद्ध याच्याशी झाला होता. उषा-अनिरुद्ध प्रणयाची कथा पौराणिक आहे.

**रुक्मिणीचे माहेर**

श्रीकृष्णाची आवडती पट्टराणी रुक्मिणी ही देखील कामरूपमधील कुंदील–आजचे सदिया येथील राजा भीष्मक याची कन्या होती. म्हणजे तत्कालीन आसाम ही श्रीकृष्णाची सासुरवाडी.
कामरूपाचे राजे मोठे शूर, पराक्रमी व सुसंस्कृत होते. त्यांनी विद्येला आणि ब्राह्मणांना सदैव उदार आश्रय दिला. त्यामुळे त्या प्रदेशात हिंदू धर्माचा प्रसार होण्यास बरीच मदत झाली. हिंदू धर्मातील तांत्रिक पंथाची स्थापनाही प्रागज्योतिषपूर येथे झाली असे मानतात.

**वर्मा वंश**

ह्यूएनत्संग या चिनी प्रवाशाच्या वृत्तावरून इ. स. ६४० च्या सुमारास भगदत्ताचा वंशज कुमार भास्करवर्मा हा कामरूप प्रदेशावर राज्य करीत होता असे आढळते. भास्करवर्मा हा हर्षाचा समकालीन होता. याच्या कारकीर्दीपासून आसामचा इतिहास थोडा स्पष्टपणे मिळतो.

भास्करवर्मा हा शैव मताचा पुरस्कर्ता होता आणि तो स्वतःला वराहविष्णूचा वंशज मानत होता. भास्करवर्मा हा शूर व कर्तबगार राजा होता. त्याच्या दिग्विजयाची प्रशंसा निधापूर येथील एका ताम्रपटात पुढीलप्रमाणे रेखलेली आहे–

" ज्याप्रमाणे सूर्याचे (भास्कर) प्रतिबिंब जलपूर्ण अशा अनेक पात्रात एकाच वेळी समान रीतीने दिसते, त्याप्रमाणे भास्करवर्मा राजाच्या पराक्रमामुळे त्याची मूर्ती प्रत्येक मांडलिकाच्या अंतरंगात प्रतिष्ठित झाली आहे. "

भास्करवर्मा हा जसा शूर, तसाच विद्या व कलांचा भोक्ताही होता. त्याच्या कारकीर्दीत बरीच ग्रंथनिर्मिती झाली असावी. त्याने कनोजच्या सम्राट हर्ष-वर्धनाला अनेक सुंदर ग्रंथ भेट म्हणून दिल्याची माहिती उपलब्ध आहे. त्या ग्रंथात सुभाषितांचाही एक संग्रह होता.

**पाल वंश**

सुमारे दोन शतकांनी वर्मा वंशाचे राज्य नष्ट झाल्यावर कामरूपच्या मूळ रहिवाशांच्या हातात राज्यसत्ता गेली. पण पुढे प्रलंभ नामक राजाने तिचा नाश करून आपली सत्ता स्थापली. याचे घराणे शिवपूजक होते. हारूपेश्वर हे जरी त्याच्या राजधानीचे ठिकाण होते तरी त्याचे वंशज स्वतःला प्राग्ज्योतिषपूरचे राजे म्हणवून घेत. अकराव्या शतकात पाल वंशाच्या राजांची कामरूपवर सत्ता आली. या वंशाचा संस्थापक ब्रह्मपाल म्हणून होता. पाल राजे हिंदु बडों पैकी होते. त्यांना हिंदु संस्कृतीचा अभिमान होता आणि संस्कृत पठणाची फार आवड होती.

या राजांनी आपली राजधानी तेजपूरजवळ दुर्जय नावाच्या ठिकाणी नेली होती. राजधानी दुर्जय ही जलमार्गे व्यापारधंद्याचे मोठे केंद्र बनली होती.

पालवंशातील तिसरा राजा रत्नपाल हा मोठा पराक्रमी होता. याच्यासंबंधी एका ताम्रपटात रेखले आहे—

" यशामध्ये अर्जुनासारखा, क्रोधात कृतान्तासारखा, शत्रूंना वडवाग्नी सारखा, आकाशात चंद्रासारखा आणि उच्च-कुलीन लोकांमध्ये वाटिकेतील चम्पक-पुष्पासारखा होता. पृथ्वी देवालयांनी व आकाश यज्ञधूमाने याने आच्छादून टाकले. "

दुसऱ्या एका ताम्रपटावर रत्नपाल राजाची राजधानी दुर्जय या नगरीबद्दल लिहिलेले आहे—

" चक्र पक्ष्याच्या संरक्षणासाठी ज्याप्रमाणे भरभक्कम पिंजरा बनवला जातो, त्याप्रमाणे दुर्जय नगरीची तटबंदी आहे. तिच्यामुळे गुर्जरनृपाची आक्रमणे विफल ठरली, गौडनृपांच्या जंगली हत्तींना ज्वरबाधा झाली, केरळाधिपती दात-ओठ खात

परतला आणि दाक्षिणाधिपती ती पाहूनच उद्विग्न झाला. ”

दुर्जय नगरीबद्दल जसे हे वर्णन आहे तसेच दुर्जयवासीय जनतेबद्दलही ताम्रपटात म्हटले आहे—

“ त्यांच्या कंठातील रत्नहारांची चमक कमी होऊ शकते, परंतु त्यांच्या बुद्धीचे तेज निस्तेज नाही होत. त्यांच्या मुद्रेवर अनिश्चततेचा भाव आढळेल, पण त्यांचे मन सदा स्थिर असते. त्यांच्या भृकुटीत चंचलपणा दिसेल, पण त्यांचा शब्द पक्का असतो. त्यांची संपत्ती नष्ट होऊ शकते, पण त्यांची मानवता अबाधित असते. ”

पालवंशात हर्जावर्धन नावाचा मोठा विद्वान व चतुर राजा होऊन गेला. त्याच्यासंबंधीची माहिती असलेला शिलालेख ब्रह्मपुत्रेच्या तटी आढळतो. अकराव्या शतकात झालेल्या इंद्रपाल राजाने साहित्य व धर्म प्रसाराच्या दृष्टीने बरेच प्रयत्न केले. बाराव्या शतकात पालवंश नष्ट झाला.

अशा प्रकारचे सातव्या ते बाराव्या शतकाचे दरम्यानचे जे ताम्रपट व शिलालेख उपलब्ध झालेले आहेत, त्यांवरून तत्कालीन आसाममध्ये होऊन गेलेल्या काही राजांची माहिती मिळते.

**काचार**

बीडो व काचार वंशीय राजांचीही आसाम प्रदेशावर कुठे, कुठे सत्ता होती. हे राजे उच्च अभिरुचीचे होते. त्यामुळे त्यांच्या काळात कला व संस्कृतीचा विकास झाला आणि आसामच्या संस्कृतीवर त्यांचा प्रभाव चिरस्थायी झाला. काचार लोक मोठे बलशाली व कडव्या वृत्तीचे आहेत. आसामच्या सखल भागात त्यांची वस्ती आहे; काही डोंगरी भागातही आहेत. ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात राहणारे कचारी स्वतःला ‘ बीडो ’ अथवा ‘बीडोफिसा’— म्हणजे ‘ बीडोपुत्र ’ असे म्हणवून घेतात. दक्षिण कचारच्या पहाडातील काचार स्वतःला ‘ दिमाछा ’— म्हणजे ‘ महानदी-पुत्र ’ असे म्हणवून घेतात.

काचार राजांनी अहोम राजांच्यापूर्वी धानसिरी खोऱ्यात राज्य केले होते. चुटिया, लालुंग आणि मोरान या जातींच्या संमिश्रणातून काचार ही एक नवीन जात निर्माण झाली व ती काचार विभागात वसली.

एकेकाळी काचार लोकांचे राज्य आसाम आणि उत्तर-पूर्व बंगालपर्यंत पसरलेले होते. पौराणिक ग्रंथांमधून ज्या म्लेंच्छ लोकांचा उल्लेख येतो ते म्लेंच्छ

म्हणजे हे काचार होत. काचार राजवटीचा लिखित इतिहास उपलब्ध नाही, परंतु पुढे झालेल्या अहोम राजांनी ज्या ‘ बुरूंजी ’— म्हणजे गद्य बखरी लिहवून घेतल्या, त्यांवरून काचार राज्यांचा काही बोध होतो.

आसामच्या मध्यभागातील दीमापूर ही काचार यांची राजधानी होती. दीमापूर येथे उपलब्ध असलेल्या भग्नावशेषांवरून त्यांच्या उन्नत गृहरचनेची व इतर कलाकौशल्याची कल्पना करता येते. काचारांनी दगड आणि विटांचा उपयोग घरबांधणीसाठी केलेला होता. दीमापूर नगराची तटबंदी पक्क्या विटांची बांधलेली होती, तसेच नगरीचे सुबक कमानदार प्रवेशद्वार विटांचेच केलेले होते. त्यातील खिडक्या देखील निरनिराळ्या आकृत्यांच्या साच्यातून काढलेल्या विटांच्याच होत्या. महालाच्या भिंतीवर हत्ती, हरिण, बदक, बकरी, मोर इत्यादी चित्रकलाही होती. अहोम राजांनी १५३६ मध्ये दीमापूर नगराची मोडतोड केली, त्यानंतर पुढे बंगालमधील काळापहाड नावाच्या एका मुस्लीम सरदाराने हल्ला करून या शहराचा, मंदिरांचा आणि मूर्तींचा विध्वंस करून टाकला.

**कोच**

काही काळ आसामवर कोच जातीच्या राजांचेही साम्राज्य होते. कोच लोकांना पुराणात आणि तंत्र ग्रंथांत ‘ कवच ’ असे म्हटले आहे. कोचांची चेहेरेपट्टी मंगोल लोकांसारखी होती. काही मानवशास्त्रवेत्ते यांना द्रविड मानतात. अशी दोन मते असण्याचे कारणही असे आहे की कोच लोकांचा वर्ण सावळा आहे. परंतु त्यांची नयनाकृती मात्र मंगोल लोकांसारखी आहे. गोलपारा जिल्ह्यातील कोच लोक स्वतःला ‘ राजवंशी ’ मानतात.

इ. स. १५१५ सालात बिश्वसिंग हा कोच राजा आसामवर राज्य करीत होता. त्याच्या पश्चात त्याचा पुत्र नरनारायण हा गादीवर आला. याने आपले राज्य बरेच विस्तृत केले. सोनारगावच्या सरदार इसाखानाने नरनारायणावर हल्ला केला व त्याचा पराभव केला. नरनारायणानंतर त्याचा पुत्र लक्ष्मीनारायण हा राजा झाला. रघुराजाचा पुत्र परीक्षित याच्याशी त्याचे वैर उत्पन्न झाले. त्यामुळे लक्ष्मीनारायणने मुसलमानांची मदत घेतली. मुसलमानांनी हल्ला करून परिक्षिताला कैद केले.

लक्ष्मीनारायणाचा भाऊ बळिनारायण हा प्रतापसिंग या अहोमराजाकडे पळून गेला. प्रतापसिंगाने मुसलमानांचा पराभव केला व बळीराजाला परत त्याचे

राज्य मिळवून दिले. परंतु इ. स. १६३७ साली मुसलमानांनी पुन्हा स्वारी करून बळी राजाला ठार केले व अहोम लोकांनाही कामरूपाच्या बाहेर घालवून दिले.



अहोम राजमुद्रा

पुढे प्राणनारायण या कोच राजाने मुसलमान सत्ता झुगारून दिली, परंतु पुढे त्यालाच अहोम राजांनी पदच्युत केले.

**खेन वंश**

आसामचा दक्षिण भाग व बंगालजवळचा प्रदेश या भागावर पंधराव्या शतकात खेन नावाचे राजघराणे राज्य करीत होते. नीलांबर हा या घराण्यातील तिसरा राजा होता. बंगालच्या हुसेनशहा या मुसलमान राजाने १४९८ साली पराभव केला व त्याची कामतापूर ही राजधानी जिंकली.

**चुटिया**

चुटिया नावाच्या जमातीनेही आसाममध्ये राज्य केले आहे. चुटियांनी सदिया अथवा विदर्भ विभागात राज्य स्थापना केली होती. अहोमांच्या आक्रमणाला थोपवण्याचा यांनी प्रयत्न केला, परंतु तो यशस्वी झाला नाही. अहोमांना रस्ता देणे यांना भाग पडले. अहोम येथेच स्थायिक झाल्यावर पुढे दोन्ही जमातींमध्ये आप्तभाव निर्माण होऊन विवाहसंबंध व सामाजिक आदान–प्रदानही होऊ लागले.

**अहोम**

तेराव्या शतकाच्या प्रारंभ काळात ब्रह्मदेशाच्या पलीकडून अहोम जातीच्या लोकांनी आसामवर आक्रमण केले. ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातून हे लोक आले.

चुखांफा नावाच्या त्यातील ब्रह्मी राजकुमाराने हे आक्रमण केले होते. त्याच्याबरोबर हत्ती, घोडेस्वार व लढवय्येही होते. रस्त्यात स्थानिक लोकांशी त्याला लढा द्यावा लागला, पण चुखांफा विजयी झाला आणि पुढे घुसून त्याने 'चारायदेव' नावाच्या डोंगरावर आपली राजधानी वसवली.

अहोम–चुखांफा राजकुमार हा शान वंशीय होता. ह्याने राज्यस्थापना केल्यावर आपल्या ब्रह्मी भाषेचा प्रचार करण्यास सुरुवात केली; परंतु त्यांची संख्या अत्यंत अल्प असल्यामुळे त्यांनी लवकरच तो प्रयत्न सोडून दिला आणि स्थानिक असामिया भाषेचा राज्यभाषा म्हणून स्वीकार केला. काही दिवसाच्या वास्तव्यानंतर त्यांना असे अनुभवाला आले की त्या भूमीलाच आपली मानणे भाग आहे, तेव्हा त्यांनी आपला धर्मही बदलून टाकला आणि ते वैष्णवमताचे अनुयायी बनले. अहोम आसामी बनल्यामुळे भारतीय देखील झाले.

हळूहळू अहोमांनी आपला राज्यविस्तार वाढविण्यास सुरुवात केली. चुटिया लोकांनी सदिया येथे राजधानी स्थापन करून एक मोठे राज्य स्थापन केले होते, पण अहोमांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा पाडाव केला आणि ते राज्य आपल्या साम्राज्यात सामील करून टाकले. इतकेच नव्हे तर चुहुमुं नावाच्या एका अहोम राजाने सदियामधील प्रमुख आणि वजनदार चुटिया कुटुंबांना सक्तीने तेथून हलविले आणि मध्य व उत्तर आसामात पिटाळले. त्यांच्या जागी अहोमवंशी परिवारांना आणून ठेवले. अशारीतीने त्यांनी आपल्या राज्याची संरक्षण व्यवस्था दृढ केली व बंडाची शक्यताच नष्ट करून टाकली.

चुहुमुं राजाच्या कारकीर्दीतच अनेक प्रकारचे उपयुक्त असे उद्योगधंदे सुरू झाले. दारूवर चालणाऱ्या बंदूक आदी हत्यारांचा वापर प्रथमच होऊ लागला. काचार लोकांचे राज्य जिंकून त्यांनाही अहोमांनी दक्षिण काचार व मिकिर पहाडात पिटाळून लावले. काचार यांनी त्यानंतर खासपूर येथे आपली राजधानी स्थापन केली होती.

अहोमवंशात 'चुक्लेन–मुं' नावाचा प्रसिद्ध राजा होऊन गेला. त्याला 'गडगंजा' राजा या नावानेही ओळखत. कारण याने दिखौ नदीच्या काठी

गडगांव येथे राजधानी स्थापन केली होती.

या वंशात पुढे झालेल्या एका राजाने आपले नावही जयध्वजसिंह असे शुद्ध भारतीय ठेवले. अहोम तसे पूर्ण भारतीय व आसामी वैष्णव बनलेलेच होते.

जयध्वजसिंहाच्या कारकीर्दीतच मीरजुमला याने आसामवर हल्ला केला आणि गडगांवपर्यंत मुलुख जिंकीत तो येऊन भिडला, परंतु तेवढ्यातच पावसाळ्याला सुरुवात झाली आणि मीरजुमलाला युद्ध करणे आसामच्या भयंकर पावसात अशक्य होऊन बसले. मीरजुमला अशा प्रकारे पावसात अडकलेला पाहून अहोमांनी त्यावर अचानक प्रतिहल्ला चढवला आणि मीरजुमलाचा प्रचंड पराभव केला. शेवटी मीरजुमलाला अहोमांशी तह करावा लागला.

अशा प्रकारे भारतात जवळ जवळ सर्वत्र मोंगली सत्ता नांदत असताना आसाम प्रदेश तेवढा स्वतंत्र राहिलेला होता. आणि हेच शल्य औरंगजेब बादशहाला टोचत होते. त्याने राजस्थानातील अम्बरचा वीर राजा रामसिंह याला आसामवर सैन्य देऊन धाडले, पण सेनापती लचित बरफूकन याने मोठ्या शर्थीने रामसिंहाला मध्येच अडवून त्याच्या सेनेला ब्रह्मपुत्रादेखील ओलांडू दिली नाही. रामसिंह पराभूत होऊन परत गेला.

लाचिन बरफूकन हा आसामचा मोठा शूर वीर पुरुष होता. त्याच्या शौर्याची व धैर्याची तुलना महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराज व राजस्थानातील मेवाडच्या महाराणा प्रतापसिंहाशीच केली जाते !

**सती जयमती**

सत्तेच्या मोहाने राजकारणाचा प्रवाह काही स्वार्थी लोक गढूळ करीत असतात. कट करीत असतात. त्यातून मग वध, कैद, युद्ध असले अनीतिकारक प्रकार घडत असतात. राज्यात उलथापालथ होते. अशांतीही माजते.

अहोमांच्या राजवटीतही सोळाव्या शतकात अशी घटना घडली आहे.

त्या काळी लालूकसोला बरफूकन नावाचा एक महत्त्वाकांक्षी, शूर, पण स्वार्थी सेनापती होता. त्याने सत्तालोभाने त्यावेळचा आसामचा प्रधान अतन बडागुहाँय याचा कपटाने वध केला आणि स्वतः प्रधान बनला.

प्रधान बनल्यावर त्याने आपल्या पाच वर्षाच्या मुलीचे लग्न चौदा वर्षाच्या कुमार चोलिकफा याच्याशी लावून दिले आणि आपल्या या जावयाला राजगादीवर बसवले.

पण एवढ्याने लालूकसोलाची सत्तातृष्णा शमली नाही. त्याने आणखी अमानुष कृत्य केले. अहोम राजवंशातील जेवढे बाल, कुमार, तरुण असतील त्या सर्वांचा अंगविच्छेद करून टाकला. कुणाचा हात तोडला, तर कुणाचा पाय कापला. कुणाच्या पाठीवर शस्त्राने खोल वार करून ठेवला, तर कोणाच्या चेहेऱ्यावर जखमांचे वळ पाडले. असे करण्यात त्याचा हेतू असा होता की जावयाचे सिंहासन मजबूत व्हावे. कारण त्याकाळी अहोम राजवंशात असा एक अलिखित संकेत होता की, शारीरिक व्यंग, व्रण किंवा खूण असलेला कुणीही राजकुमार राजगादीवर बसण्यास अपात्र ठरला जाई.

लालूकची ही क्रूर कारवाई पाहून जयमती अस्वस्थ झाली. जयमती ही राजवंशातील गदापाणी नावाच्या एका कर्तबगार राजकुमाराची धैर्यवान पत्नी होती. तिच्या मनी असा विचार आला की, लालूकने अशा प्रकारे सर्वच्या सर्व राजकुमारांचा अंगविच्छेद जर केला तर राजघराण्याचा निर्वंश होऊन जाईल ! राज्याला कोणी रक्षणकर्ता उरणार नाही !

जयमतीने आपल्या पतीला— गदापाणीला गुप्त वेषाने लगोलग लांब नागा पहाडात धाडून दिले. लालूकच्या क्रौर्यापासून त्याला वाचवले.

परंतु गदापाणी हा एकच राजकुमार अव्यंग हातचा सुटला यामुळे लालूकही खवळून गेला. त्याची दुष्ट बुद्धी आणखीनच विपरीत झाली. त्याने जयमतीला राजदरबारात खेचून आणले. गदापाणीचा ठावठिकाणा विचारला. पण जयमतीने तो सांगितला नाही. लालूकने जयमतीला नाना तऱ्हेने छळले, तिच्यावर जुलूम अत्याचार केले, पण त्या शूर स्त्रीने मुखावाटे शब्दही काढला नाही.

लालूकने आपले सैनिक सर्वत्र पाठवून गदापाणीचा शोध घेतला. पण गदापाणी हाती लागला नाही. लालूकचे सगळे कारस्थानच यामुळे विफल होणार होते; म्हणून त्याने काहीही करून गदापाणीला शोधून काढण्याचे ठरवलेच होते. त्यासाठी जयमतीला नंतर त्याने जंगलात नेऊन तिचा अमानुष छळ करण्यास सैनिकांना सांगितले.

सैनिकांनी जयमतीला जंगलात नेले. तिचा तेथे भयंकर छळ आरंभला. पण त्या वीर स्त्रीने शब्दही उच्चारला नाही.

जयमतीच्या अमानुष छळाची वार्ता नागा पहाडात दडलेल्या गदापाणीच्या कानी गेल्यावर त्याचे अंतःकरण पत्नीप्रेमाने द्रवले. तो एके दिवशी वन्य नागाच्या

वेषात लपत छपत जयमती होती त्या जंगलात आला.

जयमतीचा छळ रोज चालूच होता. तो पाहून गदापाणी एकदम ओरडून म्हणाला, "हे स्त्रिये, तू कशासाठी इतक्या हालअपेष्टा भोगतेस? तुझ्या पतीचा ठावठिकाणा झटकन सांगून टाक आणि या छळातून मुक्त हो!"

जयमतीने पतीचा परिचित आवाज ओळखला. ती भयाने दचकून गेली. ज्याच्यासाठी एवढे कष्ट घेतले, हाल भोगले तो आता विनासायास शत्रूच्या हाती पडणार की काय, या काळजीने ती हादरली. पण तेवढ्यातही हिंमत एकवटून ती खंबीरपणाने म्हणाली,

"भल्या गृहस्था, ह्या गोष्टी माझ्यासमोर काढू नकोस. माझ्या पतीसाठी, व माझ्या देशासाठी माझा प्राण गेला तरी बेहत्तर. तू तुझ्या वाटेने जा. चालता हो इथून!"

गदापाणीने आपल्या पत्नीचा दृढनिश्चय पाहिला. तिचे मन बदलणे शक्य नाही हे ओळखले आणि तो निमूटपणे परत निघून गेला.

सती जयमती हालाने, छळाने शेवटी मृत्युमुखी पडली.

गदापाणी परत गेला तो सैन्याच्या जमवाजमवीच्या उद्योगाला लागला. त्याने लवकरच बरेच मोठे सैन्य उभारले. नंतर बरफूकनची मदत घेतली आणि लाकूकवर हल्ला केला. या हल्ल्यात लाकूक व त्याचा जावई चूलिफका या दोघांचाही गदापाणीने बळी घेतला.

नंतर गदापाणीने गदाधरसिंह हे नाव धारण केले व तो राजा बनला.

सती जयमतीचे मनोरथ पूर्ण झाले. तिने भोगलेल्या दुःखाचे सार्थक झाले.

राज्यावर येताच गदाधरसिंहाने जयमतीचा छळ करणाऱ्यांना वधस्तंभावर चढवले. राज्यात सर्वत्र स्थिरस्थावर केले.


गदाधरसिंहाने पुढे सुमारे पंधरा वर्षे राज्य केले.

**रुद्रसिंह**

त्याच्या पश्चात त्याचा ज्येष्ठ पुत्र रुद्रसिंह हा गादीवर आला. रुद्रसिंह हा अति पराक्रमी राजा होता. 'पूर्वेकडील शिवाजी' असे त्याचे वर्णन करतात.

रुद्रसिंहाने आपल्या मातेच्या स्मरणार्थ तिच्या मृत्युस्थळी शिवसागर येथे एक विशाल, सुंदर तलाव बांधला; तोच 'जयसागर' नावाने प्रसिद्ध आहे.

तलावाच्या काठावर ' जयमंदिर ' देखील बांधले आहे ! तेथेच शिवमंदिरही आहे.



शिवसागर येथील शिवमंदिर

सती जयमती ही आसामची स्फूर्तिदेवता आहे. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन तिने स्वराज्याचे रक्षण केले ! तिचा त्याग, तिने भोगलेले कष्ट, दुःख याच्या संस्मरणाने आसामी माणसाचे मस्तक कृतज्ञभावाने लवते !

सती जयमतीच्या दिव्य बलिदानामुळे अहोम राज्याला अभयदान मिळाल्यासारखेच झाले. रुद्रसिंह ह्या अत्यंत बुद्धिमान, चतुर व शूर राजाने राज्याची विस्कटलेली घडी पुनः नीट बसवली व आपले राज्यही दूरवर वाढवले. आपल्या राज्याच्या सीमेवरील हिंदू राजांशी त्याने मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. त्याच्या कारकीर्दीत बाहेरच्या शत्रूचे आक्रमण त्याने होऊ दिले नाही, एवढेच नव्हे तर बंगालमधूनही मोगली सत्ता हुसकावून लावण्याची एक मोठी योजना रुद्रसिंहाने बनवली होती, परंतु त्याच्या अकाली मृत्यूमुळे ती तडीस गेली नाही. या योजनेत त्याने त्रिपुराचा राजा रत्नमाणिक्य याचेही साहाय्य मिळविले होते.

रुद्रसिंह जसा शूर, मुत्सद्दी होता तसाच रसिक व कवीही होता. विष्णू, शिव, दुर्गा आदि देवदेवतांची अनेक सुंदर मंदिरे त्याने राज्यात बांधली.

**परकी हस्तक्षेप**

रुद्रसिंहाच्या माघारी त्याचा पुत्र शिवसिंह हा गादीवर आला. आजवरचे अहोम राजे वैष्णवपंथी होते, पण शिवासिंहाची पत्नी फूलेश्वरी ही शाक्तपंथी होती. त्यामुळे तिने आपला पती शिवासिंह राजालाही या वैष्णवपंथाचा त्याग करावयास लावला. ती वैष्णवांची द्वेष्टी होती. त्यामुळे एका राजकीय समारंभाच्या प्रसंगी वैष्णव महंतांचाही तिने राजाकडून अपमान केला. या अपमानामुळे राज्यातील वैष्णवपंथी लोक चिडले. त्यांनी एकत्र येऊन राजाविरुद्ध बंडाचे निशाण उभारले. शिवासिंहला कैद करून ठेवले.

इ. स. १७८६ मध्ये आसाममध्ये मोआमारिया जातीच्या लोकांनी बंड केले. त्या वेळी गौरीनाथसिंह हा अहोम राजा गादीवर होता. बंडाचा बीमोड करण्यासाठी गौरीनाथसिंहाने इंग्रजांची मदत मागितली. आसामच्या राज्यकारभारात परकीयांची मदत घेऊन, त्यांना हस्तक्षेप करण्यास संधी देणारा हाच पहिला राजा होय. त्या वेळी ईस्ट इंडिया कंपनीने बंगाल आणि अन्यत्र आपले हातपाय पसरले होते. व्यापाराबरोबरच सत्तेचे राजकारण खेळायला कंपनीने केव्हाच सुरुवात केली होती. एकेक प्रदेश भल्याबुऱ्या मार्गाने गिळंकृत करण्याचा सपाटा धूर्त इंग्रजांनी चालू ठेवला होता.

गौरीनाथसिंहाने याचना करताच कंपनीने संधी साधली आणि कॅप्टन वेल्स नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली इंग्रजी फौज आसाममध्ये आली. वेल्सने बंडखोरांचा पाडाव केला आणि गौरीनाथसिंहाला आपला बाहुला बनवून परत गादीवर बसवून राज्यात स्थिरस्थावरता व शांतता प्रस्थापित केली.

परंतु ही शांतता फार काळ टिकली नाहीं. वेल्स परत फिरल्यावर आसाममध्ये पुन्हा बंडाचे निशाण रोवले गेले. तंटे-बखेडे माजले. अहोम राजवट या अंतर्गत लाथाळीमुळे व वैमनस्यामुळे पार निकृष्ट व खिळखिळी होऊन गेली.

गौरीनाथसिंहाच्या पश्चात चंद्रकांत नामक राजा गादीवर आला. चंद्रकांत अल्पवयीन असल्यामुळे राज्याचा कारभार पूर्णानंद बरगोहाई नामक त्याचा मुख्य प्रधान पहात असे. परंतु सत्तालोभामुळे पूर्णानंद व दुसरा एक अधिकारी बदन बरफूकन या दोघांमध्ये बेबनाव सुरू झाला. वैर माजले. पूर्णानंद बरगोहाई हा

बदनला कैद करून त्याला आपल्या मार्गातून दूर करण्याच्या तयारीत असतानाच बदन बरफुकनला ह्या कटाचा सुगावा लागला व तो ईस्ट इंडिया कंपनीकडे मदतीसाठी कलकत्त्याला धावला. परंतु कंपनीच्या इंग्रज गव्हर्नराने त्या वेळी आसामच्या अंतर्गत गोष्टीत हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

बदन निराश होऊन चालला असता कलकत्त्यामध्येच त्याचीं व एका ब्रह्मी राजदूताची गाठ पडली. चर्चा झाली. बदन त्याच्याबरोबर ब्रह्मदेशालाही गेला.

ब्रह्मदेशाची राणी हेमो हिच्याशी बदनची गाठ-भेट झाली. हेमो आणि बदन यांचे नातेसंबंधही होते. हेमोराणीने हे लक्षात घेऊन बदनला मदतीचे आश्वासन दिले व चार हजार ब्रह्मी फौज घेऊन पटकई खोऱ्यामधून बदन आसाममध्ये आला.

ब्रह्मी फौजेच्या हल्ल्याचा प्रतिकार आसामी सेनेने केला. पण तिचा पराभव झाला व चंद्रकांत राजा जीव वाचवून गोहाटीला पळून गेला. युद्धात पूर्णानंद प्रधानाला ठार मारण्यात आले. त्यानंतर बदनने गोहाटीवरही हल्ला केला. ते शहर जिंकले व चंद्रकांत राजाला परत आसामच्या गादीवर बसवले.

परंतु बदनचाच कोणी एका आसामी सैनिकाने वध केला. बदनच्या वधाची वार्ता हेमोराणीला कळताच तिने मोठी ब्रह्मी सेना या अत्याचाराचा बदला घेण्यास आसाममध्ये धाडली.

ब्रह्मी सेनेने आसामात येऊन अमानुष दंगल केली. गावेच्या गावे जाळून टाकली. प्रचंड प्रमाणावर लोकांची कत्तल केली. लुटालूट, मारझोड, धाकदपटशा इत्यादी गैरप्रकारांना सुमारच राहिला नाही. आसाम ब्रह्मदेशाच्या अंकित झाला.

त्यानंतर एक वर्षाने पुन्हा ब्रह्मी सैनिकांची धाड आसामवर आली. त्या वेळी आणखी मोठ्या प्रमाणावर लोकांची कत्तल करण्यात आली. या हल्ल्यामुळे ब्रह्मी सैनिकांनाही राज्यलोभ आवरता आला नाही. त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यातील मुलुखावरही हल्ले चढवायला सुरुवात केली. त्याचा प्रतिकार करण्यासाठी इंग्रज अधिकारी कॅप्टन कॅम्पबेल १८२४ मध्ये सैन्य घेऊन गेला आणि त्याने ब्रह्मी सेनेचा पराभव करून तिला आसामच्या हद्दीबाहेर हुसकावून लावले.

पुढे २६ जानेवारी १८२६ रोजी यान्डाबी शहरात ईस्ट इंडिया कंपनी व ब्रह्मी-सरकार यांच्यामध्ये तह झाला. त्या तहान्वये कंपनीला बरीच मोठी रक्कम व आसाम, आराकान आणि टनास्सरिम विभागही ब्रह्मदेशाला द्यावा लागला.

अशा प्रकारे आसामवर इंग्रजांचे आधिराज्य सुरू झाले.

**ब्रिटिश अंमल**

ब्रिटिशांची सत्ता आसामवर सुरू झाल्यावर स्वातंत्र्य संपादनाचे काही अयशस्वी प्रयत्न झाले. त्यातील पहिला प्रयत्न होता गोमधर याने केलेला. चंद्रकांत राजाच्या नंतर अहोमवंशातील गोमधर कोंवर हा राजगादीचा वारस होता. त्याने काही अहोमवंशी सरदारांना व नेत्यांना एकत्र आणून इंग्रजांच्याविरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु ही योजना साकार होण्याच्या आतच इंग्रजांना याचा सुगावा लागला आणि गोमधरला पकडून, राष्ट्रद्रोही ठरवून इंग्रजांनी त्याला फाशी दिला.

काही ठिकाणी आसामच्या जनतेने व सरदारांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड पुकारले होते. त्याचा प्रतिध्वनी आसामच्या डोंगरी भागातही निनादत होता. यू तिरोतसिंग ह्या खाशी डोंगरी राज्याच्या प्रमुख देशभक्ताने काही ब्रिटिशांना ठारही केले.

त्यानंतरचा प्रयत्न केला पियली बरफूकन याने. हा बदन बरफूकन याचा पुत्र. आपल्या पित्याच्या देहद्रोहीपणाचा कलंक धुऊन टाकण्यासाठी पियलीने सैन्य उभे केले आणि शिवसागर येथील इंग्रजांच्या छावणीवर हल्ला चढवला. इंग्रजांच्या दारूगोळ्याच्या साठ्याला याने आग लावून दिली. तो भस्मसात करून टाकला. परंतु तरीही इंग्रजांची शक्ती मोठी होती, त्यामुळे पियलीचे काही चालले नाही. त्याला पराभव पत्करावा लागला. इंग्रजांनी पियली बरफूकन व त्याचा साथीदार जीऊराम दुआलिया बरुआ ह्यांना पकडले आणि १८३० साली शिवसागर येथे फासावर चढवले.

यानंतरचा प्रयत्न १८५० साली केला तो मनीराम बरभंडार बरुआ नावाच्या एका दिवाणाने. हा आधी इंग्रजांच्या बाजूला होता; पण नंतर फिरला. कंडपेश्वर सिन्हा नावाच्या आपल्या धन्याला उत्तर आसामचा राजा बनवण्याची त्याची धडपड होती. यासाठी तो कलकत्याला ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्याकडे वाटाघाटी करण्यास गेला होता. परंतु त्यात त्याला जेव्हा यश मिळाले नाही तेव्हा त्याने उठावाची तयारी चालवली. १८५७ च्या उठावात भाग घेणाऱ्या दिल्लीच्या शिपायांशी व सुलतानाशी त्याने संबंध प्रस्थापित केले होते. याच संदर्भात त्याने जोरहाटमधील आपल्या साथीदारांना काही पत्रे धाडली. हे इंग्रजांना कळले व त्यावरून त्यांनी मनीराम दिवानला कलकत्त्यातच अटक केली आणि जोरहाट येथे

आणले. तेथे त्याच्यावर राज्यद्रोहाचा खटला भरला आणि १८५८ मध्ये मनीराम व त्याचा साथीदार महेशचंद्र बरुआ या दोघांना फाशी देण्यात आले. याच खटल्यात बहादुर गांवबरा व फरमूदअली या दोघांना जन्म ठेपेची शिक्षा देऊन अंदमानला धाडले.

मनीराम दिवाण ह्याच्या देशभक्तीने आसामची जनता भारावून केली. त्याने त्या वेळी स्वातंत्र्याची ज्योत आसामी माणसांच्या अंतःकरणात आपल्या बलिदानाने तेवत ठेवली. मनीरामच्या लोकप्रियतेमुळे त्या काळी त्याच्या प्रशंसापर लोकांनी गीतेही रचली होती. एक गीत असे होते—

रूपर् धुँआ खुवात् खालि ओ ऽ अी मनीराम
सोनर् धुँआ खुबात् खालि ओ ऽ अी मनीराम
रजार् घरत द्रोह आचरिले
डिंगीत सीपे जोरी लोली—
मनीरामक् मारिले आस कापुड तोरिले
उपरात् उरी गोल सीला—
मनिरामर् कामेकाज करिब्रो लागिब्रो
आजि हाते हाति मिला !

— मनीराम दिवाण श्रीमंत घराण्यातील होता. तो चांदी-सोन्याच्या पत्र्यातून विडी पिऊन धूर सोडू शकत असे. त्याने राजाच्या दरबारात द्रोह सुरू केला आणि त्यामुळे त्याची मुसकी बांधून त्याला फाशी देण्यात आले. त्याला जेव्हा फासावर चढविण्यात आले तेव्हा आकाशातील सर्व पक्षी उडून गेले. मनीरामचे अपुरे काम आपण पुरे केले पाहिजे.— चला, आजच हातात हात घालू या !

अशा प्रकारे मनीरामच्या बलिदानाने आसामच्या लोकांना स्वातंत्र्याची प्रेरणा व स्फूर्ती लाभली. 'ही भूमी आहे वीर लच्छितांची, आणि भूमी मनि-देवनची' अशा आशयाचेही एक गीत असून त्यात आसामच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या किती तरी वीर पुरुषांची व स्त्रियांची शौर्यगाथा गायलेली आहे !

**स्वातंत्र्यलढा**

आसामी जनतेने व देशभक्तांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध वेळोवेळी असे उठाव केले होते, तरी ते त्या प्रदेशापुरतेच मर्यादित होते. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनंतर

या प्रयत्नाला आखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. १८८५ साली मुंबईत झालेल्या पहिल्या काँग्रेसच्या अधिवेशनाला आसाम प्रदेशातून प्रतिनिधी उपस्थित राहिलेला होता.

परंतु आसामची जनता स्वातंत्र्यलढ्यात मोठ्या प्रमाणावर सामील झाली ती १९२१ सालच्या गांधीजींच्या असहकाराच्या चळवळीपासून. भारतातील अन्य प्रदेशाप्रमाणेच आसामनेही महात्मा गांधींचे चैतन्यदायी नेतृत्व स्वीकारले.

१९२१ साली महात्मा गांधींनी मौलाना महम्मद अली व शौकत अली यांच्याबरोबर आसामला प्रथम भेट दिली होती. त्याच वेळी गोहाटी शहरात विलायती कपड्यांची होळी पेटवण्यात आली होती. असहकाराच्या गांधीजींच्या चळवळीत शेकडो आसामी लोकांनी भाग घेतला आणि तुरुंगवासही भोगला.

१९२६ सालचे काँग्रेसचे अधिवेशन तर आसाममध्ये गोहाटी येथेच भरले होते. श्रीनिवास आयंगार हे त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. गोहाटी काँग्रेसने साऱ्या आसामभर एक चैतन्य सळसळले. गावोगाव काँग्रेसचा संदेश पोचला.

स्वामी श्रद्धानंदांचा एका मुस्लीमाने वध केल्याची दुःखद वार्ता गोहाटी काँग्रेसच्या वेळीच येऊन धडकली होती. सभेवर दुःखाची छाया पसरली, पण स्वामीजींच्या बलिदानाने असंख्य मने देशभक्तीने पेटूनही उठली !

नंतर १९३० व ३२ सालच्या चळवळीतही आसाममधून पुष्कळशा सत्याग्रहींनी भाग घेऊन कारावास पत्करला.

१९३५ च्या सुधारणा कायद्यान्वये देशभर निवडणुका झाल्या व बऱ्याचशा प्रांतात काँग्रेसला बहुमत मिळाले. १९३७ साली काँग्रेस मंत्रिमंडळे अस्तित्वात आली. आसाममध्येही काँग्रेसचे मंत्रिमंडळ मुख्य प्रधान गोपीनाथ बार्डोलाय यांच्या नेतृत्वाखाली अधिकारावर आले. परंतु १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर इंग्रजांनी हिंदुस्थानच्या जनतेला किंवा राष्ट्रीय नेत्यांना न विचारताच हिंदुस्तानला युद्धात गोवून टाकले. या घटनेचा निषेध म्हणून भारतातील विविध प्रदेशातील काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. आसाममध्येही तसेच घडले.

१९४० सालच्या गांधीजींच्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या आंदोलनातही आसामने भाग घेतला.

१९४२ सालच्या ' चले जाव ' आंदोलनात तर आसामनेही इतिहास घडवला. शेकडो स्त्री-पुरुष तुरुंगात गेले. इंग्रज सरकारच्या दडपशाहीला न

जुमानता अनेकांनी धाडसाची महाकृत्ये करून आपली उत्कट देशभक्ती प्रकट केली.

कमलगिरी या तरुणाने आजारी असताही सत्याग्रह केला. तुरुंगातच त्याचा देहान्त झाला.

कुशलकुंवर या तरुणाने भूमिगत राहून ब्रिटिश सत्ता खिळखिळी करण्याचा प्रयत्न केला. त्याला पकडल्यावर फाशी देण्यात आले.

दरंग जिल्ह्यातील भोगेश्वरी फुकन व कनकलता ह्या दोन तेजस्वी महिलांच्या वीर कृत्याने देश स्तंभित झाला. पोलीस ठाण्यावर कॉंग्रेसचा झेंडा फडकवण्यासाठी वृद्ध भोगेश्वरी व सोळा वर्षांची कनकलता बरुआ ह्या पोलिसांच्या गोळीला बळी पडल्या.

सर्वश्री तरुणराम फूकन, नवीनचंद्र बार्डोलाय, डॉ. हरेकृष्णदास व त्यांची कन्या अमलप्रभा दास, गोपीनाथ बार्डोलाय, अमियाबाबू व त्यांच्या पत्नी पुष्पलता दास, बुद्धेश्वरी हझारिका आदी किती तरी स्त्री-पुरुषांनी स्वातंत्र्यासाठी कारावास, देहदंड भोगला आहे व आसामची स्वतंत्र अस्मिता प्रकट केली आहे !

भारताचे स्वातंत्र्य उंबरठ्यावर आले त्या वेळी सत्ता सोडून जाताना इंग्रजांनी आसामला बंगालचा एक भाग बनवून ' क ' दर्जाचे राज्य ठरवण्याचा घाट घातला होता. परंतु श्री. गोपीनाथ बार्डोलाय यांनी झगडून याला विरोध केला. गांधीजींनीही त्यांचे म्हणणे उचलून धरले. आसाम स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात आला, परंतु बहुसंख्य मुस्लिमांचा सिल्हेट जिल्हा मात्र त्या वेळी पाकिस्तानात गेला. आता तो भाग १९७२ नंतर बांगला देशामध्ये आहे.

१९६२ साली चीनने व पुढे पाकिस्तानने भारतावर आक्रमणे केली; त्या वेळीही आसामने सर्वस्व देऊन आपली देशप्रीती व स्वातंत्र्यनिष्ठा प्रकट केली आहे !

□ □

# लोक आणि लोकाचार

आसामचे नाव काढताच जादू– टोण्याचा प्रदेश असे पटकन मनात येते. तेथील काही प्रचलित धर्मपंथ व आदिवासी जमातीत रूढ असलेल्या चालीरीती यांनी या समजुतीला बळ पुरवलेले आहे. त्याचप्रमाणे काही आख्यायिकाही आहेत.

एक आख्यायिका अशी सांगतात की, काश्मीरचा राजा ललितादित्य म्हणून होता. त्याने एकदा कामरूपावर हल्ला केला. परंतु कामरूपाच्या प्रदेशात येताच येथील जादूने त्यांच्यावर आपला प्रभाव पाडला आणि त्यांचे धैर्य गळाले, शौर्य पळाले. ते हतवीर्यसे बनले. वाघासारखे शत्रूवर तुटून पडणारे हे वीर शेळी—मेंढीसारखे मळूल आणि गरीब गायींसारखे निरुपद्रवी होऊन गेले. आपले कर्तव्य विसरले. ब्रीदापासून घसरले. शस्त्रें टाकली. पण अशी जादू काय घडली? तर सांगतात की कामरूपामधल्या सुंदरींच्या सौंदर्याला ते भुलले !

तांत्रिक शाक्त पंथाची स्थापना प्राग्ज्योतिषपूर येथे झाली. हिंदुकल्पना व आसाम-मधील वन्य गिरिजनांचे जारण–मारणाचे आचार यांच्या संयोगातून शाक्त पंथाची निर्मिती झाली असावी असे तज्ज्ञांचे मत आहे.

तांत्रिक शाक्तपंथ हा हिंदुधर्मातील एक फार प्राचीन पंथ असल्यामुळे कामरूपाचे राजे व उच्चवर्णीय लोक हिंदु होते हे त्यावरून स्पष्ट होते. परंतु कामरूप प्रदेशाची बहुसंख्य प्रजा हिंदू नव्हती. हिंदुधर्म ब्रह्मपुत्रा व सुरमा नद्यांच्या खोऱ्यांपुरता मर्यादित होता. पहाडी प्रदेशात राहणाऱ्या रानटी टोळ्यांमध्ये त्याचा मागमूसही नव्हता. नंतर त्यांनी हिंदुधर्म स्वीकारला. परंतु तरीसुद्धा आजही बरेच लोक हिंदू-धर्मीय नाहीत.

आसाममधील शाक्त लोकांच्या आचारांपैकी देवीला बळी देणे हा प्रमुख आचार होता. चूरिया राजे कालीमातेचे भक्त होते आणि ते कालीची निरनिराळ्या स्वरूपात पूजा करीत. शक्तीची पूजा ही प्रकृती पूजा आहे.हेच शाक्तधर्म पंथाचे आणि

तांत्रिक विद्येचेही मूळ सूत्र आहे, असे म्हटले जाते. तंत्रवाद हा रक्त व बलिप्रधान आहे. नरबळीची प्रथा होती. आणि जो चांगला धष्टपुष्ट, निरोगी, तगडा आहे अशाच माणसाचा बळी दिला जाई. प्राचीन आसाममध्ये काही लोकांना देवीला बळी देण्यासाठीच उपयुक्त असे मानले जात असे. त्यांना ' भोगी ' म्हटले जाई. बळी देण्यासाठी निवडल्यावर त्या माणसाला कशाचाही भोग घेण्याची मुक्त मुभा असे. मग उत्सवाचे वेळी विधिपूर्वक त्याचा देवीपुढे बळी दिला जाई.


आसाममधल्या आदिवासी जमातीत जादू– टोण्याचा प्रकार फार चालत असे. गर्भवती स्त्रीच्या उदरातील अर्भक नऊ महिने पुरे होण्याच्या आधीच काढून त्याचा बळी देणे हे त्यांच्यात फार महत्त्वाचे मानण्यात येत असे. सादिया शहरात चूटियांनी बांधलेले कालीचे एक ताम्रमंदिर होते. तिथे ते देवीला पशुबळी व नरबळी अर्पण करीत असत. सोळाव्या शतकाच्या सुमारास आसामातील बहुतेक राजे शिव व शक्ति यांचे उपासक होते. नरनारायण राजाने मुसलमानांनी विध्वंस करून टाकलेल्या कामाख्या देवीच्या मंदिराचा १५९५ मध्ये जीर्णोद्धार केला. त्या वेळी एकशेचाळीस नरबळी देण्यात आले, अशी दंतकथा प्रचलित आहे. नरनारायण राजाचा शाक्त पंथाला पाठिंबा होता; त्यामुळे त्याच्या कारकीर्दीत हा पंथ खूपच भरभराटीस आला.

आसाम तसा निसर्गाप्रमाणेच विविध प्रकारच्या लोकांचे वसतिस्थान आहे. त्यामुळे याला ' भिन्न भिन्न प्रकारच्या लोकांचे अजबघर ' असे म्हटले जाते. अनेक प्रकारच्या वंशांचे व देशाचे लोक येथे आले. त्यात ऑस्ट्रेलिया, कंबोडिया निकोबार बेटे, ब्रह्मदेश, तिबेट इत्यादी ठिकाणचे लोक होते. मूळचे द्रविड होतेच. आर्य भारतात आल्यावर त्यांच्यापैकी काही आसामातही येऊन वसले. त्यांच्याशी मूळच्या रहिवाश्यांचा संघर्षही प्रारंभीच्या काळात झाला. परंतु पुढे हे सर्वच एक-मेकांत मिसळून गेले. त्यामुळे आसामी लोकांत अनेक जातीच्या लोकांची सर-मिसळ झालेली आढळते. कचार, राभा, मेच, मिरी, लालुंग, गारो, नागा आणि कूकी ह्या काही जातींमधून मंगोल रक्त आहे. ब्रह्मदेशातून आलेल्या अहोमांनी आणखी एक प्रवाह येथील मूळच्या रक्तात मिसळून दिला.

आसाम प्रदेशात निरनिराळ्या जमातींचे लोक राहातात व त्यांच्या निर-निराळ्या तऱ्हेच्या चालीरीती आहेत. सण-उत्सव आहेत. धर्मपंथ आहेत. बोली-भाषा आहेत. पण एवढी विविधता असूनही आसामी व भारतीय हा एक बळकट

मध्यवर्ती धागा आहेच. या भिन्न भिन्न जाती-जमातींचे लोक जरी वेगवेगळी भाषा—बोली बोलत असले तरी त्या सर्वांना असमियां भाषा समजते व परस्पर व्यवहारासाठी ते असमियाचाच वापर करतात.

आसामातील बहुसंख्य लोक हिंदु-धर्मीय आहेत. तिथे पूर्वी शाक्तपंथाचा विशेष जोर होता, पण शंकरदेव या संतपुरुषाने ' वैष्णव ' मताचा फारच प्रभावी प्रचार केला. अनेक हिंदूंनी वैष्णवपंथ स्वीकारला. शंकरदेवांच्या पश्चात त्याचा पट्टशिष्य माधव याने हे कार्य पुढे जोमाने चालू ठेवले. माधवाच्या पंथाला आसामात



नामघर

' महापुरुषीय ' पंथ असे म्हणतात. परंतु माधव हा कायस्थ असल्यामुळे ब्राह्मणांनी त्याचे शिष्यत्व पत्करले नाही. त्यांनी स्वतःचे वेगळे पंथ स्थापन केले. त्यांच्यापैकी दामोदरदेव, हरिदेव व गोपाळदेव हे प्रमुख होऊन गेले. त्यांनी ठिकठिकाणी किती तरी ' सत्रे '—म्हणजे मठ स्थापन केले. ' नामघर ' ही आसाममधील धार्मिक प्रार्थनेची वास्तू गावोगावी असते.

शंकरदेवांचा अनिरुद्ध नावाचा आणखी एक शिष्य होता, पण पुढे गुरूशी त्याचे पटले नाही व त्याने ' मोआमारिया ' नावाचा वेगळाच पंथ काढला. याच लोकांनी गौरीनाथसिंह या अहोम राजाच्या कारकीर्दीत बंड केले होते.

महापुरुषीय व बामुनिया गोसावी या लोकांनी शाक्त पंथाला आसाममध्ये बराच आळा घातला होता. पण रुद्रसिंहाने बंगालमधील कृष्णराम भट्टाचार्य नावाच्या पंडिताकडून शाक्त पंथाची दीक्षा घेतल्यावर पुनश्च शाक्त पंथाची प्रस्थापना केली. कृष्णराम भट्टाचार्याला रुद्रसिंहाने कामाख्या देवीचा ' पर्वतिया गोसावी, ' म्हणजे मुख्य पुजारी नेमले. परंतु रुद्रसिंगाचा पुत्र लक्ष्मीसिंग याचे भट्टाचार्याशी पटले नाही. त्याने बंगालमधून दुसरा शाक्त पुजारी आणला. त्याला ' ना-गोसावी, ' म्हणजे नवीन पुजारी असे नाव पडले. यानेच पुढे ' नाती गोसावी ' नामक नवीन पंथ काढला.

पुढील काळात वैष्णव पंथाच्या सर्वसामान्य अनुयायांवर एखाद्या तरी ' सत्रा ' च्या गोसाव्याची धार्मिक सत्ता चालत असते. सत्रातील भक्तगण लोकांकडून सत्राचा योगक्षेम भागवण्यासाठी भिक्षा घेत असतात. सत्रामधील भक्तांमध्येही फरक असतात. उदाहरणार्थ, सत्रातील कौलिया भक्त हे ब्रह्मचारी व संन्याशी असतात. ते जातपात वगैरे भेदभाव मानत नाहीत. मूर्तीपूजाही करत नाहीत. परंतु सर्वसामान्य अनुयायांसाठी त्यांच्या सत्रात विष्णूची मूर्ती मात्र ठेवलेली असते.

महापुरुषीय पंथाचे लोक शंकरदेव व माधवदेव या दोघांना कृष्णाचे अवतार मानतात. सत्कृत्ये केल्याने मुक्ति मिळते, सत्कृत्यांच्या अभावी ईश्वरनाम-संकीर्तनानेही ती मिळू शकते, असे यांचे मत आहे. तात्त्विकदृष्ट्या हे जातिभेद मानत नाहीत, परंतु व्यवहारात मात्र अद्यापि जातीपातींचे उच्चाटन झालेले नाही. भेदभावही कायम आहे. हे लोक मांसाहारी आहेत, पण ते शस्त्राने मारलेल्या पशूंचे मांस न खाता, काठीने मारलेल्या पशूंचे खातात. शंकराचे ' कीर्तन ', व ' दशम ' आणि माधवाचे ' नामघोष ' व ' रत्नावली ' हे ग्रंथ प्रमाणभूत मानतात. महापुरुषीय लोक दामोदर पंथाच्या लोकांबरोबर रोटी व्यवहार करीत नाहीत; पण त्यांच्यात बेटीव्यवहार मात्र होऊ शकतो.

दामोदरपंथीय लोक कृष्णाची पूजाअर्चा करतात, व दामोदराला ईश्वरी अंश मानतात.

हरिदेवाचे अनुयायी हे हरिदेवाला कृष्णाचा अवतार मानतात. अलिकडे हे लोक दामोदरपंथाच्या लोकांत मिसळतात.

गोपाळदेवाच्या अनुयायांत व महापुरुषीयात बरेच साधर्म्य आहे. शंकर व माधव यांनी घालून दिलेले सर्व नियम हे लोक पाळतात.

आसाममध्ये फार प्राचीन काळापासून हिंदुकरणाची प्रथा चालत होती. ब्राह्मण लोक एखाद्या टोळी प्रमुखाजवळ जाऊन, त्याचे पूर्वज पूर्वी हिंदूच होते, व काही अज्ञात कारणामुळे त्यांनी आपला धर्म लपवला, असे त्याला सांगत; आणि एवढ्यावरच न थांबता त्याच्या पूर्वजांचा एखाद्या हिंदू देवतेशीही संबंध जोडून देत असत. यामुळे त्या टोळी–प्रमुखाचे समाधान होत असे व तो आनंदाने हिंदुधर्म स्वीकारीत असे. त्याच्या बरोबर त्याचे अनेक अनुयायीसुद्धा हिंदू होत असत. कोच जमातीच्या राजांना अशा प्रकारेच शिवाचे वंशज ठरविण्यात आले. कोच राजे हिंदू होताच त्यांच्या प्रजेनेही हिंदूधर्म स्वीकारला. ही प्रजा पूर्वीची क्षत्रिय होती, पण भगवान परशुरामाच्या भयाने त्यांनी डोंगरदऱ्यांचा आश्रय घेतल्यामुळे त्यांचे वंशज पुढे कालांतराने आपला धर्म विसरून गेले, अशी आख्यायिका रचून ब्राह्मणांनी कोच राजाच्या सर्व प्रजेला क्षात्रवर्णात समाविष्ट केले.

याच पद्धतीने ब्राह्मणांनी काचारी जातीतील राजांना भीमाचे वंशज ठरविले. त्यांच्या प्रजेला क्षत्रिय ठरवले आणि यज्ञोपवीत घालण्याचा अधिकारही दिला.

अहोमांचा मूळ पुरुष इंद्र होता, असे सांगून त्यांनाही हिंदुधर्मी बनवले. हिंदू धर्म स्वीकारण्यापूर्वी अहोम लोक ‘ सोमदेव ’ नावाच्या देवतेची पूजा करीत असत.

ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यात आसामी भाषा बोलणारे आणि धर्माने हिंदू असणारे लोक राहातात. ते अहोम राजांच्या कारकीर्दीत परप्रदेशातून आणलेल्या ब्राह्मणांचे वंशज असून आसामात फक्त त्यांनाच पौरोहित्याचा अधिकार आहे. ‘ गोहाई ’ हे आडनाव प्रमुख अशा ब्राह्मणांचे मानले जाते. ब्राह्मणांच्या खालोखाल कायस्थांना स्थान असून त्यांच्यात ‘ दत्त ’ हे आडनाव प्रमुख आहे.

आसामी ब्राह्मण ही कनोजी ब्राह्मणातून निघालेली एक शाखा असून हे जयध्वज राजाच्या कारकीर्दीत आसाममध्ये येऊन स्थायिक झाले. हे आपल्याला वैदिकधर्मी म्हणवतात. ब्राह्मणांतही पोटजाती आहेत.

कलिता नावाचीही एक हिंदूधर्मीय जमात असून ती संख्येनेही मोठी आहे. आसामात प्रथम आलेले आर्य आणि मूळचे रहिवाशी यांच्यात बेटीव्यवहार होऊन कालिता जात उदयास आली. कलित व अहोम हे आसामातील प्रतिष्ठित हिंदू मानले जातात. सध्याचे अहोम हे प्राचीन अहोमांचे वंशज असून त्यांची संख्या सुमारे अडीच लक्ष भरेल. अहोम हे जरी हिंदु असले तरी सर्वसाधारण माणूस हिंदू व अहोम असे दोन भिन्न वर्ण मानतो.

चौडांग नावाचीही एक जात आहे. अहोम राजाने सहा ते सात हजार आसामी लोक आपले शरीररक्षक म्हणून ठेवले होते; त्यांचे हे वंशज आहेत. यापैकी बरेचसे लोक हिंदूधर्मीय नाहीत. त्यांच्याप्रमाणेच डोम किंवा कैवर्त ही आसामातील एक दलित जमात असून तीही हिंदूधर्मीय नाही.

आसाममध्ये बौद्ध धर्म त्याच्या पडत्या काळात आला, त्यामुळे लोकांवर त्याचा फारसा प्रभाव पडला नाही. ' रातिखोवा ' म्हणजे ' निशायोगी ' संप्रदाय हे त्याचे त्या वेळी स्वरूप होते व ' हाजो ' येथील माधवमंदिर हे केंद्र होते. खाम्ती लोकांत आजही बौद्धधर्म आहे.

नागा लोक पहाडात वसलेले आहेत, तर मिरी लोक पहाडात, त्याचप्रमाणे मैदानी भागातही वस्ती करून आहेत. बुटके, गुटगुटीत शरीराचे व मंगोल आकर्षक चेहरेपट्टीचे हे लोक शांत स्वभावाचे आहेत. मिरी लोक स्वतःला नेफामधील पदम नामक लोकांचे वंशज म्हणवितात आणि त्यांच्याप्रमाणेच ' डोन्ची ' आणि ' पोलो '— म्हणजे सूर्य-चंद्र यांची पूजाअर्चा करतात. ह्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच असून त्यांच्या मोसमी गीत-नृत्यप्रधान सणाला ' अलीलियांग ' असे म्हणतात. त्याचप्रमाणे सुगीनंतरचा त्यांचा सण आहे ' पो-राग ' यांच्या गावात पंचायत असते व तिच्यामार्फत गावकीचा कारभार चालतो. मिरी युवक आणि युवती रंगीबिरंगी पोषाख परिधान करून नद्यांच्या प्रवाहात जलविहार करतात आणि त्या वेळी मिळून ' ओई नितीय ' गीत ज्या वेळी गातात; त्यावेळी मन गुंग होऊन जाते. त्यांच्या लय-तालयुक्त गीत-ध्वनीने दूरवरचा परिसरदेखील निनादून जातो.

केवांग जमातीमध्ये प्रशासनासाठी एक समिती असते. त्यांच्यात सर्व प्रश्न सर्व संमतीनेच सोडवण्याची प्रथा आहे.

अबोर जमातीचे लोकांचा मुख्य व्यवसाय आहे पशुपालन. ज्याच्याजवळ

अधिक जनावरे तो धनी, श्रीमंत मानला जातो. 'अबोर' शब्दाचा अर्थ आहे 'अज्ञात जंगली'. हे लोक ब्रह्मदेशाच्या उत्तरेकडे व तिबेटी पहाडी सीमेलगतच्या भागात राहातात. सुमारे तीन लक्ष एवढी यांची संख्या आहे. अबोरांचे शेजारी मिश्मी लोक आहेत. त्यांची संख्या सुमारे साठ लक्ष आहे. वस्तुतः दोन्हीही लोक मूलतः एकाच रक्ताचे आहेत असे मानले जाते. त्यांची भाषा व सामाजिक चाली-रीती इत्यादी एकसारख्याच आहेत. परंतु आज दोन्ही जमातींमध्ये खूपच विषमता आहे. त्यामुळे शेजारी शेजारी राहूनही त्यांच्यात वेगळेपण आहे.

अबोर लोक अद्यापीही जुन्या पद्धतीने, जुन्या अवजारांनी हातांनी खणून शेती करतात व शिकारीवर पोट भरतात. त्यांचे प्रत्येक गाव स्वतंत्र असते, पण संकटकाळी ते सर्व एकत्र येऊन संकटाशी मुकाबला करतात. गावात गुन्हा घडला तर पंचायत लहान गुन्ह्याबद्दल कोंबडी व मोठ्या गुन्ह्याबद्दल डुक्कर असा गुन्हे-गाराला दंड बसवते. पंचायत घराला 'केवांग' म्हणतात. गावातील अविवाहित तरुण तिथे रात्री मुक्कामाला असतात. संकटकाळी हे तरुणांचे शस्त्रसज्ज दल गावाच्या संरक्षणासाठी उपयोगी पडते.

अशा आणखीनही लहान, लहान जमाती आसाममध्ये आहेत.

**वेशभूषा**

बदलत्या काळाप्रमाणे वेशभूषेत आसाममध्येही बदल होत आहे. पण आसामी पुरुषाचा परंपरागत पोशाख म्हणजे सदरा, धोतर व रुमाल असा साधाच आहे. परंतु आसामी स्त्रीचा पोशाख मात्र वेगळा असतो. ती कमरेपासून खाली परकरवजा 'मेखला' वापरते. त्यावर अंगाबरोबर घट्ट गुंडाळून घेतलेली 'रिहा' असते. सर्वांत वर आच्छादन म्हणून 'चद्दर' असते. ही चद्दर म्हणजे तीन वाराची साडीच असते. अलिकडे रिहाचा वापर फक्त विवाहित स्त्रिया व जुन्या बायकांमध्येच दिसतो. सर्वसाधारण स्त्रिया, मुली ह्या मेखला, शोभेलसं पोलकं व चद्दरच वापरतात.

मेखला सामान्यतः मुगा रेशमाची व चद्दर पांढऱ्या रंगाची असते. अलिकडे सुशिक्षित व सुधारक स्त्रिया व मुली रंगीत, प्रिंटेड वायलचा किंवा नायलॉन आदींचा उपयोग चद्दरसाठी करतात. सहावारी साड्यांचा उपयोगही मोठ्या शहरातून होऊ लागला आहे. ह्या मेखला व चद्दरही तिकडे निरनिराळ्या वाणांच्या, पोताच्या व पेठांच्या असतात.

पूर्वीच्या काळी आसामी स्त्रियांच्यामध्ये खूप नावाजलेला पोषाख म्हणजे पुष्कळ जरीकाम केलेले किनखाप. हा जरतारी पोषाख आसामी स्त्रीचा आवडता व अभिमानाचा होता. कारण जरीची ती कलाकुसर तशीच देखणी, मोहक असे. अलिकडे हा जरतारी पोषाख दुर्मिळ झाला आहे. तथापी काही जुन्या खानदानी, श्रीमंत घराण्यांमधून कार्यप्रसंगी अधूनमधून पाहायला मिळतो.



आसामी स्त्री

'पाट' हे एक मुलायम रेशमी कापड असते. आसामातील विशिष्ट रेशमी कापडालाच पाट म्हणतात. हे ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात पैदा होणाऱ्या रेशमी किड्यांपासून बनवले जाते. पूर्वी एकेशिया नावाच्या जातीप्रकारात सामावणाऱ्या निरनिराळ्या वनस्पतींपासून या रेशमाला रंग दिला जाई. परंतु आता मात्र रासायनिक द्रव्यांचाच विशेष करून उपयोग केला जातो. या रेशमी वस्त्रांना चमकणाऱ्या जरतारी किनारी असतात. या जरीकामाचा जेवढा अधिक प्रमाणात वापर केला असेल, तेवढी त्या वस्त्राची आणि वस्त्र परिधान करणाऱ्या स्त्रीची श्रीमंती व प्रतिष्ठा मानली जाते.

पोलक्याचे कापड मेखलेला शोभेल असेच विणतात. कधी कधी काठावर बुट्टयांच्या ओळीही रेखलेल्या असतात.

रिहाचाच ' गारीडिआ ' नावाचा आणखी एक प्रकार असतो. त्यावर आडवे पट्टे असतात. अलिकडे हा नमुना बराच लोकप्रिय आहे.

आसामी स्त्री रोजच्या वापरासाठी बहुधा पांढरे व त्याला रंगीत किनार व बुट्टया असलेले वस्त्र वापरते. बाहेर जाताना वा लग्नसमारंभाला मुगा रेशमाची वस्त्रे ती वापरते. सोनेरी पिवळसर रंगाच्या किंवा क्रीम कलरच्या शुद्ध रेशमी कापडावर जरीने वा रंगीत रेशमाने आकर्षक डिझाइन्स काढलेली असतात. आसामी स्त्रीच्या पीत पांढऱ्या वर्णाला मुगा रेशमी वस्त्र फारच उठून दिसते. त्यांच्या साध्या, सरळ स्वभावाचे ते जणू प्रतीकरूपच वाटते. लग्नप्रसंगी वधू देखील पांढरट, बदामी रंगाच्या वस्त्रांनी सजवलेली असते.

आसामी स्त्रियांच्या कपड्यात नव्यानेच आलेली एक तऱ्हा ' काझिरंग–कपूर ' ह्या नावाने प्रसिद्ध आहे. मेखला, चद्दर यांच्या काठांवर अलिकडे आसाम-मधील वन्य पशूंची चित्रे रेखलेली असतात. काझिरंगा येथे पशूंसाठी अभयारण्य आहे, त्यावरून हे नाव.

आसामी स्त्रीची अलंकार भूषणे म्हणजे सोन्याच्या तसेच काचेच्या बांगड्या, कर्णफुले, साखळी, अंगठी इत्यादी. केशभूषेच्या बाबतीत आसामी स्त्री फारशी चोखंदळ नाही. निरनिराळी रंगीबिरंगी व सुवासिक फुले ती आवडीने केसात माळते.

आसामी स्त्री उद्योगी आहे. ग्रामीण भागात तर ती सारखी कष्टतच असते. शेतात नांगर धरणे एवढेच काम ती करते असे नाही, तर रोप टाकणे, कापणी करणे भाजी-पाला पिकवणे, कपडा विणणे आणि शिवाय घर चालवणे ही कामे तिला करावी लागतात. त्या मानाने आसामी शेतकरी थोडा आळशीच आहे. दोन–तीन महिने शेतीत काम केले म्हणजे बाकीचा काळ घरात बनवलेल्या तांदळाच्या मद्याचा, म्हणजेच ' लाओपानी 'चा आस्वाद घेत काढतो. आसामची जमीनही थोड्या कष्टात भरपूर पीक देण्याइतकी कृपाळू आहे.

वापरायला लागणारा कपडालत्ता प्रत्येक आसामी स्त्री घरच्या घरीच हातमागावर विणून तयार करीत असते. काही मोठी गावे व सधन कुटुंबे सोडली तर आसामच्या प्रत्येक घरात हातमाग असतो. ती विणकामात कुशल असते.

अन्यत्र स्त्रियांना चूल–मूल सोडून घराबाहेर पडण्यासाठी चळवळी कराव्या लागल्या; पण आसामी स्त्री ही कधीच घरात बसून राहाणारी, परावलंबी, शोभेची बाहुली नव्हती. सर्वच क्षेत्रात प्रथमपासूनच ती पुरुषाच्या बरोबरीने कामधंदा करत आली आहे.

सूतकताई, विणकाम हे तिला बाळपणापासूनच शिकवले जाते. आसामी स्त्रियांची विणाईतली कुशलता पाहून गांधीजी चाकित झाले होते, नि त्यांनी उद्गार काढले होते, " धाग्यातून साकार झालेले मधुर स्वप्न ! आसामी स्त्री या विणकामात जणू अद्‌भुत परिकथाच रेखत असते ! "

स्त्रीच्या उद्यमशीलतेमुळे अन्यत्र असणाऱ्या स्त्रीच्या संदर्भातल्या काही समस्या आसामात आहेत तर काही नाहीत. उदाहरणार्थ स्त्री–शिक्षणाची प्रारंभीची अवस्था इतर प्रांताप्रमाणेच आसामातही होती, किंबहुना डोंगरी भागात ती अधिकच बिकट होती. मुलींच्यासाठी कित्येक दिवस, कित्येक ठिकाणी शाळाच नव्हत्या. म्हणून काही मुलींना शिक्षणाला वंचित होऊन घरीच बसावे लागे, तर काहींना कलकत्त्यासारख्या दूरच्या ठिकाणीं जावे लागे. त्यांना ब्रह्मपुत्रेसारखी महानदी बोटीतून ओलांडावी लागे. सुरुवातीला गोहाटीच्या महाविद्यालयात मुलींना प्रवेशही नसे. परंतु ही परिस्थिती आता राहिलेली नाही. स्वातंत्र्यानंतर दळणवळणाची साधने, सडका, पूल इत्यादी सोय उपलब्ध झाली आहे. ठिकठिकाणी शाळा-महाविद्यालये निघाली आहेत. आदिवासी विभागातूनसुद्धा शाळांची मागणी होत आहे. ख्रिस्ती मिशनरी लोकांनी गिरिजन लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार बराच केला.

हुंड्यासारखी प्रथा आसामात तेवढी जाचक नाही. मुलीचा जन्म म्हणजे एक आपत्ती, विवंचना असे आसामी कुटुंबाला कधी वाटत नाही. सासरी व माहेरी दोन्हींकडे स्त्रीला मानाने वागवले जाते. अजूनही काही ठिकाणी आसामात वराकडून वधूला हुंडा दिला जातो. कारण स्त्री ही इकडे उत्पादनाचे साधन बनलेली आहे. पण ही देखील प्रथा हळूहळू बंद होत आली आहे. काही डोंगराळ प्रदेशात तर मुलीचा पित्याच्या संपत्तीवरही हक्क पोचतो. मिताक्षरा कायदा आसामच्या समाजात प्रचलित नाही.

पूर्वी आसाममध्येही बालविवाह रूढ होते, पण तीही प्रथा आता नाहीशी होत आहे.

आसाममधील विधवा स्त्रीला पुनर्विवाह करता येतो, मात्र कायस्थ व ब्राह्मण लोकांत पुनर्विवाहाची प्रथा नाही. तो निषिद्ध मानला जातो. परंतु त्या वर्गातही आता नवविचाराचे, नव्या सुधारणेचे लोण पोचले असून त्यांचा विरोधही कमी कमी होत आहे. अशिक्षित व मागासलेल्या वर्गात घटस्फोटाची पद्धत फारच सुलभ आहे. पती-पत्नीच्या नातलगासमोर 'पान फाडले' की विवाह विच्छेद होतो.

सर्वत्रच आता नव्या कल्पना, नवे विचार यांचे उत्साही वारे वाहत आहेत. आसामपुरते बोलायचे तर ह्या प्रांतात सुधारणांची ओळख व्हायच्या आधीच्या काळातही आसामी विधवा स्त्री आर्थिकदृष्ट्या केव्हाही निराधार किंवा परावलंबी होत नसे. कारण लहानपणापासूनच मिळालेले सूतकताईचे व वस्त्रविणाईचे शिक्षण आणि विशिष्ट प्रकारचे रेशीम तयार करण्याचे ज्ञान ह्या कलांमुळे ती आपल्या पायांवर उभी राहून आपली उपजीविका भागवू शकत असे. घराचा मुख्य आधार नाहीसा झाला तरी ती आपल्या हस्तकौशल्याच्या बळावर कुटुंबाचे पालनपोषण, शिक्षण, संरक्षण करू शकत असे.

परंतु अलिकडे मात्र ही परिस्थिती बदलली आहे व ही स्वावलंबी स्त्री यंत्र-युगात असहाय, केविलवाणी बनली आहे. यंत्राच्या साहाय्याने आवश्यक वस्तूंची निर्मिती होऊ लागल्यामुळे आसामी स्त्रीच्या गुणांना, कलाकौशल्याला वाव उरला नाही. घराच्या बाहेर पडून, गिरण्यांतून मजूर म्हणून राबण्याची कल्पना तिच्या मनाला पटत नाही. तसे राबण्यात आपल्या हस्तकौशल्याचा अपमान होतो अशी तिची भावना आहे.

मध्यमवर्गीय सर्वसाधारण आसामी स्त्री शिकून आज विविध क्षेत्रांत स्वतेजाने चमकू लागली आहे. डॉक्टर, नर्स, शिक्षिका, समाजकल्याण अधिकारी व इतर किती तरी महत्त्वाच्या व जबाबदारीच्या जागांवर ती काम करीत आहे. तिला कोठेही प्रतिबंध राहिलेला नाही; तिच्या कर्तबगारीला सर्व क्षेत्रात संधी उपलब्ध आहे. व्यवसायाव्यतिरिक्त साहित्य, नाट्य, कला, संगीत, राजकारण, समाजकारण, संशोधन इत्यादी विविध प्रांतांतही आसामी स्त्रीने आपली योग्यता व श्रेष्ठता सिद्ध केली आहे.

१९०८ साली आसाम प्रादेशिक महिला समिती स्थापन झाली. आज ह्याच संघटनेचा विशाल वटवृक्ष झालेला असून ठिकठिकाणी तिची कार्यकारी केन्द्रे आहेत. गरीब व गरजू स्त्रियांना सर्व प्रकारचे साहाय्य ह्या संस्थेमार्फत होत असते.

आसामच्या सामाजिक जीवनात ह्या संस्थेला खूपच मोठे स्थान आहे.

ह्या शिवाय, ‘ हाजो डेमॉन्स्ट्रेशन प्रॉजेक्ट ’ ही संस्थाही १९६२ पासून कार्यशील आहे. संस्थेच्या वतीने निरनिराळ्या गावांतून बालवाड्या, बालसेविका प्रशिक्षण केंद्र, इत्यादी कार्य सुरू आहे. ‘ गर्ल गाइडस् ’, ‘ आसाम शिशु-कल्याण सदन ’, ‘ श्रीमंत शंकर मिशन ’ इत्यादी संस्था, व सर्वोदयी ‘ शरणिया आश्रम ’ आणि विनोबांनी १९६२ साली स्थापन केलेला ‘ मैत्री आश्रम ’ विविध तऱ्हेची समाजसेवेची कामे करीत आहेत. मैत्री आश्रमाचा हेतू सर्व जगाशी भारताची मैत्री व्हावी हा आहे. ह्या आश्रमाचे स्वरूप सांगताना विनोबाजी म्हणाले होते, “ ह्या आश्रमाचा हेतू-मैत्री, कार्यक्रम– मैत्री आणि नियम देखील– मैत्रीच राहील ! ”

**खाणे–पिणे**

आसामी घरात आतिथ्य खूप आढळते. शहरात वा खेड्यात आणि गरिबाच्या वा श्रीमंताच्या कोणाच्याही घरी गेल्यावर जिव्हाळ्याने विचारपूस होते. बैठकीवर बसल्यावर देखणी ‘ हराई ’ पुढे येते. ‘ हराई ’ म्हणजे तांबूल पात्र किंवा पानदान. काशाच्या किंवा कळकाच्याही लहान मोठ्या ‘ हराई ’ असतात. आसाम-मध्ये कच्च्या सुपारीलाच तांबूल म्हणतात. ही सुपारी जमिनीत पुरून आंबवलेली असते. पानही खातात, पण नुसताच चुना लावतात, कात खात नाहीत.

आसामी तांबूल नवख्या माणसाने खाल्ला तर घाम फुटतो. डोके गरगरते. कारण ती विशिष्ट सुपारी फारच कडक व गरम असते. म्हणून नवख्या माणसाने ती बेतानेच घेतली पाहिजे. परंतु घेतली ही पाहिजेच, नाही तर यजमानाला ते रुचणार नाही. तुम्ही त्याच्यावर रुष्ट तरी आहात किंवा त्याच्यावर तुमचा विश्वास तरी नाही अशी त्याची समजूत होईल; यात तो आपला अपमान मानून घेईल.

आसाममध्ये सर्वत्र चहाच मिळेल. कॉफी क्वचित आढळेल.

आसाममध्ये मुख्य उत्पन्न आहे भात. भाताला लागणारा मुबलक पाऊस येथे पडतो. त्यामुळे भात आणि भाताचे प्रकार आसामी जेवणात प्रामुख्याने असतात. गहू-बाजरी-मका ह्या धान्यांचे प्रकारही काही भागात असतात, पण त्यांचे प्रमाण कमी.

भाताशी, बंगाली जेवणाप्रमाणेच मासळी हवीच. आसाममध्ये प्रत्येकाच्या दारात छोट्यामोठ्या ‘ पोखरी ’ म्हणजे पुष्करणीसारखे तलाव असतात व त्यातून ताजी ‘ मांगुर ’ किंवा ‘ कावई ’ मासळी हवी तेव्हा मिळते. परसदारीची कोथिंबीर

किंवा हिरवी मिरची जशी सहजतेने खुडून आणावी तशीच ही मासळी आसामी गृहिणी पोखरीतून पटकन आणते आणि तिचे खमंग कालवण बनवते.

मोठ्या शहरातून पोखरीची उणीव मोठाली भांडी ठेवून भरून काढलेली असते. या मोठाल्या भांड्यातून पाण्यात मासळी पाळली जाते व हवी तेव्हा कालवणासाठी वापरली जाते.

जेवणात भाजीपाला असतो. सगळे पदार्थ सरसूंच्या तेलात करतात. त्यात तिखट किंवा हिरवी मिरची नसते. नारळाचे उत्पन्न पुष्कळ, त्यामुळे खोबऱ्याचा वापरही पुष्कळ असतो.

'पीठा' हा आसामातील प्रमुख गोड पदार्थ– पक्वान्न मानले जाते. तांदळाच्या पिठात नारळ, खसखस, तीळ, बदाम, बेदाणे इत्यादी घालून वेगवेगळ्या प्रकारचे पीठे तयार करतात. अशा प्रकारचे ६५ पीठे रूढ आहेत.

तांदळाचे पीठ इकडे कुटून तयार करतात. जाते वापरण्याची पद्धत जवळजवळ नाहीच. निरनिराळ्या प्रकारच्या पीठ्यासाठी निरनिराळ्या जातीचा तांदूळ वापरतात. बटाट्याच्या वड्याच्या आकाराचे लहानसर वाटोळे पिठे तुपात गुलाबी रंगावर तळलेले असतात.

ज्या त्या प्रदेशात ज्याची मुबलकता त्याचे खाद्य पदार्थ सहजच बनवले जातात. आसामात बांबूची जंगलेच जंगले आहेत, या बांबूंच्या कोवळ्या कोंबांची चटणी आसामी जेवणात असते; तिला 'खोरिसा' म्हणतात. बांबूचे कोवळे कोंब किसून एका बाटलीत वा बरणीत भरून ठेवतात. ते चांगले मुरले म्हणजे त्यांना आंबूस वास येऊ लागतो. मग हा खार कुठल्याही पदार्थाशी वा त्यात मिसळून खातात.

'गाजर-खार' नावाचा तोंडी लावण्याचा पदार्थही असाच बांबूच्या कोवळ्या कोंबाचा व हरभऱ्याच्या डाळीचा मिळून करतात. भाताबरोबर गाजर-खार खातात.

घावनाप्रमाणे तांदळाच्या पिठीचाच तव्यावर 'सितूपीठा' हा पदार्थ तयार करतात.

मासळीचे देखील 'टोमॅटो–मटार–मच्छीची कढी', टोमॅटो–मच्छीचा–'टेंगा', पालक–चुका व मच्छीचा 'टेंगा' असे विविध पदार्थ करतात.

आसामातील ब्राह्मणवर्गही गोवा–कारवारच्या ब्राह्मणांप्रमाणेच मत्स्याहारी

आहे. मेंढी व बकरीचे मांस बाकीच्या सर्व वर्गांतून चालते, पण कोंबडीचे मांस किंवा अंडी खाणे हे अजूनही काही उच्चवर्गीय हिंदु कुटुंबात वर्ज्य मानले जाते. त्याऐवजी बदक व त्याची अंडी चालतात. कबुतराचे मांसही खातात. त्यामुळे बाजारात कोंबडी, बदक यांच्या बरोबरच कबुतरांचीही विक्री चाललेली दिसते.

दूध-दुभते, फळे, हेही आसामी आहारात असते. केळी, पपई, नारळी घरा-घरातून दिसतात. त्याचप्रमाणे बांबूची बेटेही असतात. बांबूच्या पोकळ पेऱ्यां-मधून मीठ, मिरची, डाळ, तांदूळ असे पदार्थ भरून ठेवतात. पाण्यासाठी 'वॉटर बॅग' सारखाही उपयोग करतात. प्रवासात त्यातून शिजलेला भात, मच्छी आदी भरून नेतात. हिरव्या बांबूच्या पेऱ्यांत तांदूळ–पाणी भरून त्याचे तोंड तागाने बंद करतात व ते पेरे जाळात टाकून देतात. बांबूच्या पेऱ्याच्या बाहेरील पाला-पाचोळा जळू लागतो, तशी त्यातील पाण्याच्या वाफेने आतील भात शिजून तयार होतो. हा भात फार रुचकर व जीवनसत्त्वयुक्त असतो.

**चालीरीती**

चालीरीती, लोकाचार यांना एक परंपरा लाभलेली असते. आसाममध्ये पारंपरिक लोकाचार आहेतच.

निसर्गाचा प्रभाव चालीरीतींवर होत असतो. आसाम हा भाताचा नि माशाचा प्रदेश असल्यामुळे मुलगा जन्मला की, आपण जसे आनंदाने पेढे वाटतो, तसे इकडे त्या आनंदाप्रीत्यर्थ आप्तस्वकीयांकडे 'रहु–मच्छी' धाडून देण्याची प्रथा आहे. जावळाच्या वेळी मुलाचे व मुलीचेही मुंडन करतात. अन्नप्राशनाचा समारंभ मोठा असतो.

सर्वसाधारण आसामी माणसाला बरेच मुलगे असावेत असे वाटते, याचे कारण म्हणजे ते आपल्याला शेतीत उपयोगीं पडतील व म्हातारपणी सांभाळतील अशी त्याला आशा असते.

आसाममध्ये माणसाला घरात मृत्यु येणे अशुभ मानले जाते. म्हणून जेव्हा एखादा माणूस आसन्नमरण होतो, तेव्हा त्याला घराबाहेर आणून ठेवतात. घरात जर मृत्यू घडला तर ते घर सोडून दुसरीकडे राहायला जातात. ब्राह्मणात व कायस्थात तेराव्या दिवशी ब्राह्मणांना व नातेवाईकांना श्राद्धाला जेवायला बोलाव-तात. त्या वेळी एका वृद्ध माणसालाही 'भोज' – म्हणजे भोजन घालतात. जेवायला सुरुवात या वृद्धानेच प्रथम करायची असते, कारण या दिवशी जो प्रथम

१२००५


जेवायला प्रारंभ करतो, तो लवकर मरतो अशी त्यांची समजूत आहे.

पावसाची नक्षत्रे कोरडी गेली व अवर्षणाची चिन्हे दिसू लागली म्हणजे आपल्याकडे शंकराचा गाभारा भरणे, अनुष्ठान मांडणे अशा गोष्टी करतात; आसामात पावसासाठी मजेशीर विधी करण्याची रीत आहे.

गावामधल्या मुलींमधून गावकरी दोन सुंदर मुली निवडतात. त्या दोघींना एक एक बेडूक पकडून आणायला सांगतात. मग त्या बेडकांचे अगदी विधिपूर्वक भटजीकडून लग्न लावले जाते. बेडकाला कुंकुम मळवट भरतात, दागिने घालतात, गावातील स्त्री-पुरुष मंगलाष्टके म्हणतात. मग शेवटी त्या दोन मुली त्या बेडकांना आंघोळ घालतात. या विधीनंतर सात दिवसात पाऊस पडेल अशी आसामी गावकऱ्यांची श्रद्धा असते.

आसामी हिंदूलोकात एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात आहे. घरातील सर्व सत्ता सासूच्या हाती असते. तिच्या मागून ती मोठ्या सुनेकडे येते. घरात तीन जावा असल्या तर, मोठ्या जावेला स्वयंपाकपाणी करावे लागते. तिच्याहून धाकटी जाऊ घरातल्या मुलाबाळांना सांभाळते, व तिच्याहून धाकटी झाड-सारवण करून घर व्यवस्थित, स्वच्छ ठेवते. ही एक प्रकारची श्रमविभागणीच असते. घरातल्या बायका कापड विणतात. विणता येणे हा मुलीच्या शिक्षणातला एक महत्त्वाचा भाग मानतात. रेशमी कापड विणण्यासाठी रेशमाचे किडे सांभाळतात. त्यांची जोपासना करणे व रेशमी कापड विणणे ही कामे घरातल्या वृद्ध स्त्रिया करतात.

खेड्यातील स्त्री-पुरुष त्रिकाल स्नान करतात. प्रत्येक कुटुंबात रामायणाची एक प्रत असते, व घरातली माणसे श्रद्धेने ते वाचतात.

आसामी लोक हत्तीला गणपतीचेच रूप मानतात. त्यामुळे माहूत हत्तीवर चढण्यापूर्वी प्रथम गणपतीला नमस्कार करतो. गणपतीचा अपमान होईल या भयाने स्त्रिया हत्तीवर बसत नाहीत.

स्त्रियांच्या जीवनात असे जुने रीतिरिवाज पुष्कळच आहेत. अलिकडच्या काळात ही बंधने बरीच सैल होत आहेत. परंतु पूर्वीच्या काळी वागण्या-बोलण्याचेही नियम, संकेत असत. घरातली वृद्ध आजीबाई मुलींना, " मुलीच्या जातीनं मोठ्यानं बोलू नये, रस्त्यानं एकटं फिरू नये; चंचल, भडक पोषाक करू नये, लोक नावं ठेवतील असं वागू नये, नाही तर चांगला नवरा मिळणार नाही—" अशा तऱ्हेचा सदुपदेश सतत करीत असत. लग्न झाल्यावर सासूबाईही सुनेला सांगत असते,

" मुली, मोठ्यानं हसू नये. तू आता या घरची सून आहेस. कशाला पाय लावू नकोस. लोकांच्यामधून जाताना वाकून, हात पुढं करून, वाट काढून मग जात जा. वडीलधाऱ्यांचा सन्मान कर, डोक्यावर चांगला लांबलचक पदर घेत जा. रिहा घातल्याशिवाय बाहेर जाऊ नकोस, मोठ्या दिराच्यासमोर मान वर करून बोलू नकोस, " नाही तर जेटुवा ठास होशील."—आसाममध्ये घरच्या सुनेने जर मोठ्या दिराचा उपमर्द केला तर ती ' जेटुवा ठास ' होते—म्हणजे मेल्यावर तिचे तोंड पटकन जळत नाही, अशी समजूत आहे.

अशा तऱ्हेच्या आणखी पुष्कळ प्रथा जुन्या काळी रूढ होत्या. काही जुन्या वळणाच्या घरात त्या आजही आढळतात. सुनेने सारखे सारखे माहेरी जाणे इष्ट मानत नाहीत. पुरुष जर जास्त दिवस सासुरवाडीस राहिला तर ' समनीया '—म्हणजे घरजावई म्हणून त्याची समाजात निंदा होते.

**विवाह—विधी**

प्रत्येक प्रदेशात विवाहविधीत, जाती-जमातीनुसार फरक असतो. आसाम-मध्ये तसा आहेच. इकडे नवऱ्यामुलाला ' दरा ' आणि नवरीमुलीला ' ओईन्या ' म्हणतात. लग्नाची बोलणी सुरू होतात तेव्हा दरा किंवा ओईन्या या दोन्ही-कडची मंडळी एकमेकांना काही देत घेत नाहीत. उत्तर आसाम व दक्षिण आसाम यातही काही पद्धतीत फरक आहे.

अहोम लोकांची लग्ने दिवसा होतात. त्याला ' चीकलेग ' म्हणतात. अहोम लोकांच्या विवाहविधीला पुरोहित लागतोच असे नाही. अहोमांत लग्ना-साठी मोठा हुंडा द्यावा लागतो. याशिवाय अंथरूण, पांघरूण दोन वर्षे पुरतील एवढे कपडे, व संसाराची सगळी भांडीही द्यावी लागतात.

आसामातील ब्राह्मणांत वयाच्या ११ ते १३ या वर्षांच्या दरम्यान मुलीचा वाङ्‌निश्चय होतो. लग्न मात्र मुलगी वयात आल्यावर होते. पण वाङ्‌निश्चय झाला की मुलीचे लग्न झाल्यासारखेच मानतात. त्यामुळे यदाकदाचित नियोजित वराला जर लग्नापूर्वी मृत्यू आला, तर ती मुलगी लग्न न होताही विधवा बनते. तिला पुन्हा लग्न करता येत नाही. ब्राह्मणांशिवाय इतर जातीत मात्र मुलामुलींची लग्ने लहान वयात होत नाहीत.

काही उच्चवर्णीय हिंदूंत लग्नापूर्वी तीन, पाच किंवा सात रात्री अगोदर एक शुद्धिकरण विधी करतात. एका रात्री किंवा पहाटे वधू पक्षाकडील व वर

पक्षाकडील स्त्रिया स्वतंत्र रीतीने मिरवत गाणी म्हणत तळ्यावर जातात आणि शुद्धोदक घेऊन येतात. मग त्या जलाने वधूवरांवर प्रक्षोण करतात. नंतर त्यांना नवी वस्त्रे देतात. लग्नात होमहवनादि झाल्यावर वधूवर एकमेकांना पान देतात व लग्न समारंभ संपतो.

कलिता कायस्थांची लग्ने रात्री होतात. विवाह नक्की झाला की, वधूला अंगठी देण्याची पद्धत आहे. आजकाल या समारंभाला ' रिंगसेरिमनी ' असे नाव रूढ झाले आहे. एकमेकांना स्थळे पटली की मग पत्रिका पाहतात. ' सहिजोरा ' जुळला नाही तर विवाह होत नाही. नंतर पंचांग पाहून मुहूर्त नक्की करतात. मग मुलीला ' जोरन '—म्हणजे अहेर पाठविला जातो. जोरन धाडायलाही शुभ वेळ पहावी लागते.

शनिवारी व मंगळवारी जर विवाह असला तर काही वेळा तीन दिवस व काही वेळी पाच दिवस लग्नसमारंभ चालतो. साधारणपणे दोनतीन दिवस लागतातच.

उत्तर आसाममध्ये ' जोरन ' पाठविण्याच्या विधीला विशेष महत्त्व आहे. किती द्यावे याचे काही बंधन नाही. आपआपल्या ऐपतीनुसार व इच्छेनुसार जोरन धाडतात. साधारणपणे ५ ते ७ कपड्यांचे जोड, शक्यतेनुसार गळ्यातली सोन्याची साखळी, कर्णफुले आणि बांगड्या देण्याची पद्धत आहे. परंतु दक्षिण आसामात एक कपड्याचा जोड, अंगठी, तेल, शेंदूर, मासे, मिठाई व नारळ-सुपारी एवढे देतात. मुलीला आवश्यक वस्तू अंथरूण-पांघरूण माहेरून द्यावे लागते.

' दराबरन '— म्हणजे वरपूजेप्रमाणेच वधूपिता वराला सोन्याची अंगठी व पोषाख देतो. वरपक्षाकडून मुलीच्या वडिलांना, भावाला व जवळच्या नातेवाईकांना कापड देण्याची पद्धत आहे. मुलीच्या घरी या दोन-तीन दिवसात वरपक्षाच्या लोकांचा खूप मानसन्मान ठेवला जातो.

' जोरन ' घेऊन वरपक्षीय मंडळी जेव्हा वधूच्या घरी येतात तेव्हा दारातच वधूमाता वरमातेचे म्हणजे आपल्या विहिणीचे स्वागत करते. तिला ' उरली ' करणे म्हणतात. मुलीची आई व इतर सुवासिनी मुलाच्या आईला दारातून हाताला धरुन घरात आणतात. उच्चासनावर बसवतात व विवाहाची गाणी गाऊन तिचे मनोरंजन करतात.

वधूपिताही वरपक्षाकडून आलेल्या पुरुष मंडळींचे स्वागत करून पान-

सुपारीची ' हराई ' गामोशा चादर ठेवून अहेर म्हणून देतात.

आसाममध्ये विवाहगीते फार प्रचलित आहेत. आरंभापासून अखेरीपर्यंत प्रत्येक समारंभासाठी वेगवेगळी गीते आहेत. ही विवाहगाणी अतिशय मधूर व सुंदर आहेत.

जोरनच्या प्रसंगी– याला ' झुरण 'ही म्हणतात– वराची माता व्याह्याच्या घरी येऊन वधूच्या भांगात जेव्हा शेंदूर भरते त्या वेळी इतर सुवासिनी मंगलगीते गात असतात—

' मारुर् अलंकार ठुवा कातिकरी—ओ ऽ अी राम
देवतार् अलंकार ठुवा हे ऽ रामे दि पुठियासे
विचित्र अलंकार ताके शिरे हिपाती लुवा '

—आईकडचे अलंकार काढून ठेव. (मध्येच देवाचे नाव घेतात) वडिलांनी दिलेले अलंकार काढून ठेव. हे विचित्र अलंकार—जे प्रत्यक्ष परमेश्वराने तुझ्यासाठी पाठवले, ते तू नतमस्तक होऊन धारण कर!

या विधीपासूनच माहेरचे दागिने काढून ठेवून सासरचे दागिने घालायला सुरुवात होते. ह्या क्षणापासून मुलगी दुसऱ्याची झाली. अशा प्रकारे सर्व लग्न-सोहळा गात गात पार पडतो. यासाठी स्त्रियांनी केलेली गीतरचना अपूर्व अशी आहे.

' झुरण ' च्या प्रसंगी अलंकार, पोषाख इत्यादींबरोबरच वधूच्या हातात केळीच्या पानात गुंडाळलेली एक वस्तू ठेवतात. त्या पानात असतो चार साडेचार फूट लांबीचा मोठा, ताजा ताजा सितल मासा!

लग्नामध्ये नवऱ्यामुलाची मिरवणूक रस्त्यातच अडवायची पद्धत आहे. रस्त्यात एक बांबू टाकून ही मिरवणूक अडवतात. नवऱ्यामुलाकडून काही तरी उकळायची, मागून घेण्याची हीच वेळ असते. कधी कधी त्याची मजा करण्या-साठी म्हणून ' फुटकी कवडी ' किंवा ' तांब्याचा पैसा ' पण मागतात. वधूकडचे तरुण मुलगे साधारणपणे ह्या कामगिरीवर असतात. दहा रुपयांपासून हजार रुपयांपर्यंत रोख पैसे मागतात. मग ही मागणी परवडेल अशा रीतीने दोन्हीकडचे मध्यस्थ सामोपचाराने मिटवतात. तडजोड होते. वरपक्षाकडची मंडळी त्या तयारी-नेच आलेली असतात.

दारात वर आला की अभिनंदन दर्शक अशा आरोळ्या ठोकतात. वधूच्या घरात गाणे– बजावणे सुरू होते. आनंदी आनंद उसळतो.

मग वधूचे माता-पिता जामाताची पूजा करतात. जावई हा विष्णू समान आहे अशी त्यांची भावना असते. गाणी सुरू असताना आधी हरिनाम गातात, मग ' जोरानाम ' म्हणतात. जोरानाम म्हणजे थट्टामस्करीची गाणी. हसणे-खिदळणे यांना भरते येते. तशातच मग उखाणे सुरू होतात. नवऱ्यामुलाच्या वहिणीला, भावाला उखाणे घालून घालून जेरीस आणतात. वर पक्षाला चूप करतात.

नंतर नवऱ्यामुलाला हवनकुंडाजवळ बसवून मंत्रपाठ म्हणतात. संप्रदानाची वेळ झाली की, वराकडची मंडळी हातात सराई, पानसुपारी व रुपये घेऊन मुलीला आणायला घरात जातात.

नवरी मुलगी आपल्या आईच्या सोबतीने सर्वांना नमस्कार करीत करीत ' समरगुरी ' वर, म्हणजे बोहल्यावर चढते. मुलीला निरोप देणारी गाणी स्त्रिया गाऊ लागतात. वातावरणात कारुण्य भरून जाते. वेदमंत्र व संप्रदान झाल्यावर विवाहविधी पूर्ण होतो.

नंतर नवरा-नवरी आतल्या मांडवात जातात. रकातुली—दोघे अंगठ्या बदलतात. खीरवाटी, हाराडेरा असे काही खेळ होतात. मग जावायाला फराळाचे पदार्थ देतात; पण ह्या वेळी तो वधूगृही काही खात नाही. रात्री वधूला वरगृही आणण्याची पद्धत आहे. तिथे पण नंतर हे मौजेचे खेळ होतात. वधूही या वेळी वरगृही जलपान करत नाही. ती परत माहेरी येते. एक रात्र राहते. नंतर मग नव्या स्वगृही येते.

**सण—समारंभ**

भारतात इतर प्रांतात जसे सण—समारंभ, उत्सव आहेत, तसे आसामातही आहेत.

सण-समारंभाच्या मागे एक सांस्कृतिक व सामाजिक दृष्टी असते. त्या, त्या प्रदेशाची प्राकृतिक जडणघडण व तिथला निसर्ग यांचीही डूब त्या ठिकाणच्या उत्सवावर चढलेली असते.

आसाममध्ये सण-समारंभ आहेत, पण व्रतवैकल्ये मात्र नाहीत. याचे कारण येथील बहुसंख्य हिंदुसमाज मूर्तिपूजक नाही. नामसंकीर्तनावर त्यांचा विश्वास फार आहे. त्यामुळे ' नामघर ' येथे ठिकठिकाणी आढळते. श्रीशंकरदेव या आसामच्या महान् संतपुरुषाने शाक्त पंथातील कर्मकांडाचा अनाचार मोडून काढला व नाममहिम्याचा ' भागवती धर्म ' स्थापन केला. या नामघरातून मूर्ती नसते.

भागवताची पोथी असते. निराकाराची पूजा–प्रार्थना चालते. श्रीशंकरदेवाचे अनुयायी जे मूर्तीपूजक नाहीत त्यांना इकडे ‘ महापुरुष ’ म्हटले जाते. ते वैष्णव आहेत. देवदेवतांची पूजा करत नाहीत. शंकरदेवांनी म्हटले आहे.

‘ एक देव एक सेव, एक बिने नाई कियो । ’

–देव एकच आहे, दुसरा कुणीच नाही, तेव्हा त्याचीच सेवा करा.

याचा परिणाम होऊनच आसामी स्त्रियात व्रत-वैकल्ये, उपास तापास यांचा अभाव दिसून येतो. देव-देवतांचे फारसे अवडंबरही येथे नाही. शंकर, विष्णू, देवी यांची काही मोठी, पण तुरळक मंदिरे आहेत. देवळाला इकडे ‘ दोल ’ म्हणतात. पूजाअर्चा याचेही प्रस्थ फार आढळत नाही. पूजाद्रव्यात दूर्वांना स्थान आहे व त्यांना आसामी लोक ‘ दुर्वा ’ च म्हणतात.

**रंगाली बिहू**

महाराष्ट्रामध्ये चैत्र शुद्ध प्रतिपदा – ‘ गुढीपाडवा ’ – हा जसा वर्षारंभाचा दिवस असतो, तसा आसामात वैशाख शुद्ध प्रतिपदा हा वर्षारंभाचा दिवस असतो. म्हणजे महाराष्ट्रानंतर एक महिन्याने आसामचे नवे वर्ष सुरू होते.

या दिवसाला ‘ रंगाली बिहू ’ किंवा ‘ बहाग बिहू ’ असे म्हणतात. बहाग म्हणजे वैशाख. बिहू हा आसाममधला मोठा सण. वर्षातून तीन मोठे बिहू येतात. त्यापैकी वैशाखातील ‘ रंगाली बिहू ’ हा एक. आसाममध्ये या सणाला खूपच महत्त्व आहे. नववर्षाचा दिवस म्हणून आपण महाराष्ट्रात चैत्र पाडव्याला कडू-निंबाची कोवळी पाने व मोहोर खातो. आसामात कडूनिंबाची डहाळीच आणून घरात टांगतात आणि वैशाखाचा सबंध महिनाभर मधून मधून कडूनिंबाची चटणी करून खातात. या दिवसात देवी, गोवर, कांजिण्या या रोगांचा प्रादुर्भाव होत असतो, त्यावर हा त्यांचा प्रतिबंधक इलाज किंवा उतारा आहे. धार्मिक सणाशी सामाजिक आरोग्याची कल्पना अशी जोडलेली दिसते.

बहाग बिहू येतो वसंतऋतूच्या ऐन फुलत्या काळी. नव्या, कोवळ्या पाल-वींनी नाहर, सेमल, आम्र, चम्पा, लिचू आदी झाडे नटलेली असतात. देखण्या नाजुक मोहोरांनी मोहोरलेली असतात. नाना तऱ्हेची रंगीबिरंगी आणि सुगंधी फुले वेलीवर, झुडपांवर, रोपांवर डोलत असतात. कोकिळांना कंठ फुटलेला असतो. तो पंचम लावून गात असतो. त्याचे दुसरे आकाश-सोबतीही त्याला साथ देत असतात. धान्यलक्ष्मी प्रसन्न असते. अशा वेळी येणारा बिहू साजरा करणाऱ्या

आसामी माणसांची मनेही आनंदाने रंगून गेलेली असतात.— म्हणून तर हे — रंगाली बिहू.

बिहूच्या स्वागताची तयारी किती तरी दिवस आधी आसामी घराघरातून चालू असते. घराघरातील मागांवर सुरेख नक्षीचे ‘ गामोशे ’ विणले जात असतात.गामोशे म्हणजे एक प्रकारचे पंचे. पण त्यावर आसामी स्त्रिया खूप मेहनत घेऊन नक्षी, पाने—फुले—फळे अशी वेलबुट्टी विणत असतात. बिहूला गामोशांचीच भेट आप्तस्वकीयांना, इष्टमित्रांना द्यावयाची असते. ह्या भेटीला ‘बिहूवान’ असे म्हणतात. बिहूचे बिहूवान !



बिहू-नृत्यवादक

घराघरातून ‘ चिरापीठा ’— म्हणजे पोहे व तांदळाचे पीठ कुटण्याचा आवाज येऊ लागतो. मग घरोघरी लाह्या, चिवडा, पोहे, दही, मिठाई बनवली जाते. तसेच तीलपीठा, फेनीपीठा, लावपीठा, नारिकोलपीठा आदी विविध प्रकारचे गोडधोड पदार्थ तयार केले जातात. घरे शृंगारली जातात, आणि रंगाली बिहू मग सात दिवस मोठ्या उत्साहात रंगलेला असतो. साती दिवस आसामी तरुण-तरुणी बिहू नाचत

असतात. बिहू गात असतात. बिहूची अनेक गीते आहेत. बिहूगीतातून हौसे-मौजेच्या भावभावना जशा रंगवलेल्या असतात, तशाच करुण, कोमल भावनाही रेखाटलेल्या असतात. आसामी स्त्रिया स्वतः विणलेला गामोशा, धोतर, चादर वगैरे वस्तू परिवारातील वडील मंडळींना 'बिहूवान' म्हणून देतात. लहानांनी मोठ्यांची सेवा-आदर करायचा व मोठ्यांनी लहानांना स्नेह द्यायचा असा हा समारंभ असतो. जर कुणी कुणावर रागावले तर त्यांचे वर्ष रागातच जाईल असे मानतात, म्हणून स्नेह, प्रेम, आदर व्यक्त केला जातो. एका बिहू गीतात एक मातृविहीन बालक म्हणत आहे—

**बारिर् कुमलिया लाये, मूर गुरुवोई**<br>
**बारीत कुमलिया आय ।**<br>
**आमार् बिहुर् कापूड कोने बोई दिबो,**<br>
**होकते मरी गोल आय ।**<br>
**बिहू अति सराय, आमार्**<br>
**बिहून कापूड नाय ।**<br>
**हुमनियाई खुदिले, कोम की जे बुलि,**<br>
**होरूते मरी गोल आय ।**

—परसात दुध्या, भोपळा व भाज्यांचे वेल खूप आले आहेत; पण मला या बिहूत कोण कापड विणून देणार? माझी आई लहानपणीच वारली आहे. बिहूमुळे किती तरी सुंदर पक्षी झाडांवर दिसत आहेत. पण मला मात्र बिहूचा पोषाख नाही. माझ्या मित्रांनी विचारले तर काय सांगू? त्यांना सांगून टाकीन की, मी लहान असतानाच माझी आई मरून गेली आहे, मग कोण बरं माझ्यासाठी गामोशा विणणार?

बिहू-कालात आपल्या ऐपतीनुसार पाहुण्याचे स्वागत केले जाते. रात्री 'हुसरी' गाणी, म्हणजे टोळक्यांनी जमून घरोघरी गायलेली गीते गाण्याची पद्धत आहे. ज्याच्या घरी 'हुसरी' गात जातात त्याने ह्या मंडळींना नमस्कार करून तबकात गामोशा, पानसुपारी, रुपये देऊन त्यांचे स्वागत करायचे असते. मग हुसरीवाले संतुष्ट होऊन त्या यजमानाला आशीर्वाद देतात. आणि असे स्वागत जर केले नाही तर, त्या यजमानाची उन्नती होत नाही, अशी समजूत आहे.

ही ' हुसरी ' गाणी फार मधुर असतात. ढोल, खोल, झांजा, गगना वगैरे वाद्यांची त्याला साथ असते. म्हशीच्या शिंगाच्या केलेल्या तुताऱ्या व ' टोका ' पण असतात.— ह्या विशिष्ट प्रकारच्या तुतारीला ' पेपा ' म्हणतात; आणि बांबूचे गोसाव्याच्या चिमट्यासारखे एक वाद्य असते त्याला ' टोका ' म्हणतात.



बिहू—नृत्य

आसामी युवक डोक्याला लाल किनारीचे गामोशे बांधतात. तरुणी लाल किनारीच्या रिहा-मेखला परिधान करतात. हाताला मेंदी लावतात. भांगात शेंदूर भरतात. लाल रंग यौवनाचे प्रतीक समजतात. यजमानाला आशीर्वाद देताना ' हुसरी ' गातात—

**एटा बाटीत् नोहरू, एटा बाटीत् पनस**
**एटा बाटीत् खुटुरा शाक—**
**मुरर् चूली सिंगी, आशिर्वाद करि मूँ**
**' गृहस्थ, कुशले ' थाक।**

— एका वाटीत खीर आहे, दुसरीत गोड मिठाई आहे, एका वाटीत खुट्टुरा पालेभाजी आहे. तुझ्या मस्तकाला हात लावून, हे गृहस्था, आम्ही तुला आशीर्वाद देतो की तू सदा सुखी राहशील !

असा हा रंगाली बिहू हसत-नाचत-गात-गात वर्षारंभीच साजरा होत असतो.

**गोस बिहू**

रंगाली बिहूच्या आदल्या दिवशी, म्हणजे फाल्गुन अमावास्येच्या दिवशी गोस बिहू हा सण साजरा करतात. महाराष्ट्रात जनावरांचा जसा ' पोळा हा सण साजरा करतात, तसाच हा गोस बिहूचा सण.

या दिवशी घरोघरी गायीच्या अंगाला हळद व उडदाच्या डाळीचे पीठ लाऊन, खूप चोळून माळून आंघोळ घालतात. जुनी दावी काढून टाकतात आणि नवी घालतात. गुरांच्या गळ्यात वांग्या-भोपळ्यांच्या माळा घालून गाणी म्हणतात—

**दीघलती दीघल पत**
**माखी मारु जट जट**
**मार सानु बापु सानु**
**ताई हबी बंगारु**

—दीघलतीची (आसामातली एक वनस्पती) पाने लांब मोठी असतात, त्यांनी मी माशा मारतो. तुझी आई ल्हान खुरी, तुझा बाप ल्हान खुरा; पण तू मात्र थोराड होशील !

गाईला दुध्या अगर तांबडा भोपळा खाऊ घालतात. जमिनीवर भाज्यांचे दांडे आपटून प्रेमाने म्हणतात—

**लाव खा बेंगना खा —**
**बसरे बसरे बाढी जा**
**मार् होस बापेट होस**
**तयी होबी बर् गोस !**

—भोपळा खा, वांगी खा, वर्षावर्षाला वाढत जा. आई ल्हान बाप ल्हान, पण तू मोठी होऊन जा !

ह्या दिवशी सर्वजण भात खातात व जेवण झाल्यावर रात्री स्वयंपाकघर, भांडीकुंडी सर्व घासून लख्ख करतात. गोठ्यापुढे शेकोटी पेटवून डास–चिलटे हाकलून लावतात. तांदळाचे पीठ व काकवी यांचे पक्वान्न गुरांना खाऊ घालतात.

आपल्या पाळीव जनावरांवरील प्रेम व्यक्त करण्याचा हा सण अर्थपूर्ण आहे.

**हाट**

आषाढाच्या शुक्ल पक्षात कामाख्या देवीचा अंबुवाची उत्सव साजरा करतात. याला आसामी लोक 'हाट' असे म्हणतात. या दिवसात पृथ्वी ऋतुमती होते, असे म्हणतात. तीन दिवस देवळाचे दरवाजे बंद ठेवतात. हा आसामातील एक प्रमुख धार्मिक उत्सव आहे. या काळात जमीन नांगरणे, बीज पेरणे इत्यादी कृषीविषयक क्रिया वर्ज्य मानतात.

**दुर्गापूजा**

दुर्गापूजेची प्रथा अठराव्या शतकात राजेश्वर सिंहाची राणी फुलेश्वरी



दुर्गापूजा

कुंवरी हिने सुरू केली. ती शाक्त पंथी होती. आसाममध्ये शाक्तपंथाचे अनुयायी एकेकाळी खूपच होते, आजही काही आहेत. हे शिवाला पूजतात, पण शिवपत्नी दुर्गा हिलाही मातृदेवता म्हणून भजतात. आसामी स्त्रिया आपली इच्छा-आकांक्षा पूर्ण व्हावी यासाठी दुर्गेची करुणा भाकतात. बंगालप्रमाणेच आसाममध्येही आश्विन महिन्यातील नवरात्रात दुर्गापूजेचा उत्सव थाटामाटात साजरा होतो.

दुर्गादेवीच्या जीवनातील दोन घटनांना या उत्सव प्रसंगी विशेष स्थान असते. लोकांच्या कल्याणासाठी तिने महिषासुराचा वध केला, ही त्यापैकी एक घटना आहे. महिषासुराचे प्रतीक म्हणून या उत्सावात तिला रेडा बळी देतात. उमा हे दुर्गेचे दुसरे रूप आहे. कैलासाधिपती शंकराशी उमेचा विवाह झाल्यावर ती प्रथमच माहेरी येते, ही दुसरी घटना होय. या घटनेचे स्मारक म्हणून दुर्गापूजेच्या वेळी कुटुंबातल्या माहेरवाशिणी घरी आणतात. हा दुर्गापूजेचा उत्सव म्हणजे आसामी लोकांना आनंदाची पर्वणीच असते.

आद्य शक्तीचे काली हे स्वरूपही आसामात पूजनीय ठरले आहे. दुर्गापूजेनंतर एका महिन्याने कालीपूजेचा उत्सव साजरा करतात. आसामातील चहाच्या मळ्यातील कामगार या उत्सवात विशेष उत्साहाने भाग घेतात. या वेळी देवीला एक काळा बकरा व बाकीचे पांढरे बकरे बळी देतात.

**बिसवरी पूजा**

आसाममधील काही खेड्यांमधून ‘ बिसवरी पूजा ’ हा उत्सव खेडूत लोक साजरा करतात. शिव, ब्रह्मा, विष्णु, इंद्र आदी सात देवांच्या पत्नींची ह्या वेळी पूजा करण्याची प्रथा आहे.

**काती बिहू**

शेतामध्ये पेरणी झाल्यावर जेव्हा बीजाला अंकुर फुटून ते भुईवर डोकावू लागतात. त्या वेळी ‘ काती बिहू ’ हा सण येतो. या सणाच्या दिवशी शेतात भरघोस पीक यावे, म्हणून देवाची प्रार्थना करतात. संध्याकाळी शेतकरी लोक शेतावर जाऊन उभ्या पिकाला हलकेच काठीने मारतात. असे केल्याने कृमी, कीटक, रोगजंतू, पशू, पक्षी व दुष्टांपासून पिकाचे रक्षण होते अशी श्रद्धा आहे. रात्री पीक राखण्यासाठी शेतात ‘ छाकी ’ लावून ठेवतात. छाकी म्हणजे तेवती पणती.

**कंगाली बिहू**

कार्तिक महिन्यात ' कंगाली बिहू ' हा सण येतो. या वेळी शेती ओसाड असते. खायला-प्यायला कमी असते, म्हणूनच याला ' कंगाली ' म्हणतात. यावेळी गोरगरिबांना अन्नदान करतात. तुळशीवृंदावनात तुळशीचे रोप लावतात. तिच्यापुढे एका डब्यात तेवती पणती अखंड महिनाभर ठेवतात. तिला ' आकाश बनती ' म्हणतात. रोज तुळशीची पूजा करतात. नैवेद्य आदि दाखवतात. देवाचे नामस्मरण करतात.

**भोगाली बिहू**

हा बिहू माघ महिन्यात येतो. माघी संक्रांत हाही एक आसामातील मोठा उत्सव असतो. या दिवसात जो जितके अन्नदान करील तितके त्याचे दिवस चांगले सुखात जातील असे मानतात.

माघ बिहूच्या आधी शेतात छोट्या छोट्या झोपड्या बनवतात. त्यांच्याजवळच मोठमोठी लाकडे रचून एखाद्या स्तूपासारखा आकार तयार करतात. त्याला ' मेजी ' म्हणतात. छोट्या झोपड्यांतून मंडळी एकत्र जमून ' भोज ' म्हणजे जेवण करतात. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठतात, कोंबडा आरवायच्या आधीच स्नान वगैरे करून शुचिर्भूत होतात. आणि मग ती झोपडी व तो ' मेज ' पेटवून देतात. आसामातील ही होळीच असते. या उत्सवाला अग्निपूजा असेही म्हणतात. गृहिणी होळीची पूजा करतात.

होळीच्या भोवती बसून बटाटे, रताळी भाजून खातात. होळीला मिठाईचा नैवेद्य दाखवतात. लहान मुले मोठ्यांची सेवा करतात. या काळात सुगीचा आनंद असतो. तांदूळ, पोहे आदी धान्ये पुष्कळ असतात, म्हणून ह्याला ' भोगाली बिहू ' म्हणतात.

या दिवशी जनावरांच्या शर्यती व रेड्यांच्या झुंजी लावतात. अहोम राजांच्या कारकीर्दीत या दिवशी रेडे, वाघ, हत्ती यांच्या शर्यती लावीत असत. माघ बिहूच्या दिवशी ब्रह्मपुत्रेसारख्या नदीत स्नान करणे पुण्यप्रद मानतात.

□ □

# भाषा आणि साहित्य

आसामची भाषा आहे असमिया. या भाषेचा इतिहास सातव्या शतकापासून उपलब्ध होतो. सातव्या शतकाच्या पूर्वार्धात कामरूपाचा राजा भास्करवर्मा याच्या निमंत्रणावरून ह्यूएनत्संग या चिनी यात्रेकरूने या प्रदेशाला भेट दिली होती. त्याचे वृत्त लिहिताना त्याने तत्कालीन भाषेसंबंधी उल्लेख करताना म्हटले आहे, " भारताच्या मध्यभागातील भाषेत आणि कामरूपाच्या भाषेत किंचित भिन्नता आहे."

सातव्या शतकातील उपलब्ध ताम्रपट व शिलालेख यांवरूनही प्राचीन असमिया भाषेचे जुने रूप कळून येते. बंगालमधील एक विद्वान पं. हरप्रसाद शास्त्री यांच्या हाती नेपाळमधील बरेचसे प्राचीन भारतीय साहित्य आले होते. ते त्यांनी 'बौद्ध गान उ दोहा' नामक पुस्तकात प्रसिद्ध केले आहे. त्या प्राचीन साहित्याच्या भाषेला बंगाली, उडिया आणि आसामी लोक आपल्या भाषेचा सर्वात प्राचीन नमुना मानतात.

विद्वानांच्यां मते 'इंडो—युरोपियन' भाषेपैकीच असमिया ही एक भाषा आहे. परंतु या भाषेवर मंगोल परिवारातील म्हणजे चीन, तिबेट, कंबोडिया आदी देशातील भाषांचाही प्रभाव पडलेला आहे. असमिया भाषेत बरेचसे मंगोल भाषेतील शब्द आहेत. खुद्द 'असम' हा शब्दच मंगोल भाषेतील आहे. असम म्हणजे विजेता! सध्याची असमिया लिपी ही देवनागरी वर्णमालेतूनच विकसित झालेली आहे. प्रारंभीच्या काळात असमिया लिपीची गरगया, बामुनिया, लखारी, कैथिली अशी अनेक रूपे व नावे होती. परंतु शेवटी कालांतराने या सर्व लिप्या एकाच लिपीत विलीन होऊन गेल्या ब्रिटिश काळात कलकत्त्याजवळ श्रीरामपूर येथे पहिला छापखाना इंग्रजांनी घातला आणि असमियाची पुस्तके बंगाली लिपीमध्ये छापायला सुरुवात केली, तेव्हापासून असमियाने काही परिवर्तनासह बंगाली लिपीदेखील आत्मसात

केलेली आहे. वस्तुतः मैथिली, बंगाली आणि असमिया या तीनही लिपींचे उगम-स्थान एकच आहे. असमिया भाषा, तिची वर्णमाला आणि लिपी यांच्या विकासात आर्य भाषांचा संपूर्ण सहयोग असला तरी असमिया भाषा आपल्या उगमस्थानातल्या दुसऱ्या भाषांचे शब्द आणि ध्वनी यांच्या प्रभावापासून मुक्त राहू शकलेली नाही. म्हणूनच अन्य भारतीय भाषांच्या वर्णोच्चारापेक्षा असमिया वर्णोच्चार भिन्न आहेत. असमियाचे सर्व ध्वनी कोमल आहेत.

असमियाची शब्दावली प्रामुख्याने संस्कृतच आहे. त्या शब्दांची रूपेही संस्कृत व्याकरणावरच आधारित आहेत. असमियाची वाक्यरचना आर्य भाषां-प्रमाणेच आहे. तिच्यात कर्ता, कर्म आणि क्रियापद असाच क्रम असतो. मराठीला किती तरी जवळचे असे शब्द असमिया भाषेत आहेत. उदाहरणार्थ, फुरोनी म्हणजे फोडणी, बित्तंबातुरी म्हणजे बित्तंबातमी, तूरपरा म्हणजे तुझ्यापरीस, हेराईले म्हणजे हरवले, असे बरेच शब्द आहेत. विशेष म्हणजे आसामी लोक 'आई'ला 'आई'च म्हणतात. बापाला 'बापई' म्हणतात. बाईला 'बाई' आणि काकाला 'ककाई' म्हणतात.

**आदियुग**

असमिया भाषेत साहित्य निर्मिती होण्यापूर्वी त्या देशात 'डाक' नावाचा एक तत्त्वज्ञ होऊन गेला. डाकच्या वचनांना आजही वेदवाक्याइतकी मान्यता आसामात आहे. ही वचने 'डाकारवचन वेदारवाणी' या नावाने आता प्रसिद्ध आहेत. पूर्वी अलिखित स्वरूपात असलेल्या ह्या वचनात कृषी, ऋतू, औषधी आणिं राजनीती या व्यतिरिक्त गृहजीवनातील दैनंदिन समस्यांवरही मार्गदर्शन आहे. डाकची वचने बंगाल व बिहारमध्येही प्रचलित आहेत. डाक हा कामरूप जिल्ह्यातील लेहीडांगर गावचा रहिवासी होता. या वचनांचा रचनाकाल मात्र अज्ञात आहे.

असमिया साहित्यात लिखित साहित्याचा उदय हेमसरस्वती या ग्रंथकारा-पासून होतो. हेमसरस्वती तेराव्या शतकात होऊन गेला. ह्याने वामन पुराणातील प्रल्हादाची कथा घेऊन 'प्रल्हाद चरित' हे काव्य लिहिले. त्याचे नऊशे पदांचे 'हर गौरी संवाद' काव्यही उपलब्ध झाले आहे.

याच सुमारास हरिहर विप्र आणि कविरत्न सरस्वती असे आणखी दोन प्रसिद्ध कवी होऊन गेले. हरिहरने 'बभ्रूवाहनर–युद्ध' आणि 'लव कुशर

युद्ध ' ही काव्ये लिहिली.

काचार नरेश महामाणिक्य याच्या दरबारात चौदाव्या शतकातील मोठा महाकवी होऊन गेला. त्याचे नाव होते माधव कंदली. ' कविराज कंदली ' या नावाने तो विख्यात होता. हा संस्कृतचा महान पंडित होता. महामाणिक्य राजाच्या आश्रयाखाली याने आसामी भाषेत वाल्मिकी रामायणाचा अनुवाद केला होता, पण दुर्दैवाने असम-काचारी युद्धाचे वेळी यातील आदिकांड व उत्तरकांड नष्ट झाले. माधव कंदलीचे दुसरे काव्य ' देवजित ' प्रसिद्ध आहे. कंदलीच्या काव्यात असमिया भाषा आपल्या प्राकृतिक रूपात प्रकट झाली आहे. ' देवजित् ' काव्य-रचनेत संगीताची मधुरता आणि अलंकारिक भाषा यांचा सुंदर संगम झालेला आहे. काव्याचा हा ढंग असमियाला त्या वेळी एकदम नवीन होता. या रचनेचा प्रभाव पुढे सुमारे शंभर वर्षांनी वैष्णव कवींच्या रचनेवर उमटलेला दिसून येतो.

कंदलीच्या आगेमागेच आणखी काही कवी होऊन गेले. दुर्गाबार नावाच्या कवीने लौकिक गेय छंदात रामायण रचले, तर पितांबर कवीने, ' उषापरिणय ' हे गीतकाव्य रचले. आसामात हे गीतकाव्य फार लोकप्रिय आहे.

मनकर नामक कवीने मनसादेवीची कहाणी ' वेहुला लखीन्दर ' नावाने गीतात लिहिली. मनसा ही सर्पांची देवता आहे. तिची कथा असलेले हे काव्य घरोघर गायले जाते.

अशा प्रकारे असमियाच्या प्रारंभ काळी संस्कृत पुराणांवर अधारित किंवा अनुवादित स्वरूपाची काव्यरचना जशी झाली, तशीच लोकगीतात्मक काव्य रचनाही झाली.

**वैष्णवकाल**

पंधराव्या शतकात नवीन वैष्णव प्रणालीने असमिया साहित्याला कला-सौष्ठव प्राप्त करून दिले. या नव्या वैष्णवी प्रवृत्तीचे प्रवर्तक होते. श्रीशंकरदेव.

या वेळी कुचबिहारच्या गादीवर नरनारायण नावाचा राजा होता. आणि मध्य व पश्चिम आसाम हीच संस्कृती केन्द्रे होती. नरनारायण राजा स्वतः विद्वान आणि विद्याव्यासंगी होता. त्याने कवी, ग्रंथकार, पंडित आदींना उदार आश्रय दिला. त्याच्या कारकीर्दीत कुचबिहारची राज्यसभा अनेक विद्वानांनी भरलेली होती. वैष्णवयुगातील सर्व विख्यात कवी आणि पंडित शंकरदेव, माधवदेव, रामसरस्वती, सार्वभौम भट्टाचार्य आणि पुरुषोत्तम विद्यावागीश नामक महान वैयाकरण आदी

राजसभेतील विद्वत्‌रत्ने होती. नरनारायण राजाची कारकीर्द असमिया साहित्याच्या इतिहातील सुवर्णयुग म्हणून ओळखली जाते.

आसाममध्ये प्राचीन काळापासूनच शाक्तपंथाचा जोर होता. अहोम आणि कोच राज्यांनीही काही काळ या पंथाला पाठिंबा दिला होता. परंतु वैष्णवपंथाच्या आंदोलनाने साऱ्या आसामला प्रभावित केले आणि आपल्याकडे ओढून घेतले. तथाकथित पंडितांची हृदयहीन बौद्धिकता आणि कर्मकांडाचे भलतेच अवडंबर



श्रीशंकरदेव

याविरुद्ध लोकांत असंतोष होताच. शंकरदेव या वैष्णव–आंदोलनाचे अग्रदूत होते. त्यांनी स्वतः रचलेल्या व लोकप्रिय झालेल्या विपुल असमिया साहित्याच्या द्वारा कृष्णभक्तीचा आणि एकेश्वरवादाचा सर्वत्र प्रचार केला.

असमिया साहित्याचे जनक, वास्तविक पहाता, शंकरदेवच आहेत. शंकरदेवांचा जन्म नौगाँव जिल्ह्यातील बारडोआ नावाच्या गावी इ. स. १४४९ साली भाद्रपदात झाला. थोर संस्कृत पंडित महेंद्र कंदली यांच्याजवळ त्यांनी संस्कृतचे अध्ययन केले. अक्षरओळख होताच त्यांनी पुढील रचना केली.—

**करतल कमल, कमलदल नयन**
**भवदव दहन, गहनवन शयन।**
**नपर नपरपर सतरत गमय,**
**सभय, मभय, भय मम हर सततय॥**
**खरतर वरशर हत दशवदन**
**खगचर नगधर फनधर शयन।**
**जगदघ मवहर भवभय तरम**
**परपद लयकर कमलज नयन॥**

—कमल-फुलासारखे तुझे हात आहेत, कमलपत्राप्रमाणे तुझे डोळे आहेत. तू संसार-दुःखे हरण करणारा आहेस, तू सर्वांचा आत्मा आहेस. माझ्या भयाचा नाश करणारा तूच आहेस. तुझ्याच हाती मी सुरक्षित आहे. तेजस्वी लोकांना तूच जन्म देतेस. तू दशानन, दुष्ट, आणि पापी जनांचा संहारक आहेस. तुझे वाहन गरुड आहे. तू पर्वत पेलणारा आहेस, नागफणीवर नाचणारा आहेस. तू जगातील पाप नष्ट करतोस, दुःखापासून तूच विश्वाचे रक्षण करतोस, हे कमलनयन भगवान, तू अलौकिक सौंदर्यदाता आहेस. मी तुझी प्रार्थना करतो.

पिता आणि प्रथम पत्नीच्या निधनानंतर शंकरदेवांनी भारत–यात्रा केली. गुरु महेंद्र कंदली व अन्य सतरा व्यक्ती या यात्रेत होत्या. उत्तर व दक्षिण भारतामधील सर्व तीर्थस्थाने पाहिली. त्या त्या ठिकाणी त्या काळच्या वैष्णव सुधारकांशी त्यांचा संपर्क आला, त्यांच्याशी शास्त्रार्थ झाला. याचा फार मोठा परिणाम शंकरदेवांच्या मनावर झाला.

या यात्रेला त्यांना बारा वर्षे लागली. शंकरदेवांना शास्त्रीय साहित्याची जाण उत्तम प्रकारची होती व अध्यात्माकडे त्यांचा ओढा तरुणपणापासूनच होता.

यात्रेवरून परतल्यावर त्यांनी परत गृहस्थाश्रम स्वीकारला. कालिंदी नामक एका कायस्थकन्येशी विवाह केला. परंतु त्याच वेळी भागवत धर्माच्या प्रचारार्थ झटण्याचाही संकल्प केला. हा धर्म आसाममध्ये 'एकाशरणीय' नावाने विख्यात आहे.

श्रीमद्‌भागवताचे सखोल अध्ययन केल्यानंतर शंकरदेवांचे मन आणखी निःशंक बनले आणि भागवताच्या आधारानेच भगवान श्रीकृष्णाच्या भक्तीचा प्रचार करण्यास सुरुवात केली. कृष्णभक्तीमधील साधेपणा, भजन, कीर्तन व प्रार्थना यामुळे जनमानस आकृष्ट झाले व हा पंथ लोकप्रिय झाला.

शंकरदेवांनी आपले विचार लोकांपुढे मांडण्यासाठी कविता, गीत आणि नाटक या साहित्य प्रकारांचा प्रभावीपणाने उपयोग करून घेतला.

शंकरदेवांनी 'भागवत पुराण' 'रामायण' –उत्तरकांड,' 'रुक्मिणी-हरण',–काव्य, 'निविनव सिद्ध', 'वैष्णवामृत', 'भक्तिरत्नाकर' (संस्कृत), आणि 'कीर्तनघोषा' इत्यादी सुमारे तीस ग्रंथ लिहिले. 'कीर्तन–घोषा' ही शंकर-देवांची रचना फारच लोकप्रिय ठरली. आसामच्या घराघरातून आजही हा ग्रंथ आढळतो. यात नाममहिमा गायिला आहे. तेरा अध्यायांची ही रचना असून दोन हजार दोनशे एकष्ट पदे आहेत. या अमूल्य काव्यात अनेक पदे, दुलरी, छवि, झुमरी इत्यादी यथास्थळ उपयुक्त अशा विविध छंदांचा वापर केलेला आहे. त्यातील उपमा, अनुप्रास आदी काव्यगुण पाहून मन प्रसन्न–चकित होते. शंकरदेवांच्या समग्र धार्मिक तत्त्वज्ञानाचे सार म्हणजे हा ग्रंथ होय.

शंकरदेवांनी नाटक आणि भजन या साहित्यप्रकारांनीही असमीया साहित्यसृष्टी संपन्न केली आहे. 'अंकिया नाट' नावाने प्रसिद्ध असलेली शंकर-देवांची नाट्यरचना ही असमिया भाषेला मोलाची देणगीच आहे. अंकिया नाट ही नाटके एकांकीच आहेत. ह्या नाटकांतून पद्यही आहे. ही गीते 'ब्रजबुलि' भाषेत आहेत. 'रुक्मिणी-हरण', 'कालिय-दमन', 'पारिजात-हरण', 'राम-विजय', आणि 'पत्नी-प्रसाद' ही त्यांची नाटके प्रसिद्ध आहेत. त्यांचे सर्वप्रथम नाटक 'चिन्हयात्रा' अप्राप्य आहे. शंकरदेवांच्या नाटकांची भाषा मैथिली आणि असमिया यांचे मिश्रणातून बनलेली आहे. विद्यापती कवीची ग्रंथसंपदा अभ्यासिल्यामुळे कदाचित शंकरदेवांच्या भाषेवर मैथिलीचा प्रभाव पडला असावा, असे विद्वानांचे मत आहे. बारा वर्षांच्या भ्रमण काळात शंकरदेव वृन्दावन येथे

राहिले होते व तेथे त्यांनी ' ब्रजभाषा ' आत्मसात केली होती. आपल्या अनुयायांसाठी त्यांनी मिश्रित भाषेत ' बड़गीत ' नावाचे अति कोमल भावनांनी, सात्त्विक विचारांनी व काव्य सौंदर्यांनी परिपूर्ण अशी गीते लिहिली. काशीमध्ये त्यांची कबीरांच्या शिष्यांशीही मुलाखत झाली होती. कबीराच्या चौतीसा पद्यांनीही शंकरदेव पुष्कळच प्रभावित झाले होते व त्याचा परिणाम म्हणजेच त्यांनी असमियामध्ये ' चतिहा ' पद्यांची रचना केली.

शंकरदेवांच्या काही ' बड़गीतां 'मधून बाळकृष्णाच्या अवखळ लीलांचे व यशोदा मातेच्या वात्सल्याचे अनुपम सुंदर असे चित्रण आहे.

शंकरदेवांनी जातीयता, सोवळे—ओवळे इत्यादी कर्मठपणाला विरोध करून धर्माला नवी झळाळी दिली. एका गीतात त्यांनी म्हटले आहे—

**कृष्णर भकति आति**
**नचावे आचार जाति**
**जगतरे महा हितकर**
**येन अमृत पाइले**
**येह सेह मते खाइले**
**सबे हब अजर अमर**

— कृष्ण भगवंतावर ज्याची अगाध भक्ती आहे तो कसलीही जात-पात मानत नाही. हेच जगताच्या दृष्टीने कल्याणकारी आहे. अमृत कशाही रीतीने सेवन केले तरी ते अजर व अमरच करणार !

शंकरदेव हे प्रतिभावान कवी, नाटककार तर होतेच, पण ते उत्कृष्ट धर्मप्रचारक, विचारवंत, उत्तम गायक, यशस्वी नट व नृत्यविशारदही होते.

शंकरदेवांनी आसाममध्ये धर्म, कला आणि साहित्य या क्षेत्रात अपूर्व अशी कामगिरी केलेली आहे. आज आसामच्या प्रत्येक गावात ' नामघर ' आढळते. कृष्णभक्तीत रंगलेले भक्त तिथे नामस्मरणात दंग असतात. इ. स. १५६८ साली वयाच्या ११९ व्या वर्षी शंकरदेवांनी इहलोक सोडला.

शंकरदेवानंतर त्यांचाच शिष्य माधवदेव यांनी समर्थपणे वैष्णव मतप्रसाराचे आंदोलन आसाममध्ये चालविले. माधवदेव प्रारंभी स्वतः शाक्त होते, पण नंतर शंकरदेवांच्या प्रभावाखाली आल्यावर कट्टर वैष्णव बनले. त्यांच्या या मतपरिवर्तनाने आसाममधील या आंदोलनाला मोठेच बळ प्राप्त झाले. माधवदेव विद्वान होतेच,

पण उत्कृष्ट गायक व नाटककारही होते. ते आजन्म विवाहित राहिले. पुढे त्यांच्याच प्रेरणेने आजीवन ब्रह्मचर्य पाळणाऱ्यांचा 'केवलिया' नावाचा एक संप्रदायच रूढ झाला.

शंकरदेवांच्या दुसऱ्या परिभ्रमणाच्या वेळी माधवदेवही त्यांच्याबरोबर होते. माधवदेवांनी 'नामघोषा', 'रामायण'—आदिकांड, 'भक्तिरत्नावली', 'नाम-मालिका', 'राजसूय यज्ञ,' 'वैष्णव कीर्तन,' इत्यादी काव्यग्रंथ लिहिले आणि 'चौर-धरा', 'पिपरा-चुबा', 'भूमि-लोटोवा,' 'भोजन-बहार' आणि 'अर्जुन-भजन' ही नाटके लिहिली.

काव्यक्षेत्रात 'नामघोषा' व 'भक्तिरत्नावली' ह्या दोन अत्यंत सफल अशा रचना मानल्या जातात. यात संस्कृत श्लोकांचा असमियात अनुवाद असून त्यावर माधवदेवांच्या उदात्त व्यक्तित्वाचा ठसा उमटलेला आहे. परंतु वैष्णव आंदोलनात त्यांच्या बडगीतांनी भरपूर लोकप्रियता व यश मिळवून दिले आहे. अभिव्यक्तीमधील माधुर्य आणि उदात्त आध्यात्मिक भावनांचे नैसर्गिक चित्रण व कृष्णाच्या बाललीला यामुळे ही बडगीते आजही आसामी घराघरातून गुंजत असतात. ही गीते ब्रजबोलीत आहेत.

इ. स. १५९६ मध्ये कूचबिहार येथे माधवदेवांचा देहांत झाला.

माधवदेवांच्या समकालीन असमिया भाषेतील मोठा साहित्यकार म्हणजे राम सरस्वती. याचा जन्म एका ब्राह्मण परिवारात कामरूप जिल्ह्यात सोळाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात झाला. कूचबिहारचा राजा नरनारायण याच्याशी शंकरदेवांनीच रामसरस्वतीचा परिचय करून दिला आणि शंकरदेवांच्या सूचने-नुसारच नरनारायण राजाने रामसरस्वतीला संस्कृत महाभारताचा अनुवाद करण्याची विनंती केली. ह्या कार्याला नरनारायण राजाच्या कारकीर्दीत प्रारंभ झाला आणि शुक्लध्वज राजाच्या कारकीर्दीत ते पूर्ण झाले.

या अनुवादित महाभारतात लेखकाने पूर्ण स्वातंत्र्य घेतले असून राम सरस्वतीने आपल्या तीक्ष्ण कल्पनाशक्तीच्या बळावर मूळ ग्रंथात नसलेली, पण अनुरूप आणि सरस अशी कथानके चित्रित केलेली आहेत. यामल संहिता, शिव रहस्य, वामन पुराण आदी ग्रंथांतील काही घटनाही या महाभारतात घेतल्या आहेत.

असमिया भाषेतील या अनुवादित महाभारताने असमिया साहित्य समृद्ध केले असून अनेक प्रकारच्या कथांचे भांडारच खुले केलेले आहे. या ग्रंथामुळे

असमिया साहित्याची अभिवृद्धी झाली. संपन्नता वाढली.

राम सरस्वतीने 'कुलाचल-वध', 'बकासुर-बध', 'खटासुर-बध' अशी महाभारतातील प्रसंगांवर आधारित वध-काव्ये मोठ्या ओजस्वी भाषेत लिहिली आहेत. 'भीम चरित' या काव्यात त्याने आसामच्या ग्रामीण जीवनाचे मोठे रोचक आणि विनोदपूर्ण असे चित्रण केलेले आहे. 'अश्वकर्ण युद्ध', 'व्याध चरित' ही काव्येही याने लिहिली असून जयदेवाच्या 'गीतगोविन्दा'चा पद्यमय अनुवादही याने नरनारायण राजाच्या विनंतीवरून केला आहे.

शंकरदेवांचाच एक शिष्य अनन्त कंदली हा देखील मोठा कवी होऊन गेला. कामरूप जिल्ह्यातील ब्राह्मण परिवारात हा जन्मला होता. याचे मूळ नाव होते 'हरिचरण'. आणि 'अनन्त कंदली' ही त्याच्या विद्वत्तेवरून त्याला लाभलेली पदवी होती. ह्या पदवीनेच तो ओळखला जातो. शंकरदेवांनी भागवताच्या दशम-स्कंधाचा अनुवाद याच्याकडून करून घेतला. याने भागवत-पुराणातील चतुर्थ, पंचम, षष्ठ आणि नवम स्कंधांचा सुन्दर पद्यानुवाद केलेला आहे. या शिवाय 'महिरावण-बध', 'हरिहर युद्ध', 'वृत्रासुर-बध', 'भरत-सावित्री जीवन-स्तुती' आणि 'कुमार-हरण काव्य' ही काव्यरचना केली. शंकरदेवांच्या रुक्मिणी हरणाप्रमाणेच याचे 'कुमार-हरण' लोकप्रिय आहे. त्यात उषा-अनिरुद्ध-आख्यान मोठ्या बहारीने चित्रित केलेले आहे.

शंकरदेवांनी शाक्त आणि वैष्णव मताच्या शास्त्रार्थ चर्चेमध्ये सार्वभौम भट्टाचार्यांचा पराभव केला होता आणि तेव्हापासून तो शंकरदेवांचा शिष्यच बनला. हा मुळचा प्राग्ज्योतिषपुरचा. काशीला जाऊन ह्याने वेदाध्ययन केले. पुढे याने शंकरदेवांचे चरित्र लिहिले. भागवत-पुराण आणि भविष्य-पुराणातील काही भागाचा अनुवादही केला. भट्टाचार्यांची पत्नी देखील मोठी विद्वान होती. बंगाली धर्मशास्त्री रघुनन्दन भट्टाचार्य ह्याचा तिने नरनारायणाच्या दरबारात शास्त्रार्थ चर्चेत पराभव केला होता.

शंकरदेवांच्या प्रिय शिष्यगणांपैकी श्रीधर कंदली हा एक होता. शंकरदेवांच्या अनुज्ञेने याने 'कीर्तनघोषा'तील 'घुनुसायात्रा' नामक अध्यायाची रचना केली. परंतु श्रीकृष्णाच्या बालजीवनावर याने लिहिलेली कविता विशेष वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'कनखोवा' नावाने ही कविता इतकी लोकप्रिय झाली की अंगाईगीताप्रमाणे ती घरोघर गायली गेली.

एके दिवशी बाळकृष्ण मोठमोठ्याने रडू लागला. यशोदेने त्याला खूप समजावले, पण तो उगी होईना. तेव्हा अखेरीस तिने ‘ कनखोबा ’चे नाव घेऊन बाळकृष्णाला भिवविले. बाळकृष्ण भ्याला नि यशोदेच्या कुशीत शिरला. मराठी माता ज्या प्रमाणे बागुलबुवाची भीती आपल्या मुलाला घालते, तशीच आसामी आईदेखील आजही आपल्या खट्याळ मुलाला गप्प करण्यासाठी ‘ कनखोबा ’ची भीती घालते.

राम सरस्वतीचा पुत्र द्विज कलापचंद्र म्हणून होता. याने भागवताच्या चौथ्या स्कंधातील काही भागाचा अनुवाद केला आहे. परंतु याची ‘ राधा-चरित्र ’ ही रचना श्रेष्ठ मानली जाते.

अनन्त आता नामक कवीने ‘ प्रेमलता ’ व ‘ राम-कीर्तन ’ अशी दोन पुस्तके लिहिली.

ह्या शिवाय या काळात प्रामुख्याने गोपालदेव कवीने ‘ देवी भागवत ’ आणि ‘ शंखासुर-वध ’, हरिदासने ‘ सूदन-वध ’, गोपीनाथ पाठकने ‘ द्रोण ’ व ‘ पुष्पवर्तकी ’ ही काव्ये रचली. अनिरुद्ध कायस्थने ‘ गीता ’ आणि ‘ भागवत—पंचमस्कंध ’ व गोपालमिश्रने ‘ गीते ’चा असमियामध्ये अनुवाद केला.

या काळातील बहुतेक रचना पद्यमय आहे. शंकरदेवांनी लिहिलेल्या नाटकात प्रथमतःच गद्याचा वापर करण्यात आला आहे. परंतु प्रारंभिक काळातील असमिया गद्याला एक निश्चित रूप देण्याचे श्रेय भट्टदेवाला दिले जाते. याचा जन्म कामरूपातील भेंडागावी १५५८ मध्ये झाला होता. हा त्या काळातील महान संस्कृत पंडित होता. याने सर्व भागवत-पुराण आणि गीता यांचा असमिया गद्यात अनुवाद केला. असमिया गद्याचा जनक म्हणून भट्टदेवाला मान दिला जातो.

या काळातील अन्य गद्य रचना म्हणून रघुनाथाचे ‘ कथा रामायण ’ व भगवत भट्टाचार्यांचे ‘ कथासूत्र ’ आणि ‘ कथाघोष ’ या रचनांचा उल्लेख केला जातो.

इ. स. १४५० ते १६५० या वैष्णव-कालातील सर्व गद्य-पद्य-असमिया रचना रामायण, महाभारत व भागवत पुराणाच्या आधाराने झालेली आहे. जन-सामान्यापर्यंत सुंदर भक्तीगीतरचना पोचली. या काळातील साहित्याचा दृष्टी-कोण धार्मिक, भक्तीप्रधान आहे.

**मध्ययुग**

वैष्णव कालानंतर असमिया साहित्यात इ. स. १६५० ते १८३४ पर्यंतचा कालखंड मध्ययुग म्हणून ओळखला जातो. तेराव्या शतकात आलेल्या अहोम लोकांनी येथे राज्यस्थापना केली होती व ते स्थिरस्थावर झाल्यावर त्यांनी आसामी भाषेचा स्वीकार केला होता. पुढील राजांनी असमिया साहित्यालाही चांगले प्रोत्साहन दिले होते. त्यांच्या राजवटीत जशी कथा–कहाण्यांची रचना होऊ लागली तशीच ज्योतिष, गणित, वनस्पती, कर्मकांड, नृत्य आणि संगीत या विविध विषयांवरही ग्रंथरचना झाली. आहोम राजवटीत वैद्यकशास्त्राचाही खूप प्रचार झाला. या शास्त्राचे अध्ययन व अध्यापन ही प्रतिष्ठेची गोष्ट मानली जाऊ लागली. संस्कृत-मधील मूळ आयुर्वेद ग्रंथाचा अनुवादही होऊ लागला. दरबारी कवींना विशेष प्रोत्साहन मिळाले.

असमिया साहित्याला अहोम राजांची सर्वात मोठी देणगी जर काही असेल तर ती ' बुरंजी ' साहित्य लेखनाची आहे. ' बुरंजी ' म्हणजे इतिहास. बुरंजीमध्ये गद्यात राजाचे जीवन व त्याची राजवट याचे लेखन असते. ' पुरणी–असम बुरंजी ' ही सर्वात पहिली बुरंजी आहे. हिच्यात राजा सुकाफा पासून ते राजा गदाधर-सिंहापर्यंतच्या अहोम राजांचा इतिहास आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून पुढे बऱ्याचशा बुरंजी लिहिल्या गेल्या. त्यांपैकी काही ' डिपार्टमेंट ऑफ हिस्टो-रीकल अँड अन्टीक्येरीयन स्टडीज, असम ' व 'कामरूप अनुसंधान समिती, गोहाटी ' या संस्थांमार्फत छापून प्रसिद्धही झाल्या आहेत.

' कलीभारत ' आणि ' बेलीमार बुरंजी ' ह्या रचना छंदोबद्ध इतिहास म्हणून प्रसिद्ध आहेत. शेवटचा अहोम राजा कामेश्वरसिंह याने १८०६ मध्ये दुनिराम हाजरिका याला आसामचा इतिहास लिहिण्याची आज्ञा दिली होती. त्यातूनच ' कलिभारत ' जन्माला आले. याने १६७९ ते १८५४ पर्यंत झालेल्या अहोम नरेशांचा इतिहास वर्णिलेला आहे.

याच साली, १८५४ मध्ये, आसाम प्रांत इंग्रजांच्या अधिपत्याखाली गेला. बेलीमार बुरंजीची रचना विश्वेश्वर विद्यापतीने केली. राजा पुरंदरसिंहाने ही रचना करवून घेतली. यात अहोम नरेशांच्या राजवटीच्या अस्ताचा इतिहास आलेला आहे.

'बुरंजी ' व्यतिरिक्त या काळात असमिया भाषेत ' चरितपुथी ' अथवा चरित्र लेखनही झाले. गद्य व पद्य अशा दोन्ही प्रकारात चरित्रपुथीची रचना

झालेली आहे. यात 'गुरू-चरित' हा शंकरदेवांच्या चरित्रावर लिहिलेला आद्य-ग्रंथ आहे. हा १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात लिहिला आहे. याची गद्य भाषा सुबोध-सरळ आहे.

दैत्यारी ठाकुर हा या काळातील प्रसिद्ध चरित्र-लेखक. त्याशिवाय रामचरण ठाकुर, भूषण द्विज, अनिरुद्ध, रामायण, नीलकंठ इत्यादी लेखकांनीही चरित्रे लिहिली आहेत.

या काळात अनेक प्रकारची शास्त्रीय व राजनैतिक स्वरूपाची निबंध व ग्रंथ-रचना झाली. कविशेखर भट्टाचार्य याने यौन-विज्ञानावर छन्दोबद्ध रचना केली. राजा राजेश्वरसिंहाचा पुत्र युवराज चाऊसिंह आणि त्याची पत्नी राजकुमारी प्रमोदसुंदरी यांच्या मनोविनोदनासाठी हा ग्रंथ रचला गेला.

स्वप्नशास्त्रावर 'स्वप्नाध्याय' नामक ग्रंथाची निर्मिती झाली, तर शुभंकर कवीने 'हस्तमुक्तावली' नामक ग्रंथ नृत्यशास्त्रावर लिहिला. या काळातील सर्वात उल्लेखनीय शास्त्रीय ग्रंथ म्हणजे 'हस्तिविद्यार्णव'. संस्कृत ग्रंथ—'मातंगलीला' याच्या आधारे हत्तींच्या संबंधीचा हा ग्रंथ सुकुमार बरकाठ याने १७३४ मध्ये राजा शिवसिंह व राणी मदंबिका यांच्या आज्ञेवरून लिहिला. १८०६ साली सूर्य-खण्डी दैवज्ञ याने 'अश्वनिदान' हा अश्वचिकित्सापर ग्रंथ लिहिला. ज्योतिषावर लिहिणारांमध्ये कविराज चक्रवर्ती भास्वती सुप्रसिद्ध आहे. गणित, भूमिती, यांवर बकुल कायस्थ याने १८३४ मध्ये 'कितापत मंजिरी' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. याच सुमारास कविराज द्विज याने 'लीलावती' नामक संस्कृत ग्रंथाच्या आधारे गणितावर ग्रंथरचना केली.

या काळात प्रेम, निसर्ग या विषयीही काव्यरचना झाली. रामद्वीज याने लिहिलेल्या 'मृगावती' चरित्रात प्रेमकथेचे वर्णन आहे. चक्रवर्ती कवीने 'गीत गोविंद'चा अनुवाद केला आणि 'शाकुंतल' काव्यही याने लिहिले. द्विज गोस्वामी व राममिश्र कवीनेही हितोपदेशातील कथा पद्यात अनुवादित केल्या.

अनन्त आचार्य कवीने 'अनन्त लहरी'ची निर्मिती केली. यात दुर्गादेवीचे वर्णन आहे. रुचिनाथ मिश्र यांनी 'मार्कंडेय चण्डी' काव्य लिहिले. या शिवाय घनश्यामचे 'कल्की-पुराण', दैवज्ञाचे 'हरंग राजवंशावली' ह्या रचना प्रसिद्ध आहेत.

मध्ययुगात असमिया साहित्याचा वृक्ष अनेक प्रकाराने विस्तारला. तथापी,

प्राचीन धर्मनिष्ठा तेवढी उरली नाही. भौतिक विषयांचा प्रभाव वाढला, पण वैष्णव परंपरेचा ठसा सर्वस्वी लुप्त झाला नाही.

**आधुनिक युग**

इ.स. १८३४ पासून असमिया साहित्यात आधुनिक युगाचा प्रारंभ झाला. या सुमाराला इंग्रजांचा हस्तक्षेप आसामच्या राजकारणात झाला. इंग्रजांनी आपले बस्तान बसविण्यासाठी बंगाली अधिकारी या काळात आसाममध्ये आणले. त्यांनी इंग्रजांचा या प्रदेशाची मुख्य भाषा बंगाली आहे व असमिया ही गौण भाषा आहे असा गैरसमज करून दिला. त्यामुळे १८३६ ते १८८२ म्हणजे ४७ वर्षे आसाम-मध्ये बंगाली ही सरकारी भाषा राहिली व बंगाली पाठ्यपुस्तके तर आणखी पुढे ३०—४० वर्षे चालू होती.

ज्या साली असमिया भाषेचे अशा प्रकारे उच्चाटन केले गेले त्याच वेळी अमेरिकन धर्मप्रचारक रेव्हरंड नॉथन ब्राउन आणि ओ. टी. कॉटर हे आसाममध्ये छापखाना घेऊनआले.ख्रिश्चनधर्मप्रसारासाठी त्यांनी आसामीभाषाशिकण्यास प्रारंभी केला व अवघ्या तीनच महिन्यात त्यांनी असमिया प्रायमर छापून आपल्या शाळेत लावले. त्यांच्याही आधी इंग्रज धर्मप्रचारकांनी कलकत्याजवळील श्रीरामपूर येथील आपल्या छापखान्यात बायबलचे असमिया भाषेत भाषांतर छापून १८१३ साली प्रसिद्ध केले होते. हेच असमिया भाषेतील पहिले छापील पुस्तक होय. नौगाव जिल्ह्यातील आत्माराम शर्मा या असमिया विद्वानाने हे भाषांतर केले होते.

१८४० साली डब्लू रॉबिन्सन या इंग्रज गृहस्थाने असमियाचा सखोल अभ्यास करून असमियाचे व्याकरण लिहून प्रसिद्ध केले.

१८४५ मध्ये रेव्हरंड एन्. ब्राउन याने बकुल कायस्थचे ‘ कितापत-मंजिरी ’ हे गणिताचे पुस्तक प्रसिद्ध केले.

१८४६ साली शिवसागर येथून अमेरिकन मिशनऱ्यांनी ‘ अरुणोदय ’ नावाचे एक मासिकपत्र सुरू केले. या मासिकपत्रिकेत साहित्यिक, ऐतिहासिक, शास्त्रीय, धार्मिक आणि अन्य विषयांवरही लेख प्रसिद्ध होत असत.

१८६८ मध्ये ब्रॉन्सन नामक मिशनऱ्याने बारा वर्षे परिश्रम करून तयार केलेला १४ हजार शब्दांचा ‘ असमिया—इंग्रजी कोष ’ प्रसिद्ध केला.

१८८४ मध्ये एन्. ब्राउनने ‘ ग्रॅम्यॅटिकल नोटीस आफ दी आसामीज लँग्वेज ’ नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले.

या कालखंडात या धर्मप्रचारकांनी आसामची भाषा असमिया आहे हे जाणले होते व आसामची उन्नती साधण्यासाठी व सहानुभूती मिळविण्यासाठी आसामी भाषेला तिचे स्थान परत मिळवून देण्याचे प्रयत्न चालू केले होते. आनन्दराम ढेंकियाल फूकन हे राजा राममोहन राय यांचे समकालीन असलेल्या आसामी विद्वान समाजसुधारकांनी या करिता प्रयत्न केले. अखेरीस १८८२ साली असमिया भाषेला आपला जन्मसिद्ध अधिकार पुनः प्राप्त झाला. परकी मिशनऱ्यांनी अशाप्रकारे असमिया भाषेची व साहित्याची पुष्कळच सेवा केलेली आहे.

या पुढील काळात इंग्रजी भाषा व साहित्य यांचा प्रभाव अन्य भारतीय साहित्यावर जसा उमटला तसाच तो असमिया साहित्यावरही पडलेला दिसतो. पाश्चात्य संस्कृती, ज्ञान, विषय स्पष्टीकरणाची शैली, छंद आदी गोष्टींचे अनुकरण होऊ लागले. पारंपारिकतेपासून असमिया काव्य अलग होऊन नवे वळण घेऊ लागले. प्राचीन कवींप्रमाणे आधुनिक काळातील कवी केवळ धार्मिक, भक्तिभावना आळवीत बसले नाहीत, तर त्यांनी वैयक्तिक सुख–दुःखाचे अनुभवही व्यक्त करायला सुरुवात केली. इंग्रजी साहित्याचा अनुवादही होऊ लागला. ‘ अरुणोदय ’ मधून ‘ पिलग्रिम्स प्रोग्रेस ’ चे ‘ जात्री कर जात्रा ’ ह्या नावाने १८४८ मध्येच क्रमशः अनुवाद प्रसिद्ध झाला. कामिनीकांत ’ नावाच्या १८७७ मधील प्रथम कादंबरीत एका हिंदू तरुणाने खिश्चन धर्माचा स्वीकार केला या संदर्भात चर्चा असून खिश्चन धर्माचे गुणगान गायलेले आहे. ‘ फूलमाणि आरु करुणा ’ या कथेतही खिश्चनधर्म प्रशंसा आहे. खिस्ती धर्मप्रचारकांनी धर्मप्रचार केलाच पण आसामी जनतेत साहित्याची अभिरुचीही निर्माण केली. कथा, नाटक, कादंबरी, चरित्र आदी वाङ्मयप्रकार आकार घेऊ लागले.

१८३६ ते १८९६ या काळात होऊन गेलेल्या हेमचन्द्र बरुआ नावाच्या लेखकानी ‘ कानीया–कीर्तन ’ नावाचे एक नाटक लिहिले. या नाटकात अफूच्या व्यसनामुळे समाजाची कशी अवनती झालेली आहे हे मोठ्या मार्मिकपणाने दाखवलेले आहे.

‘ बाहिरे रंगभंग भितारे कोवाभातुंरी ’ म्हणजे ‘ हत्तीचे दात खायचे वेगळे व दाखवायचे वेगळे ’ अशा अर्थाचे एक वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक यांनी लिहिले असून त्यात असमिया समाजामधील ढोंगबाजीवर प्रहार केलेला आहे. यांनीच ‘ हेमकोष ’ नावाचा उत्कृष्ट असमिया शब्दकोष व व्याकरण लिहिले आहे.

गुणाभिराम बरुआ हे १८३७ ते १८९४ या काळात झाले. त्यांनी ' रामनवमी ' नावाचे नाटक आणि आनंदीराम ढेंकियाल फूकन यांचे चरित्र १८८० मध्ये लिहिले. यांनीच असमिया भाषेत प्रथम विनोदी शब्दचित्रेही लिहिली.

सत्यनाथ बरुआ, दण्डीनाथ कलित, हेमचंद्र बरुआ या लेखकांनीही पुढील काळात आसामच्या साहित्यात मोलाची भर घातली आहे.

१८७५ मध्ये रमाकांत चौधरी नावाच्या कवीने माइकेल मधुसूदन दत्त या बंगाली कवीच्या काव्यधर्तीवर मुक्तछंदात ' अभिमन्यु वध ' हे काव्य लिहिले. १८८८ मध्ये भोलानाथ दास यानेही मुक्तछंदात ' सीताहरण ' काव्य रचले. अशा प्रकारे काव्यात मुक्तछंदाचा वापर या काळी होऊ लागला.

चंद्रकुमार अग्रवाल ( १८५८ ते १९३८ ), लक्ष्मीनाथ बेजबरुआ ( १८६७ते १९३८ ) व हेमचंद्र गोस्वामी ( १८७२ ते १९२८ ) या तीन लेखकांना आधुनिक असमिया साहित्याचे शिल्पकार मानले जाते. कलकत्त्यामध्ये अध्ययन करीत असता या तिघांनी " जोनाकी " म्हणजे ' काजवा '— नामक एक मासिक पत्रिका सुरू केली. या मासिकातील साहित्यातून निसर्ग, प्रेम आदी भावभावनांचे आवि-ष्करण होऊ लागले. गूढगुंजनात्मक विचारही लालित्यरूप घेऊ लागले. देशप्रेमाने रसरसलेले साहित्यही प्रसिद्ध होऊ लागले.

विसाव्या शतकाच्या प्रारंभ काळातील प्रमुख लेखक—कवी म्हणून श्री. लक्ष्मीनाथ बेजबरुआ विख्यात आहेत. असामची निसर्गसुंदर भूमी त्यांची प्रेरणा-स्रोत होती. ' बेलिमार व चक्रध्वज सिंह ' नावाची त्यांनी जी दोन ऐतिहा-सिक नाटके लिहिली त्यांचा विषयही अनुक्रमे आसामच्या स्वातंत्र्याचा अस्त व सतराव्या शतकातील गोहाटीजवळील रामसिंहाचा पराजय या घटनांवर आधा-रितच आहे. ' मोरा देश ' नावाच्या त्यांच्या गीताला तर आसामच्या ' प्रांतगीता ' चा गौरव लाभलेला आहे. बेजबरुआंनीच आधुनिक कथा लेखनाची असमियात सुरुवात केली. लोककथांचा संग्रह केला. ' कृपाबर बरबरुवा ' या नावाचे पात्र त्यांनी निर्माण केले. ' कृपाबर बरबरुवार काकतार टोपोला '—कृपाबर बरबरुं-वांच्या कागदपत्रांचा पुडका, ' कृपाबर बरबरुवार ओमोटनी '— बरबरुवांचे वेगळे विचार, आणि ' बरबरुवाभावर बुरबुरनि ' बरबरुवांचे विचार —बुडबुडे—ह्या विनोदी रचना असमिया साहित्यात अत्यंत लोकप्रिय ठरलेल्या आहेत. तत्कालीन दैनंदिन जीवनातील घटना, संस्था व लोक यांचा खुसखुशीत भाषेत मजेदार परामर्श

घेतलेला आहे. या लेखनाद्वारा बेजबरूआंनी असमिया गद्याला विविधता, नावीन्य आणि आधुनिकता दिली. जनसामान्यांच्या जीवनाविषयी सखोल सहानुभूती बेजबरुआंच्या अंतःकरणात वसत होती. त्यांची भाषा दैनंदिन जीवनातील सामान्यांची बोल भाषा आहे. 'बोमल' व 'पाचनी' या नाटकांमधून त्यांनी आसामी–ग्रामीण जीवनातील अंधविश्वास, आवडी निवडी यासंबंधी मोठे खुबीदार चित्रण केले होते.

हेमचंद्र गोस्वामी यांनी ऐतिहासिक संशोधन करून उत्कृष्ट निबंध लिहिले. काही सुंदर चतुर्दशपदी लिहिल्या.

चन्द्रकुमार अग्रवाल यांनी १९१८ मध्ये 'असमिया' नावाचे साप्ताहिक सुरू केले. त्यांनी अनेक सुंदर, सुंदर पदे लिहिली. 'प्रतिभा,' व 'वीन बैरागी' हे त्यांचे गीतसंग्रह प्रसिद्ध आहेत.



रजनीकांत बारडोलाई

दुर्गेश्वर शर्मा, अंबिका गिरिराय चौधुरी, कमलाकान्त, भट्टाचार्य, रत्नकान्त वरकाकाती, नीलमणी फूकन व यतीन्द्रनाथ आरा हे तत्कालीन असमियाचे प्रतिभासंपन्न कवी म्हणून विख्यात आहेत.

कमलकांत भट्टाचार्य व अंबिका गिरीराव चौधुरी यांनी अनेक तेजस्वी स्फूर्तीशाली राष्ट्रीय-गीते लिहिली. आरा यांनी मुक्तके बरीच लिहिली, शिवाय उमर खय्यामच्या रुबायांचा असमिया भाषेत अनुवादही केला.

पद्मनाथ गोहाई बरुआ

व रजनीकांत बारडोलाई हे १९ व्या शतकातील प्रमुख अग्रगण्य कादंबरीकार मानले जातात. गोहाई बरुआ यांनी १८९० साली 'लाहरी' व १८९३ साली 'भानुमती' अशा दोन कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यांचे विषय ऐतिहासिक आहेत. यांनी काही नाटके व पाठ्यपुस्तकेही लिहिली. 'उषा' नावाचे मासिक व 'बन्ती' नावाचे साप्ताहिकही अनेक वर्षे चालवले होते.

रजनीकान्त बारडोलाई यांनी पुष्कळ कादंबऱ्या लिहिल्या. १८९५ साली त्यांची 'मिरा-जियरी' नावाची पहिली रोमांचकारी कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यानंतर 'मनोमती,' 'रंगीली,' 'रहदइ लिंगरी,' 'दन्दुआ द्रोह,' 'ताम्रेश्वर मंदिर' व 'निर्मल भक्त' ह्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या.

निबंधकार म्हणून सत्यनाथ बरा यांचे नाव असमिया साहित्यात मानाने घेतले जाते. 'आकाश रहस्य' नावाचा त्यांचा निबंध संग्रह वैचारिक व शैलीदार म्हणून प्रसिद्ध आहे.

पं. हेमचंद्र गोस्वामी, डॉ. सूर्यकुमार भूयां व वेणूधर शर्मा यांनी ऐतिहासिक टीकात्मक निबंध-लेखन विपुल केले आहे.

रघुनाथ चौधरी हे या काळातील प्रमुख कवींपैकी एक होते. १९१३ साली त्यांचे 'केतकी' नावाचे गीतिकाव्य प्रसिद्ध झाले.

त्यानंतरच्या पिढीत शैलधर राजखोवा, नलिनीबाला देवी, धर्मेश्वरी देवी, डिम्बेश्वर नेओग, विनन्दचन्द्र बरुआ, अतुलचंद्र हजारिया व गणेशचंद्र गर्ग या कवींनी असमिया साहित्य संपन्न केले आहे.

कादंबरी क्षेत्रात देवचन्द्र तालुकदार व दण्डिनाथ कलित यांनी विशेष कामगिरी बजावली आहे. तालुकदार यांनी आपल्या 'आदर्श पीठ'मध्ये गांधीवादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केलेला आहे. कलित यांच्या 'साधने' तही आदर्शवाद चित्रित झालेला आहे. स्नेहलता भट्टाचार्य यांची 'वीणा' व सुप्रभा गोस्वामी यांची 'पचोवा बताह' व वीणा बरुआ यांची 'जीवर बातत' या कादंबऱ्यांनी असमिया साहित्याचे दालन समृद्ध केले आहे.

पाश्चिमात्य साहित्याच्या प्रभावाने असमिया साहित्यात 'कथा' प्रकारही आला. १९३० ते १९५० या काळात किती तरी कथा लिहिल्या गेल्या. गोहाटी मधून प्रसिद्ध होणाऱ्या 'जयन्ती' नावाच्या व कलकत्त्याच्या 'आव्हान' नावाच्या मासिकांनी कथा-वाङ्मयाला बरीच प्रसिद्धी देऊन ते लोकप्रिय केले.



लक्ष्मीनाथ बेजबरुआ

लक्ष्मीनाथ बेजबरुआ हे प्रमुख असमिया कथाकार मानले जातात. असमिया कथेला कलात्मक स्वरूप यांनी प्रथम दिले. 'साधु कथारकुकी', 'जोन-बिरि', 'सुरभि'—हे त्यांचे तीन कथासंग्रह लोकप्रिय आहेत.

लक्ष्मीधर शर्मा यांच्या कथांचा संग्रह 'व्यर्थतार दान' नावाने प्रसिद्ध आहे. शर्मांनी व्यक्तिरेखेवर भर देऊन प्रेमभावनेचाही स्वच्छंदपणाने आविष्कार केलेला आहे. रमादास, वीणा बरुआ, कृष्ण इत्यादी कथाकारांनीही शर्माजींचे अनुकरण करून प्रेमकथा लिहिल्या आहेत.

नगेन्द्रनारायण चौधरी व त्रिलोकीनारायण गोस्वामी यांच्या कथांमधून सामाजिक दृष्टीकोण प्रतिबिंबित झालेला आढळतो.

महीबरा व लक्ष्मीनाथ फुकन यांच्या कथांमधून असमिया विनोद उत्कृष्ट रीतीने व्यक्त झालेला आहे, तर हलीराम डेका यांच्या कथा उपहासगर्भ आहेत.

असमिया नाटकांमध्ये अनुवादित व स्वतंत्र अशी नाटके लिहिली गेली आहेत. अनुवादित नाटके प्रामुख्याने संस्कृत व इंग्रजीवरून लिहिलेली आहेत. हेमचंद्र बरुआ यांनी लिहिलेल्या ‘ कानियार कीर्तन ’ नाटकात अफू सेवनाचे दु:ष्परिणाम दाखवले आहेत, तर गुणाभिराम बरुआंच्या ‘ रामनवमी ’ नाटकात विधवा-विवाहाचा पुरस्कार केलेला आहे. वेणुधर राजखोवा यांनी आपल्या ‘ तिनी घइनी ’ (तीन गृहिणी) व ‘ अशिक्षिता घइनी ’ या प्रहसनांमधून स्त्रियांच्या अज्ञानाची व रूढिप्रियतेची, तसेच ‘ कुडी सातिवार सभ्यता ’ मध्ये पाश्चिमात्य संस्कृतीत रंगलेल्या आसामी युवकांची मजेदार हजेरी घेतलेली आहे.

कमलानन्द भट्टाचार्य यांचे ‘ आव्हान ’ देवचन्द्र तालुकदारांचे ‘ आसाम प्रतिभा ’ प्रसन्नलाल चौधरींचे ‘ नीलाम्बर ’ व नकुलचन्द्र भुइयाँ यांचे ‘ बदन बरफुकन ’ ही नाटके प्रसिद्ध आहेत.

बुरंजीवर आधारलेली ऐतिहासिक नाटके व पौराणिक नाटकेही असामीत बरीच लिहिली गेली आहेत.

अलिकडील काळात नवीन विचाराच्या, नवीन वळणाच्या व अभिव्यक्तीच्या कथा, कविता, कादंबऱ्या व नाटके इत्यादी असमिया भाषेतही लिहिली जात आहेत. समाजवादी विचारसरणीचा व व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार जसा अलिकडे साहित्यात आढळतो, तशीच अंतर्मनाची चित्रणे, भावनांची तरल, नाजुक स्पंदनेही शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न होत आहे.

नवीन कवीत ज्योतिप्रसाद अग्रवाल, अमूल्य बरुआ, केशव महन्त आदी प्रमुख आहेत. तर कथेच्या क्षेत्रात मथुरा डेका, प्रफुल्लदत्त गोस्वामी, राधिकामोहन गोस्वामी, उमाकान्त शर्मा, दीनानाथ शर्मा, जोगेशदास, वीरेन्द्रचन्द्र भट्टाचार्य हे कथाकार अग्रेसर आहेत.

प्रवीण फूकन, शारदा बारडोलाई हे तरुण नाटककार नव्या प्रेरणेने लिहीत आहेत.

नलिनी बालादेवी, हिरण्मयदेवी, उमा बरुआ, निरूपमा फूकन, सुप्रभा गोस्वामी, मिनौती हझारिका इत्यादी असमिया भगिनींनीदेखील विविध प्रकारचे लेखन करून असमिया साहित्य-सृष्टी समृद्ध केली आहे.

□ □

# कलाप्रिय आसाम

आसामी असामी तसा रसिक व कलाप्रिय आहे. विविध तऱ्हेच्या ललितकलांची आणि हस्तकलांची वाढ आणि जपणूक प्राचीन काळापासूनच आसाममध्ये होत आलेली आहे. कालपरत्वे त्यांत भर पडली आहे, आणि त्यांचा विकासही झाला आहे. विविध विकासशील कलांची समृद्ध दालने पाहिली म्हणजे आसामच्या रसिकतेची ओळख पटते.

**संगीत**

कामरूपाच्या अंगप्रत्यंगातून संगीत आणि नृत्य प्राचीन काळापासून मुरलेले आहे. भारतीय संगीत आणि नृत्य ह्या कला भगवान शिव आणि पार्वती यांच्यापासून उदित झाल्या अशी श्रद्धा आहे. प्राचीन पोषितपूर येथील बाणराजाची कन्या उषा हिला प्रत्यक्ष पार्वतीदेवीने नृत्याचे धडे दिले अशी आख्यायिका आहे. आपल्या सख्यांना नृत्य–संगीताचे शिक्षण देण्यासाठी उषेने तेथे विद्यापीठ उघडले होते. याच विद्यापीठातून संगीत व नृत्यनिपुण झालेली सखी चंद्रलेखा हिला प्रेमदूती म्हणून द्वारकेला धाडले होते. चंद्रलेखा द्वारकेला गेली. तिथे तिने श्रीकृष्णाच्या दरबारात आपल्या संगीताने व नृत्याने यादव-राजकुमार अनिरुद्ध याला मोहित केले आणि नंतर त्याला पोषितपूरला आणून उषा-अनिरुद्ध यांचा विवाह लावून दिला.

कामरूपाचा राजा भगदत्त हा धर्मराजाच्या राजसूय यज्ञाच्या वेळी गंधर्वांचा जथाच तिथे गायनासाठी घेऊन गेला होता !

कामरूपाला भेट दिली त्या वेळी भास्करवर्मा राजाने चिनी प्रवासी ह्यूएनत्संग याला रोज सायंकाळी संगीत व नृत्य यांची सुरस मेजवानी दिली असे ह्यूएन्त्संगने नमूद केले आहे.

सर्वसाधारण आसामी माणसाच्या दैनंदिन जीवनातदेखील संगीताला स्थान

आहे. अंगाईगीते, ( निचुकानी-गीत ), विवाहगीते ( बीआ-नाम ), धार्मिक-गीते ( अई-नाम ), बनगीते, बिहूगीते इत्यादी किती तरी प्रकारची व प्रसंगांची गीते आसामी जीवनात आहेत.

आध्यात्मिक विषयावरची ' देह-बिचार ' गीते आसामात फारच लोकप्रिय आहेत. एकतारीवर ही गीते गात हिंडणारे भक्तजन आढळतात. १७ व्या शतकात आसामात आलेल्या अजन फकीर नामक मुस्लीम संतानेही याच धर्तीवर गीत-रचना केली; तीही गीते गायली जातात.

वीररसाचे पवाडेही बरेच लोकप्रिय आहेत. मनीराम दिवाण, बरफूकन, आदी वीरपुरुषांची स्फूर्तिदायक चरित्रे या दीर्घ गीतांमधून गायली जातात.

आसामचे पारंपरिक शास्त्रीय संगीत म्हणजे ' बरगीत '. वैष्णव संप्रदायी गवयांनी व भक्तांनीही ही गीते फार लोकप्रिय केली. ध्रुपद पद्धतीच्या गायकीवर ही बरगीते शंकरदेव व माधवदेव यांनी लिहिली व प्रसारित केली. वैष्णवांची ठिकठिकाणची ' सत्रे ' म्हणजे बरगीत गायनाची केन्द्रेच होती.

मीरा, जयदेव, चैतन्य, तुलसीदास, तुकाराम इत्यादी संतांच्या भजन-पद्धतीचाही या गायकीवर प्रभाव दिसतो.

वैष्णव-सत्रांमधील प्रमुखांनी पुढील काळातही बरगीतांची रचना केली असून तीही रागदारीवर गायली जातात.

**नृत्य**

' बिहुपेंपाऽहो ! ' ' बिहुपेंपा ऽ हो ! ' अशा ' पेपा ' निनादू लागतात, ' टोका ' साथ देतात, आणि आसामी युवक—युवतींच्या पायांना पंख फुटू लागतात. अंगात लय संचारते, वसंत ऋतूने नटलेली रंगीबिरंगी सृष्टी खुणावते, आणि कंठ खुलतात, स्वर घुमतात—

**चोते चोते गोई बोहागे पालेछि,**
**फूलिले बाबरि फूल**
**तोमारे लगते मारो जदि पोरिभोई,**

**एरि जाम निजरि कूल ।**
**चोते गोइये गोइये बोहागे पालेछि,**
**फूलिले भेबेलि लता,**

कोई थाकी माने ओरके नपरे,
रंगाली बिहरे कथा ।
ओतिकोई चेने हर मूगारे महुरा,
ओतिकोई चेने हर माको;
तातो कोई चेने हर बहागोर बिहूटि
नापाति केने कोई याको ।
पृथिवीर चोऊपाशे प्रकृति घूरिछे,
घूरिछे जेऊती चाति;
देहारे माजते प्रानटी बूरिछे,
कोरिछे ऊजनि भाटि ।

हाँह होई चोरिमगोई तोमारे पुखूबीत,
पार होई पोरिम गोई चालत;
माखिरूपे धोरि चूमाखाई आहिम गोई,
तोमार सेंदूरीया गालत ।

—चैत्राचा महिना संपत आला, वैशाख येत आहे. ‘ बाबरी ’ — फुलू लागला आहे.

तुझ्या सोबतीत मी नाते–गोते तोडण्यासच काय, पण मरणही पत्करायला तयार आहे.

—चैत्र संपत आहे. वैशाख येत आहे. ‘ मेबेलि ’— लता बहरू लागली आहे. रंगाली बिहूबद्दल बोलू लागलो तर ते कधीच संपायचे नाही.

—‘ मूगा ’—रेशमाची कांडी मला फार आवडते. ते विणण्याचा मागही माझा आवडता आहे. पण त्याहूनही ‘ बोहाग बिहू ’ मला प्रिय आहे. तो साजरा केला नाही तर जगणे अशक्य आहे.

— पृथ्वीभोवती निसर्गाचा पिंगा चालू आहे. त्याच्याबरोबर सौंदर्याचाही पिंगा चालू आहे. देहामध्ये आत्मा वरखाली संचारत आहे.

—मी जर राजहंस असतो तर तुझ्या सरोवरामध्ये पोहलो असतो. मी जर पारवा असतो तर तुझ्या घराच्या छपरावर बसलो असतो आणि मी जर माशीच्या रूपात असतो तर तुझ्या गुलाबी गालाचे चुंबन घेतले असते.

अशी ‘ बिहूगीते ’ गात गात ‘ बिहूनृत्य ’ रंगात येते.

बिहू हे आसामचे प्रमुख नृत्य आहे. वैशाखातील–ब्होहाग बिहूच्या वेळी सात दिवस आसामभर नृत्य-गीतांची नुसती धमाल उडते ! ल्हान-मोठे, स्त्री-पुरुष-सर्वजण या वेळी बिहूत भाग घेतात.

बिहूतही दोन प्रकार आहेत. एकाला हुचारी म्हणतात, दुसऱ्याला बिहूच म्हणतात. बिहूनृत्यात गावातील तरुणतरुणी भाग घेतात, मैदानात, शेतावर, झाडाखाली आठाच्या आकड्यासारखी रचना करून किंवा ओळीने उभे राहून नाचतात. नाचताना प्रेमाची गीते गातात. ही गीते छोटी छोटी जशी असतात, तशी ती मोठीही असतात.

हुचारी हे आसामी पुरुषांचे नृत्य आहे. परमेश्वराची कृपा निरंतर लाभावी या उद्देशाने नववर्षाच्या प्रारंभी हे नृत्य करतात. खेड्यात घरापुढील मोकळ्या जागेत नाचतात. या वेळीही नर्तक–पुरुष गीते गातात. त्यातील पूर्वभागाला ‘ हुचारी–कीर्तन ’ असे म्हणतात. ही गीते धार्मिक असतात. हे नृत्य फेर धरून नाचतात. नाचता नाचता गती वाढते. ढोल, ताल, टोका, पेपा इत्यादी वाद्यांची साथ असते.

आसाममध्ये वैष्णव संप्रदाय एकेकाळी खूपच भरभराटीत होता. वैष्णव लोकांमध्ये कृष्णलीलेवर आधारीत असे नृत्य करतात. त्याला–‘ केली गोपाल ’ असे म्हणतात.

दशावतारावर आधारित असेही नृत्य आसाममध्ये केले जाते. त्या नृत्याला ‘ महारास नृत्य ’ असे म्हणतात.


भक्तिप्रधान वरगीतांबरोबर वैष्णव–संप्रदायात जे नृत्य केले जाते त्याला ‘ सत्र नृत्य ’ म्हणतात. या सत्रीय नृत्याचा आविष्कार शास्त्रीय पद्धतीचा असतो. मणिपुरी नृत्याची झलक यात दिसते. वैष्णव–संप्रदायाच्या प्रभावाखाली मणिपूर १८ व्या शतकात आले. पण सत्रीय नृत्यपद्धती त्या आधीच तिथे पोचली होती. मृदंग आणि झांज यांच्या तालावर हे नृत्य केले जाते.

हे नृत्य केवळ पुरुषच करतात. यातील स्त्री-भूमिकाही एखादा मुलगा वठवतो.

**अंकिया नाट**

हा आसाममधील एक नाट्य-प्रकार आहे. बंगालमधील कीर्तनिया नाट्याचा

या प्रकारावर प्रभाव दिसतो. आसामचे थोर वैष्णव संत शंकरदेव यांनी पुष्कळ अंकिया नाट लिहून सादर केले. ते स्वतः जसे कवी, लेखक, धर्मप्रचारक होते, तसेच उत्कृष्ट गायक व अभिनेतेही होते. अंकिया नाटाचे स्वरूप एकांकी नाटका-



शंकरदेवांची नृत्यकला

सारखे असते. काव्याबरोबरच यात गद्याला महत्त्व लाभले. करमणुकीबरोबरच शंकरदेवांनी वैष्णव धर्माचा प्रचारही या माध्यमाच्या द्वारा साधला. 'अंकिया नाट' या नाट्यप्रकाराचे प्रवर्तक शंकरदेवच आहेत. शंकरदेवानंतर गोपाळदेव यांनी हा

प्रकार यशस्वीपणे हाताळला.

अंकिया नाटाचेही दोन प्रकार आहेत. एक ' जत्रा ' आणि दुसरा ' झमूरा '. पूर्वीच्या काळी राजे लोक यात्रेला जात त्या वेळी त्यांच्या मनोरंजनासाठी व एखाद्या महोत्सवात मूर्तींची मिरवणूक काढताना जी प्रहसने करतात त्यांना यात्रा म्हणतात. ' चिन्हयात्रा ' हे या प्रकारचे शंकरदेवांनी लिहिलेले पहिले आसामी अंकिया नाटक.

' झमूरा ' ही छोटी नाटके असतात. त्यांत नांदी असते, कथाभागही पद्यमय असतो. नाटकातील सामान्य पात्रांना ' कारीता ' व मुख्य पात्रांना ' नाटुआ ' म्हणतात. गाणाऱ्यांना ' गायन ' व वादकांना ' वायन ' म्हणतात. अनुसंधानासाठी सूत्रधार असतो.नाटकातल्या गाण्यांना 'अंकिया गीते ' व 'भातीया' म्हणतात. प्रत्यक्ष नाट्याशी संबंधित अशी जी गीते ती अंकिया गीते व प्रार्थनेची वा नमनाची ती भातीया गीते.



सत्रीय नृत्य

नाट्यगृहाला 'रभा' म्हणतात. रभा म्हणजे लोक एकत्र जमण्याचे ठिकाण. धार्मिक उत्सवाच्या वेळी 'नामघर' किंवा 'कीर्तनघर' यातून नाटके होतात.

रंगभूमीच्या एका बाजूला पोथी ठेवतात. तिला 'थापना' म्हणतात. नाटकाच्या आरंभी थापनावरच कृष्णपूजा होते. दुसऱ्या बाजूस 'दोहार'— म्हणजे वाद्यवृंदाची जागा असते. खोल, झांजा ही वाद्ये असतात.

ही नाटके रात्रभर चालतात. विशिष्ट पात्राच्या प्रवेशाचे वेळी शोभेची दारू उडवून आतषबाजी करतात. नाटकाच्या प्रसंगी ढोल वाजवून 'घेमालीर घोष' म्हणजे एक समूहगीत म्हटले जाते. नंतर ढोलकीवाले, वरघेमाली व देव-घेमाली हे ढोल वाजवून फेर धरून नाचतात. त्यानंतर गुरुस्तवन होते. त्याला 'गुरुघाट' म्हणतात. नंतर सूत्रधाराचा प्रवेश होतो. नृत्य करून तो श्रीराम—कृष्णांना आवाहन करतो, संस्कृतात नांदी म्हणतो. नाटकाच्या अखेरीस 'मुक्तिमंगल' व 'भट्टिमा' अशी गाणी होतात.

**नाटक**

प्राचीनकाळी नाट्याचे शिक्षण आसाममधील 'टोल' नामक शैक्षणिक संस्थांमधून दिले जाई. शिक्षणाचा नाट्यशिक्षण हा एक भागच असे. 'टोल' सारख्या शिक्षण संस्था गुरुकुलाप्रमाणे आसामी ब्राह्मण पंडित स्वतःच्या जागेतच चालवीत असत. तिथे संस्कृत नाटकांचे व अभिनयाचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाई. अतिथींच्या सत्कारार्थ संस्कृत नाटकांचे प्रयोगही केले जात असत. तत्कालीन कामरूपच्या राजांनीही संस्कृत नाटकांना आपल्या दरबारी आश्रय दिलेला होता. अवंतीवर्मा राजाच्या आश्रयाखालीच विशाखदत्ताने 'मुद्राराक्षस' हे संस्कृत नाटक लिहिले, असा काही विद्वानांचा अभिप्राय आहे.

**भावोना**

संस्कृतनंतर जी नाटके आसामीत होऊ लागली.त्या नाट्यप्रयोगांना 'भावोना' म्हणतात. नटाला 'भावोरिया', व विदूषकाला 'बाहुआ' म्हणतात. भावोरियाचे खेळ फार पूर्वीपासून होत आहेत. भावोरियाजवळ शीघ्र कवित्व असते. तो खेळात स्वरचित त्याच वेळी स्फुरलेली गाणी गातो. सामाजिक जीवनातील विविध घटनांना नाट्यरूप दिले जाते.

'धुलिया' हेही एका विशिष्ट प्रकारच्या खेळाचेच नाव आहे. धुलियात अभिनयाला प्राधान्य दिलेले असते.

**ओझापाली**

'ओझापाली' हे देखील आसाममधील नाटकाचे प्राचीन रूप आहे. 'ओझा' हे या नाटकातील मुख्य पात्र असते. ओझा एखादी पौराणिक कथा संवादरूपाने सांगतो. त्या संवादात 'दयनापाली' हे पात्र ओझाबरोबर भाग घेते. सर्व पालीत दयनापाली हा मुख्य असतो. 'पाली' म्हणजे खेळ करणारी पात्रे. नाचणे आणि गाणे ही कामे त्यांच्याकडे असतात. यातील नृत्ये नाट्यशास्त्राच्या नियमानुसार बसवलेली असतात. या नृत्यनाट्य पद्धतीने रामायण-महाभारतातील कथा रंगभूमीवर आणतात.

इंग्रजी राजवटीत पाश्चात्य नाटकांचे अनुवाद झाले. त्यानंतरच्या काळात लक्ष्मीनाथ बेझबरुआ यांची हास्यप्रधान नाटके बरीच लोकप्रिय ठरली. त्यांनी बरीच ऐतिहासिक नाटकेही लिहिली.

स्वातंत्र्योत्तर काळात नाटकांच्या विषयातही नावीन्य आले. नवीन नाटके लिहिली गेली, तशी ती सादर करणारी थिएटर्स व क्लबही आसाममध्ये अस्तित्वात आले. बहुअंकी नाटकांऐवजी तीन-चार दृश्यात होणारी नाटके आली. त्यांचे विषय प्रामुख्याने सामाजिक आहेत. वर्गकलह, आर्थिक समस्या, बेकारी, मध्यमवर्गीय आकांक्षा इत्यादी विविध प्रश्नांवर नाटके लिहिली गेली.

नेताजींच्या आझाद हिंद सेनेच्या विषयावर 'लभिता', तर १९४२ च्या आंदोलनावर 'आहुती' ही नाटके आली. नवीन एकांकी नाटकेही अलिकडे लोकप्रिय होत आहेत.

नेपथ्य, प्रकाश-योजना, दिग्दर्शन यातही नवीन तंत्र अमलात येत आहे.

**चित्र**

सातव्या शतकात कामरूपाचा राजा भास्करवर्मा याने त्याच्या समकालीन हर्षवर्धन सम्राटास मित्रभावनेने नजराणा धाडला होता. त्या भेटीत घायपाताच्या आणि पक्व खिऱ्याच्या गुलाबी वर्णाच्या सालींवर लिहिलेली सुरेख सचित्र पुस्तके, चित्रकारीसाठी कुंचले, चित्रपट्टिका, पक्ष्यांसाठी सोनेरी रंगाने रंगवलेले बांबूंचे पिंजरे इत्यादी वस्तू होत्या, असा उल्लेख आढळतो. आणि आसामी चित्रकलेचा हाच पहिला उपलब्ध संदर्भ आहे.

प्राचीन असमिया ग्रंथांचे लेखन झाडांच्या सालींवर झालेले आहे. कापूस वा चिंध्यांच्या लगद्यापासून लिहिण्यासाठी कागद तयार करण्याची कला नंतर

विकास पावली.

१५ व्या शतकातील वैष्णव संतकवी शंकरदेव हे उत्कृष्ट चित्रकारही होते. त्यांनी आपल्या ' चिन्हयात्रा ' या नाट्य प्रयोगासाठी ' सात वैकुंठां ' ची सुरेख चित्रे काढली होती. एका प्रसंगी त्यांनी पिवळा सोमल व हिंगूळ यांनी रेखाटलेले हत्तीचे उत्कृष्ट चित्र एका लाकडी ग्रंथमंजूषेवर चिकटवून ती मंजूषा नरनारायण राजाला नजर केली होती.

पुष्कळशी प्राचीन आसामी हस्तलिखिते सचित्र केलेली आढळतात. राजे लोक किंवा त्यांचे सरदार यांच्यासाठी लिहिलेली मोठमोठी काव्ये बहुधा सचित्र असत. घातकी पापांची अथवा विष्णूच्या दशावतारांची काढलेली चित्रे अनेक हस्तलिखितांमधून दिसतात. प्राचीन चित्रांचे विषय बहुधा तत्कालीन राजे, हत्ती, अश्व, युद्धभूमी असे असत.

आसामी चित्रकलेत पिवळ्या आणि हिरव्या रंगांचे प्राचुर्य अधिक दिसते. वर्षोन वर्षे टिकणारी काळीकुळकुळीत गडद शाई लिहिण्यासाठी व चित्र रेखाटण्यासाठीही वापरली जाई. नीळ, गेरु, पिवळी माती, हिंगूळ, काजळी व चुनखडी इत्यादी रंग–साहित्याचाही उपयोग केला जात असे.

शाक्त पंथाच्या प्रसाराबरोबर देव–देवतांच्या अनेकविध प्रतिमा आसाममध्ये चित्रित झाल्या व त्यांचा प्रसारही झाला.

पंधराव्या शतकात लिहिलेले व उत्कृष्ट रीत्या चित्रित केलेले भागवत पुराण हा देखील जुन्या आसामी चित्रकलेचा उत्तम नमूना आहे. या चित्रकलेवर स्थानीय शैलीबरोबरच राजपूत-मोगल चित्रशैलीचाही प्रभाव दिसून येतो. चित्रातील चेहेरे एका बाजूनेच रेखलेले आढळतात.

प्राचीन आसामी चित्रकलेचा आणखी एक उत्तम नमूना आढळतो ' हस्ती विद्यार्णव ' या ग्रंथात. हा ग्रंथ हत्तीपालनावर असून विविध तऱ्हेने आणि भिन्न भिन्न ढबीतले हत्ती चित्रित केलेले आहेत. अहोम राजांचे दरबार, हत्तींची झुंज, हत्तीवरून चाललेली राजांची मिरवणूक इत्यादी चित्रित केलेली दृश्ये फारच कलापूर्ण आहेत. ही चित्रे जलरंगात रेखलेली असून सोनेरी वर्खाने सजवलेली आहेत. इतका काळ लोटला तरी त्यांचे रंगसौंदर्य व चमक टिकून आहे हे वैशिष्ट्य होय.

आसामी चित्रकलेची परंपरा आजही कायम आहे. जुनी भित्ती चित्रे, कोरीव लाकडावरील नक्षीकाम यामधून जुन्या आसामी लोककलेचा परिचय

घडतो. वैष्णव सत्रांमधून हे नमूने पाहावयास मिळतात.

**वास्तुशिल्प**

प्राचीन काळातील प्रगत वास्तुशिल्पातील आसामची वैशिष्टये दाखविणाऱ्या विविध वास्तु आसाम प्रदेशात आजही साक्ष देत आहेत. या वास्तू पुष्कळशा मंदिरांच्या स्वरुपात आहेत.

अहोम राजवटीतील पर्वतीया गावाजवळील विटांच्या बांधणीचे शिव-मंदिर हे बरेच प्राचीन आहे. हे मंदिर पूर्वीच्या उध्वस्त झालेल्या मंदिरावरच बांधलेले आहे. पूर्वीचे मंदिर ६ व्या शतकातील गुप्त राजवटीच्या वेळचे असावे. अहोमांनी परत बांधलेले मंदिरही १८९७ च्या भूकंपात ढासळून गेले. प्राचीन महाद्वाराची चौकट मात्र साक्षीरूप आहे. तिच्यावरील नक्षी, तिची बांधणी ही गुप्तकालीन पाटलीपुत्र स्थापत्यकलेचा नमूना आहे.


या मंदिराच्या भग्नावशेषांमधूनही जुन्या शिल्पकलेचे उत्कृष्ट नमूने पहा-वयास मिळतात. कमळाच्या मनोहर आकृत्यांचे छत प्रेक्षणीय आहेत. एका स्तंभाच्या माथ्यावर प्रेमासक्त हरिण जोडप्याची एक धनुर्धर शिकार करीत आहे असा प्रसंग शिल्पित केलेला आहे. महाभारतामधील पंडू राजाच्या जीवनातील घटना कलाकाराने शिल्पबद्ध केलेली आहे. एका छिन्नभिन्न छतावर स्त्री-पुरुष नर्तकांच्या विविध नृत्यकृती रेखाटलेल्या आहेत.

शिवसागर शहराच्या परिसरातही पुष्कळ प्राचीन अवशेष पहावयास मिळतात. सरोवराच्या काठी बांधलेले शिवमंदिर प्रेक्षणीय आहे. दुर्गा आणि विष्णू यांचीही दोन मंदिरे तिथे आहेस. विष्णुमंदिरातील शिल्पकला मुग्ध करणारी आहे.

**अल्पना**

शेजारच्या बंगाल प्रदेशाच्या सहवासाने आसामच्या काही चालीरीतींवर व कलाकौशल्यावर बंगाली छाप उमटलेली दिसते. शुभप्रसंगाच्या वेळी शंख वाजवण्याची प्रथा आसाममध्ये बंगालप्रमाणेच आहे. तसेच घरापुढे अल्पना— रांगोळी काढण्याचीही पद्धत आहे. तांदळाच्या शुभ्र पिठीची सफेती पाण्यात कालवून चिंधीने अल्पना रेखाटतात. अल्पनेच्या विविध प्रकारच्या सुरेख, डौलदार आकृत्या असतात. काही वाटोळ्या-वर्तुळाकार असतात, काही साखळीसारख्या वल्लरी असतात.

अंगणाप्रमाणेच घराच्या भिंती व छतेदेखलि सुंदर सुंदर अल्पनांनी नटवतात खेड्यापाड्यांतूनही स्त्रिया आपल्या लहानखुऱ्या घरापुढील जागा साफसूफ करून अल्पना रेखतात.



अल्पना

काही स्त्रिया कुशल हातांनी विविध रंगांनीही आपली अल्पना सजवतात. हिरवा, पिवळा, तांबडा रंग वापरून शोभिवंत करतात.


अल्पनेने सजवलेले घर प्रसन्न, मंगल दिसते.

**कलाकुसर**

'प्रत्येक आसामी मुलगी ही जन्मजातच विणकर असते. जिला विणाई येत नाही ती चांगली गृहिणी बनू शकत नाही'—असे गांधीजींनी आपल्या 'हरिजन' मधील लेखात आसाम भेटीनंतर उद्गार काढलेले आहेत.

लहान लहान स्वरूपाचे कुटीरोद्योग, विशेषतः विणाईचा उद्योग तर

आसाममध्ये सर्व गावागावातून चालतो. शेतीला विणाईचा जोडधंदा मिळतो. काही ठिकाणी तर शेतीपेक्षाही विणाईचा धंदा मोठ्या प्रमाणावर व किफायत-शीरपणे चालतो.




पितळी भांडी

**कामरूप आसाम**

सुआल्कुंची येथील रेशमाचे कापड विणणारे, करीमगंज येथील सुती कापड बनवणारे, सारथेबारीचे व हाजा येथील पितळेची भांडी व ओतीव धातू-काम करणारे कारागीर फार प्रसिद्ध आहेत. येथील कारागिरांचा शेती हा दुय्यम धंदा आहे.

रेशमी कापड आसाममध्ये दोन तऱ्हेचे होते. तुतीवरच्या रेशमाच्या किड्या-पासून बनणारे ते ' मुगा ' सिल्क व एरंडीवरील किड्यांपासून बनलेल्या सिल्कला ' एंडी ' म्हणतात. एंडी दिसायला सुंदर व उबदार असते. एंडी शाल फार प्रसिद्ध आहे.

कुटीरोद्योगात हातमाग, लोहारकाम, सुतारकाम, ओतीव धातूकाम, पितळेची भांडी बनवणे इत्यादी व्यवसाय प्रामुख्याने चालतात.



सुंदर वेतकाम

वेत आणि बांबूचे उत्पादन आसामच्या जंगलातून पुष्कळ होते. त्यामुळे बांबूपासून व वेतापासून निरनिराळ्या वस्तू बनवण्याचा उद्योगही आसामात मोठ्या प्रमाणावर चालतो. टोपल्या, करंड्या, पेट्या, अशा पुष्कळ सुंदर, कलात्मक व देखण्या वस्तू बनवतात. पावसात शेतकरी 'जापी'-गवती टोपी वापरतात. तीही सुंदर असते.

आसामच्या जंगलात हत्तींचे वास्तव्य प्राचीनकाळापासून आहे. त्यामुळे हस्तीदंताची उपलब्धता इथे आहे. हस्तीदंताच्या कोरीव, कातीव नक्षीच्या विविध वस्तूही आसामात बनवल्या जातात.

□ □

# स्थलयात्रा

आसामचे लोकजीवन व कलाजीवन जसे समृद्ध, रसिक व वेधक आहे, तसेच तिथले स्थलदर्शनही लोभस, उद्बोधक आहे. आसामच्या भूमीत डोंगरदऱ्या, वने-नद्या, जशा आहेत, तशीच देवदेवतांची मंदिरे, शहरे, औद्योगिक प्रकल्पही आहेत.

**गोहाटी**

ब्रह्मपुत्रेच्या काठी हे शहर वसलेले आहे. आसामची येथे आता राजधानी असून आसाममधील सर्वात मोठे हेच शहर आहे. येथूनच ब्रह्मपुत्रा ओलांडून आसामच्या भूमीत प्रवेश होतो, म्हणून या शहराला आसामचे प्रवेशद्वार असे म्हणतात. गोहाटी, गौहाती, गौहत्ती किंवा गुवाहाटी असे निरनिराळे उच्चार करतात. याच नगरीचे प्राचीन नाव होते प्रागज्योतिषपूर. येथून जवळच कामाख्यादेवीचे प्रसिद्ध मंदिर आहे.


मंदिरात देवीची मूर्ती नसून एक शिळा आहे. ही शिळा व पाण्याचा जिवंत झरा हीच पूजास्थाने आहेत. आसामी जनतेची ही मुख्य देवता आहे.

वरिष्ठ न्यायालय, विद्यापीठ, आकाशवाणी इत्यादी शासकीय व शैक्षणिक संस्था शहरात आहेत.

' तरुणराम फूकन पार्क ' व ' नेहरू पार्क ' ही सुंदर उद्याने आहेत. तरुणराम फुकन हा आसामच्या स्वातंत्र्यलढ्यातील वीर नेता होता. त्याचा पुतळाही त्या पार्कमध्ये उभारलेला आहे.

' ऑइल रिफायनरी 'चा प्रचंड उद्योग गोहाटीमध्ये उभारलेला आहे. कच्चे तेल येथे आणल्यावर ते शुद्ध केले जाते व पेट्रोल, डिझेल, मोबिल ऑइल, टारकोल व अन्य उपयुक्त वस्तूंचे उत्पादन केले जाते.

जनार्दन मंदिर नावाचे शिवालय शहरात आहे, तसेच प्राचीन नवग्रह मंदिरही सीलपोखरी नावाच्या तलावाजवळ आहे. हे अत्यंत निसर्गरमणीय स्थळ



कामाख्या-मंदिर


असून याच्याविषयी अशी आख्यायिका सांगतात की, ब्रह्मदेवाने येथे बसूनच पहिल्यांदा नवग्रहांची गणना केली व त्याच वेळेपासून ग्रह-विज्ञान व ज्योतिष ज्ञानाला प्रारंभ झाला. मंदिरातील आतील अंधेऱ्या गाभाऱ्यात नवग्रहांची नऊ लिंगे असून मंदिराच्या नऊ खिडक्यांमधून रात्रीच्यावेळी ती आपण पाहू व मोजू शकतो. ' उग्रतारा ' नामक मंदिरही आहे.

गोहाटीचे प्राणिसंग्रहालय मोठे पाहण्यासारखे आहे. सर्व तऱ्हेचे प्राणी येथे असून बांबूच्या पिंजऱ्यांतून त्यांना ठेवलेले आहे.

गोहाटी ही आसामची मोठी बाजारपेठही आहे. चहाचा व्यापार मोठा आहे.

**शिलाँग**

आसाममधील हे दुसरे महत्त्वाचे शहर गोहाटीपासून १०१ किलोमीटर अंतरावर आहे. आसामची व मेघालयाची राजधानी येथे होती. सुमारे १५००



गोहाटीचा तेलशुद्धीकरण कारखाना

मीटर उंचीवर हे शहर वसलेले असून भारतातील उत्कृष्ट थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. धबधबे, जलप्रवाह, खिंडी, आणि स्त्रियांचे आधिपत्य असलेला 'बारबझार' ही इथली स्थळे प्रेक्षणीय आहेत.

**वसिष्ठ आश्रम**

गोहाटीजवळच महर्षी वसिष्ठांचा आश्रम आहे. संध्या, ललिता व कांता ह्या तीन नद्यांचे प्रवाह येथून वाहतात. हे अत्यंत रमणीय स्थळ आहे.


**हाजो**

गोहाटीपासून बावीस किलोमीटर अंतरावर ब्रह्मपुत्रा पार केल्यावर हाजो

हे गाव भेटते. पीर गैसुद्दीन अवलिया याने बांधलेली प्रसिद्ध मशीद येथे आहे. बौद्धाचेही हे तीर्थस्थान आहे. येथे पितळेची सुबक भांडी बनविण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो.

**शिवसागर**

आसाममधील हे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्वाचे ठिकाण आहे. अहोम राजांनी आपली राजधानी शिवसागर येथे स्थापन केली होती. करंगघर राजप्रासाद बांधला. शिवसागर तलावाच्या काठीच शिवाचे मोठे मंदिर असून शिवरात्रीच्या वेळी येथे दरवर्षी मोठी यात्रा भरते.




करंगघर

रुद्रसिंह राजाने आपली वीर माता जयमती हिच्या स्मरणार्थ शहराजवळच विस्तीर्ण ' जयसागर ' नावाचा तलाव बांधलेला आहे. या तलावाच्या काठी जयमंदिरही उभारलेले आहे.

शिवसागर येथे दुर्गा व विष्णू या देवतांची व अन्यही पुष्कळ मंदिरे आहेत.

प्राचीन स्थापत्य व शिल्पकलेचे भग्नावशेष या भागात बरेच पाहायला मिळतात.

अहोम राजांनी बांधलेले ‘ रंगघर ’ येथून पाच किलोमिटर अंतरावर आहे. या रंगघराच्या मंचावर बसून उत्सवाच्या वेळी अहोम राजे मल्लयुद्ध, तिरंदाजी, प्राण्यांच्या झुंजी इत्यादी क्रीडा पाहत असत.



रंगघर

**नामरूप**

येथे मोठा खत-कारखाना आहे. यापूर्वी हा भाग घनदाट जंगलाखाली होता. नामरूपच्या खत कारखान्यात अमोनियम सल्फेट व यूरिया अशा दोन प्रकारची रासायनिक खते तयार होतात. या खतांचा उपयोग आसाममधील चहाच्या मळ्यांसाठी व अन्य धान्य-उत्पादनासाठी होतो.

**नाहरकटिया**

या भागात तेल व नैसर्गिक वायूचा साठा बराच मोठा आहे. त्यामुळे या ठिकाणाला महत्त्व आले आहे. तेल व गॅस काढण्याचे कारखाने येथे आहेत.

तेथून दहा मैलांवर ढुलियाजान हे ठिकाण आहे. येथून गोहाटी व बरौनी येथे तेल धाडण्याचा मोठा कारखाना आहे. ढुलियाजानपासून वीस मैलांवर दिग्बोई गाव आहे. येथे बर्मा इत्यादी तेल कंपन्यांची मोठी कार्यालये आहेत. या भागात तेलाच्या वाहत्या सुवर्णाचा उद्योग प्रचंड आहे.

**माजुली**

ब्रह्मपुत्रेच्या प्रवाहातील हे एक बेट आहे. शंकरदेवांनी प्रस्थापित केलेल्या वैष्णव संप्रदायाचे येथे मोठे केन्द्र-सत्र आहे. पारंपरिक आसामी नृत्य, नाट्य करणारे कलावंत व गायक येथे आहेत. प्राचीन कला येथील कलाकारांनी काळजीपूर्वक

मराठी ... ९२००५

जतन केलेली आहे.



उमानंद बेट

**उमानंद**

ब्रह्मपुत्रेच्या प्रवाहातील हे दुसरे एक बेट. हे गोहाटीजवळच आहे. येथे शिवमंदिर आहे. हे मंदिर १६९४ मध्ये आहोम राजा गदाधरसिंह याने बांधलेले आहे. खडकातून कोरलेल्या देवदेवतांच्या मूर्ती मंदिराच्या भिंतींवर असून त्या प्रेक्षणीय आहेत. हे निसर्गरमणीय क्षेत्रस्थान आहे.

**काजीरंगा**

येथे वन्य पशूंसाठी अभयारण्य राखलेले आहे. हत्ती, गेंडये, सिंह, चित्ते, हरिण आदी विविध तऱ्हेचे पशू येथे पाहायला मिळतात.

□ □

# अर्वाचीन आसामचे शिल्पकार

प्रत्येक प्रदेशाच्या प्रगतीला त्या ठिकाणच्या माणसांचे पुरुषार्थी प्रयत्न कारण झालेले असतात. अशा प्रयत्नांमधूनच शैक्षणिक, सामाजिक, राजकीय इत्यादी क्षेत्रांत विकास घडून येत असतो, प्रदेश पुढे जात असतो. अशा काही प्रयत्नशील आसामी स्त्री-पुरुषांचा हा अल्प परिचय :

**डॉ. हरेकृष्ण दास**


गोहाटीचे सुप्रसिद्ध सिव्हिल सर्जन डॉ. हरेकृष्ण दास यांनी डॉक्टर म्हणून देश-बांधवांची सेवा केलीच; पण स्वातंत्र्याच्या चळवळीत गांधीजींच्या हाकेला ओ देऊन त्यांनी डॉक्टरीपेशा सोडला. देशसेवेचे व्रत घेतले. तुरुंगवासही भोगला.

हरिजन सेवेच्या कार्यानिमित्त गांधीजींनी देशभर दौरा काढला त्या वेळी ते आसाममध्येही गेले होते. तेथे त्यांनी ग्रामसेवा-शिक्षणाची सुरुवात केली. डॉ. हरे-कृष्णांनी आपली स्वकष्टार्जित संपत्ती, घरदार इत्यादी सारे विश्वस्तांवर सोपवले आणि गांधीजींच्या ग्रामसेवा शिक्षणासाठी इमारत व पैसा दिला. त्यातूनच 'शरणिया आश्रम' उभा राहिला. तरुणांच्या ग्रामसेवा शिक्षणासाठी डॉक्टरांनी 'चांदमारी आश्रम'ही काढला. एवढेच करून ते थांबले नाहीत तर आसाममध्ये इतरत्रही ठिकठिकाणी त्यांनी स्वखर्चाने अशी शिक्षण केन्द्रे उघडली. याच सुमारास आसाममध्ये विधायक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा एक संघ स्थापन झाला व त्याचे पहिलेच अध्यक्ष डॉ. हरेकृष्ण होते. आसाममधील विधायक कार्याला यांच्या-मुळे खूपच बळ लाभले. स्वातंत्र्याच्या चळवळीत यांचे सगळे कुटुंबच सहभागी झाले होते.

**गोपिनाथ बारडोलाई**

भारताच्या स्वातंत्र्य-लढ्यातील आसामचे नेते म्हणून यांचे नाव प्रसिद्ध आहे. यांनी आपले सारे जीवनच देशसेवेला वाहिलेले होते. साधी राहणी व सरळ

शालीन स्वभाव यामुळे गोपीनाथजी लोकप्रिय होते. हाती घेतलेले काम तडीस नेण्याबद्दल यांची ख्याती होती. देशासाठी यांनी अनेक वेळा तुरुंगवास भोगला. १९३७ साली व स्वातंत्र्यानंतर १९४७ साली बारडोलाई आसामचे मुख्यमंत्री म्हणून निवडले होते. आसाममधील तरुणांना स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घेण्याची प्रेरणा बारडोलाईंनी दिली.



गोपीनाथ बारडोलाई

स्वातंत्र्यानंतर असमिया भाषिकांचे स्वतंत्र आसाम राज्य व्हावे यासाठी त्यांनी पुष्कळ प्रयत्न केले व यश मिळवले. त्याचप्रमाणे आसामसाठी स्वतंत्र विद्यापीठासाठीही त्यांनी आंदोलन उभारले व विद्यापीठ मिळवले. असमिया साहित्याच्या व हिंदी राष्ट्रभाषेच्या प्रचारासाठीही त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या अखंड व निःस्वार्थ कार्यामुळे सर्व थरांतील जनमानसात त्यांच्याविषयी अपार

आदर भावना होती. कॉंग्रेस वर्किंग कमिटीत किंवा अन्य राष्ट्रीय कार्यात आसामचे प्रतिनिधित्व बारडोलाईच करीत असत. ५ ऑगस्ट १९५० रोजी त्यांचे निधन झाले.

**ज्योत्स्ना चंदा**

१९०४ साली सिल्चर येथे यांचा जन्म झाला. १९२४ साली अर्थशास्त्राचा अभ्यास करून बी. ए. झाल्या. आसाममधील या पहिल्यावहिल्या पदवीधर.

श्रीमती चंदा यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी व इतरही सामाजिक सुधारणांसाठी आसाममध्ये पुष्कळच काम केले. या प्रदेशातील बहुतेक महिला संस्थांशी त्यांचे जवळचे नाते आहे. आसाममध्ये सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू झाले त्या वेळी पहिल्या महिला चेअरमन म्हणून यांची जिल्हा स्कूल बोर्डामध्ये निवड झाली. प्रांतातील कॉंग्रेसच्या राजकारणातही चंदा यांनी महत्त्वपूर्ण भाग घेतला. आसामच्या विधिमंडळात त्या आमदार म्हणून निवडून आल्या होत्या. सिल्चर येथे झालेल्या गोळीबाराचा निषेध म्हणून त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला होता.

आसाममधील स्त्रियांच्या उन्नतीसाठी श्रीमती चंदा ह्या 'विजयिनी' नामक मासिक चालवीत असत. आसाममधील वंगभाषी संमेलनाच्या १९६० साली त्या अध्यक्ष होत्या. कामगार-क्षेत्रातही त्यांनी काम केले. रेल्वे कामगार युनियनचे अध्यक्षपद त्यांनी सांभाळले, तसेच 'भारतीय चहा मजदूर संघ, कचार' या संस्थेच्याही त्या अध्यक्ष होत्या. १९६२ साली त्या लोकसभेत निवडून गेल्या.

**ललिता फूकन**

गोहाटीमधील ह्या एक समाजकार्यकर्त्या आहेत. 'रानी समाज कल्याण बोर्ड' या संस्थेच्या त्या अध्यक्ष होत्या. महिला समितीच्यावतीने त्यांनी जेल व्हिजिटर म्हणून बरेच दिवस काम केले. या कामात असतानाच त्यांनी अनेक वेळी मोठा धोका पत्करूनही लाचलुचपत विरोधी मोहिमेत पोलिसांना साहाय्य केले आहे. महिला सुधारणा या विषयांवर त्या आसामी वृत्तपत्रांमधून सतत लिहीत असतात. त्यांच्या लेखांचा संग्रह 'जिलीमिली' नावाने प्रसिद्ध झालेला आहे. हाजो प्रकल्पाचेही त्या काम पाहतात.

**रेणुकादेवी बरकाटकी**

आसाममधील ह्या एक धडाडीच्या महिला कार्यकर्त्या आहेत. शालेय जीवनापासूनच ह्या राजकीय चळवळीत पडल्या. त्यांच्या जहाल तेजस्वीपणामुळे बरोबरचे विद्यार्थीही त्यांना दबकून असत व 'कालीमाई' म्हणून त्यांना संबोधीत

असत. उत्कृष्ट वक्तृत्व व संघटनाचातुर्य त्यांचे जवळ आहे. १९६२ साली त्या लोकसभेत निवडून गेल्या. लोकसभेतील कारकीर्दही त्यांनी गाजवली. त्यांचे पती श्री. एम्. बरकाटकी हे आसाममधील प्रसिद्ध पत्रकार आहेत.

**अमलप्रभा दास**

या आसाममधील विधायक प्रवृत्तीच्या मोठ्या कार्यकर्त्या आहेत. डॉ. हरेकृष्ण दास यांच्या या कन्या असून वडिलांप्रमाणेच त्यांनी पदवी घेतल्यावर स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. कारावासही भोगला. यांची आईही देशसेवेच्या क्षेत्रातच कार्य करीत होती. १९३१ मध्ये मायलेकींनी सेवाग्रामला गांधीजींच्या सान्निध्यात राहून विधायक कार्याचे शिक्षण व स्फूर्ती घेतली.

'शरणिया आश्रमा' ची धुरा अमलप्रभाबाई यशस्वीपणे आज कित्येक वर्षे वाहात आहेत. नौखालीत दंगलीच्यावेळी गांधीजींच्या बरोबर त्या होत्या. आसामच्या गरीब व दलित जनतेच्या उन्नतीसाठी त्यांनी अपार कष्ट केले असून शेकडो खेड्यापाड्यातून हिंडून त्यांनी विविध तऱ्हेची कामे सुरू केली आहेत. 'मूलोद्योग शिक्षण', 'समाज कल्याण', 'भूदान आंदोलन' अशा किती तरी कामात त्यांनी भाग घेतला. आपले सारे आयुष्यच त्यांनी देशसेवेला वाहिलेले आहे. थोर सर्वोदयी कार्यकर्त्या म्हणून त्यांना आसामची जनता ओळखते, मानते.

**कौशल कोनवर**

१९४२ च्या स्वातंत्र्य-लढ्यात आसाममध्ये अनेक तरुणांनी भाग घेतला. कनकलता बरुआ, मुकुंद काबता, मदनचंद्र बर्मन, रामरतन दास, लक्ष्मीराम हजारिका इत्यादी वीरांनी प्राणार्पण केले. हजारो तुरुंगात गेले.

कौशल कोनवर हे अहोम जमातीतले वीर होते. त्यांनी क्रांतीत रेल्वेचे रूळ उखडले. त्यांच्यावर खटला भरला. १५ जून १९४३ रोजी त्यांना फाशी देण्यात आले. फाशीच्या तख्तावर चढताना ते म्हणाले होते, "ज्या ध्येयासाठी मला फासावर चढावे लागत आहे. त्याबद्दल मला अभिमान वाटत आहे. ईश्वराची माझ्यावर अत्यंत कृपादृष्टी आहे, म्हणून तर त्याने मला या महान कार्यासाठी निवडले आहे."

आणि नंतर "पार करो दीनानाथ संसार सागर" हे गीत गात गातच ते फाशी गेले.

आसाममधील सामाजिक व राजकीय क्षेत्रात आणखीही बरीच मोठी माणसे

होऊन गेली. आजही आहेत: केन्द्रीय अन्नमंत्री फकरुद्दीन अली अहमद, आसामचे मुख्य मंत्री बिमला प्रसाद चालिहा, तयबुल्ला, विष्णुराम मेधी, डी. शर्मा, श्री. महेंद्र मोहन व बुद्धेश्वरी हझारिका, सुचित्रत्ता रॉय-चौधरी, डॉ. निर्मला चालिहा, इत्यादी स्त्री-पुरुषांनी आसामची सेवा करून आसामला पुढे आणले आहे. आसामला प्रगती-पथावर नेले आहे.

□ □

# विकासोन्मुख आसाम

भारत स्वतंत्र झाल्यानंतर नवभारताच्या उभारणीचे काम जोमाने सुरू झाले. नियोजन मंडळाची स्थापना झाली आणि योजनाबद्ध विकासाची दिशा ठरवण्यात आली. पंचवार्षिक योजना अंमलात आल्या. गेल्या पंचवीस वर्षांत तीन पंचवार्षिक योजना पार पडल्या असून चौथी योजना कार्यान्वित आहे. या अवधीत आसाम राज्यातही अनेक प्रकारची विकासकार्ये आकारास आली— काही येत आहेत.

**शेती**

भारतामधील इतर प्रदेशांप्रमाणेच आसाम हा देखील कृषिप्रधान प्रांत आहे. बहात्तर टक्के लोक कृषिव्यवसायातच आहेत. त्यामुळे शेती सुधारणा व अधिक धान्योत्पादन या गोष्टींकडे आसाम सरकारने लक्ष पुरवलेले आहे. पूर्वीची जमीनदारी व जोतेदारी कायद्याने निकालात काढली असून जास्तीतजास्त १५० बिघे जमीन ठेवण्याचा सीलिंगचा कायदाही १५ फेब्रुवारी १९५८ पासून अंमलात आलेला आहे. या कायद्यान्वये सुमारे ३४००० एकर जमीन सिलिंगपेक्षा जास्त जमीनधारकांकडून ताब्यात घेण्यात आली. धर्मदाय संस्थांच्या ताब्यात असलेल्या जादा जमिनीबद्दलही कायदा करून २२ संस्थांकडून ५६०० बिघे जमीन ताब्यात घेतली आहे. त्याचप्रमाणे जमिनीत राबणाऱ्या कुळांना संरक्षण देणारा कायदाही अंमलात आलेला आहे.

सुधारलेली अवजारे, बी-बियाणे, खते, रोगनाशक औषधे इत्यादींचा पुरवठा करून शेतीचे उत्पादन वाढविण्यात येत आहे. लहान पाटबंधाऱ्याच्या योजनाही झालेल्या आहेत. शेतीचे प्रशिक्षण देण्याची व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची सोयही केलेली आहे.

राज्यातील सत्तर टक्के जमीन भातशेतीखाली आहे, आणि सुमारे १९·६६ लाख टन इतके भाताचे उत्पादन वाढलेले आहे. त्याच प्रमाणात चहा, कापूस, ताग,

ऊस व इतर पिकांचे उत्पादन वाढत आहे. वहितीखालच्या जमिनीचे प्रमाणही वाढत आहे. १९५२–५३ साली २४ दशलक्ष हेक्टर जमीन लागवडीखाली होती ती १९७२ साली ३० दशलक्ष हेक्टर झाली आहे. सुमारे ५,१४,००० हेक्टर जमिनीत दुबार पीक घेतले जाते.

**चहा-उद्योग**

चहा हे आसाममधील महत्त्वाचे पीक आहे. आसाममधील एकूण पिकाखालील जमिनींपैकी सात टक्के जमीन चहा-उत्पादनाखाली आहे. दारांग, शिवसागर आणि लखिमपुर या तीन जिल्ह्यांत तर ७५ टक्के, व काचार जिल्ह्यात २० टक्के जमिनीमध्ये चहाचे उत्पादन होते. एकूण आसाममध्ये ७५५ चहाचे मळे असून १,७६,८१२ हेक्टर जमीन या मळ्यांखाली आहे. २०१ दशलक्ष किलोग्रॅम



चहाच्या मळ्यात

चहाचे दरवर्षी उत्पादन आसाममध्ये होते. त्यापैकी १२० दशलक्ष किलोग्रॅम एवढा चहा परदेशी जातो व त्यांपासून ६२ टक्के परदेशी चलन भारताला मिळते. या चहा–उद्योगात सुमारे सात लक्ष कामगार कायमचे गुंतलेले असून जवळ जवळ तेवढ्यांनाच हंगामानुसार रोजगार मिळू शकतो.

**पूर–नियंत्रण**

आसाममध्ये ब्रह्मपुत्रा व तिच्या उपनद्या यांना दरवर्षी येणारे महापूर ही

एक फार मोठी समस्या होती. या पुरांपासून प्रचंड नुकसान होत असे. ' उच्चाधिकार ब्रह्मपुत्रा पूर-नियंत्रण मंडळा ' ची त्यासाठी खास स्थापना केलेली असून ३० कोटी रुपये खर्च करून पूर-प्रतिबंधक योजना करण्यात येत आहे. ही योजना पूर्ण झाल्यानंतर आसामच्या विकास-कार्याला आणखी गती मिळणार आहे.

**वीज—प्रकल्प**

आसाम राज्यात पुष्कळच नद्या आहेत. त्यांच्या पाण्याचा योजनापूर्वक उपयोग केल्यास १२ दशलक्ष किलोवॅट, म्हणजे भारतातील जल-विद्युत निर्मितीच्या ३० टक्के इतकी वीज आसाममध्येच निर्माण होऊ शकते. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये वीज-निर्मिती प्रकल्पावर आसाममध्ये अनुक्रमे २० दशलक्ष व ५८·५ दशलक्ष रुपये खर्च करण्यात आला आहे. तिसऱ्या योजनेत ४·१७ दशलक्ष रुपये वीज-प्रकल्पांवर खर्च झाले आहेत.

आसाममधील ' उमत्रू ' हा १९५७ साली झालेला पहिला वीज-प्रकल्प होय. यातून दरवर्षी ८,४०० किलोवॅट वीज-निर्मिती होते. यानंतर ' यूमीआम हैड्रो-इलेक्ट्रिक प्रॉजेक्ट ', ' नाहरकाटिया थर्मल प्रॉजेक्ट ' व ' नूनमाटी थर्मल प्रॉजेक्ट ' हे मोठे प्रकल्प तयार झाले. तिसऱ्या योजनेच्या अखेरीस आसामची एकूण वीज-निर्मितीची क्षमता १६० मेगॅवॅट होती, आज तीच सुमारे ६० दशलक्ष किलोवॅट झाली आहे.

आसाम स्वतःची वीजेची गरज भागवून शेजारच्या नागालँड, त्रिपुरा, मणिपूर व उत्तर बंगाल ह्या राज्यांनाही काही प्रमाणात वीज-पुरवठा करू शकतो. भूतानला वीज-पुरवठा करण्याचीही योजना आहे.

**उद्योग-धंदे व खनिजे**

आसामच्या भूमीत पुष्कळच खनिज संपत्ती दडलेली आहे. तेल, नैसर्गिक वायू, कोळसा, चुनखडी, इत्यादींची या भूमीत विपुलता आहे. बांबू, लाकूड यांचेही उत्पादन जंगलात होते. एकट्या बांबूचे वार्षिक उत्पन्न १२ लक्ष टन आहे. ज्यूट, ऊस, संत्री, अननस आणि इतर फळे यांचेही पीक आसाममध्ये भरपूर आहे. कृषि-औद्योगिक विकासाला येथे भरपूर संधी आहे. तथापि आज तरी आसामची या बाबतीतली विकासाची गती मंद आहे. त्याला अन्य-अडचणीही कारण आहेत. यांतूनही मार्ग काढला जात आहे. सध्या येथे लाकूड कापण्याच्या २०० गिरण्या आहेत, त्या शिवाय लाकडांचे तक्ते करण्याचे कारखानेही आहेत. सध्या

एक साखर कारखाना असला तरी चौथ्या योजनेत आणखी दोन साखर कारखाने होणार आहेत.

'आसाम नॅचरल गॅस कंपनी'चे औद्योगिक विकासासाठी वायू पुरवण्याचे काम चालू आहे.' ही राज्य सरकारची कंपनी आहे, तर 'इंडिया कार्बन लि.'ही सरकार व खाजगी अशा व्यवस्थेखाली दरवर्षी ३०,००० टन पेट्रोलियम कोक निर्माण करते.

दिब्रुगड, गोहाटी इत्यादी शहरांजवळ रासायनिक द्रव्ये, सायकली, पॉलिथिन, कृत्रिम रबर, प्लॅस्टिक, इत्यादी उत्पादनाचे कारखाने आहेत.

**तेल—उद्योग**

आसाममधील तेल-उद्योग हा अत्यंत महत्त्वाचा व जुना असा उद्योग आहे. १८२८ साली एका ब्रिटिश अधिकाऱ्याला हत्तीच्या पायाला लागलेल्या तेलावरून तेलाचा शोध लागला, पण १८८९ साली दिग्बोई येथे पहिली तेल विहीर खोदण्यात आली. 'आसाम ऑईल कंपनी' हा उद्योग करू लागली. १९२१ साली या कंपनीची व्यवस्था 'बर्मा ऑईल कंपनी' कडे आली. १९३८–३९ साली अन्यत्रही तेलाचा शोध लागला आणि नाहरकाटिया, शिवसागर, मोरान, हुगरीजान इत्यादी ठिकाणीही हा उद्योग सुरू झाला.

१९५९ साली भारत सरकार आणि 'आसाम ऑईल कंपनी' यांच्या सहकार्याने 'ऑईल इंडिया लि.' ची स्थापना झाली व तेल उद्योगाचा बराच विकास करण्यात आला. दिग्बोई व्यतिरिक्त गोहाटी येथे व बिहारमधील बरौनी येथे तेल शुद्ध करण्याचे प्रचंड कारखाने काढण्यात आले आहेत.

दळणवळणासाठी सडका व रेल्वेमार्ग यांचाही विकास करण्यात आला आहे. तार-टपाल-रेडिओ यांचीही सोय आहे. प्रमुख ठिकाणी विमान-वाहतुकीची व्यवस्था आहे.

स्वातंत्र्यानंतर आरोग्य, समाजकल्याण, सहकार इत्यादी गोष्टींकडेही शासनाने लक्ष पुरविले आहे. शिक्षणाचाही खेडोपाडी प्रचार झाला आहे. १९४८ साली 'गोहाटी विद्यापीठाची' व १९६६ साली 'दिब्रुगड विद्यापीठाची स्थापना झाली. जोरहाट येथे शेतकी महाविद्यालय व अन्यत्र इंजिनिअरींग, आयुर्वेदिक, वैद्यकीय महाविद्यालये, व तांत्रिक शिक्षणाच्या शाळा निघालेल्या आहेत. सध्या आसाममध्ये ९४ महाविद्यालये आहेत. शिक्षणाचे क्षेत्र वाढते आहे.

सर्वांगीण विकासाच्या मार्गावरून आसाम वाटचाल करीत आहे.

□ □

# असमीया लोकसाहित्य

लोकसाहित्यामध्ये त्या प्रदेशातील लोकजीवनाचे प्रतिबिंब उमटलेले असते. त्या भागातील जाती-जमातींच्या चालीरीती, धर्मकल्पना, व्यवहार व सांस्कृतिक जीवनाची ओळख लोककथा, लोकगीते, लोकनृत्ये इत्यादी प्रकारांमधून यथार्थपणे होऊ शकते.

असमीया भाषेतील लोकसाहित्याचे भांडारही समृद्ध आहे. भारताच्या अन्य प्रदेशातील लोकसाहित्यात जे भाव आहेत त्याच्या काही छटा असमिया लोकसाहित्यातही दिसतात.

भारतामधील शेतकरी साधे भोळे जीवन जगतो. शेतात कष्ट करतो. त्याचे आपल्या शेतीवाडीवर व उद्योगधंद्यावर प्रेम असते. देवाधर्मावर अढळ श्रद्धा असते. हिंदीत त्याची तीव्र श्रद्धाळू भावना अशी व्यक्त झालेली आहे.

**" राखे हरि मारे कौन**
**मारे हरि राखे कौन "**

आसामी शेतकरी म्हणतो—

**" जिआए थके माने भाते आंतिबा**
**मरिले गाले आंतिबा "**

— जिवंत असेतोवर भात मिळेल, मेल्यावर जमिनीतला खड्डा मिळेल.

असमीया लोकगीते प्रामुख्याने ऋतू, शेतीवाडी, कामधंदा, लग्न समारंभ, रीतिरिवाज, धर्म, इतिहास व प्रेम भावनेच्या संदर्भात आहेत.

विवाह गीतामध्ये अशी थट्टामस्करीही असते—

**लोण आमलखी खाला ऐ कालीया लोण**
**आमलखी खाला ।**

**कोनोबा जन्मत तपस्या साधिला सीता**
**हेन सुंदरी पाला ।।**

—आवळा आणि मीठ खातोस, हे स्वार्थी, तू आवळा आणि मीठ खातोस. आमच्या सीतेसारखी सुंदरी मिळावी म्हणून मागच्या जन्मी तू निश्चित तपश्चर्या केली असावी; नाहीतर कुठे तू आणि कुठे आमची सीता ?

**" आतिकाई केनहर मूगारे माहुरा । "**

या गीतावरून मूगा नामक सोनेरी रेशमाची कताई-विणाई याचा आसामी जीवनाशी किती दृढ संबंध आहे याची कल्पना येते.

लहान मुलाला देवी आल्या म्हणजे शेजारपाजारच्या बायका जमतात व देवीला प्रसन्न करण्यासाठी ' आयनाम ' गीत गातात—

**" आय मूर् दुखियार् घरलोई**
**आयलोग आहिसे**
**दिबोलिया नाइकिया, एक मूर केसे सिंगी**
**पात्र मूँसि मय देहर् पारि दियें हाक् '**

—आई भगवती दयाळू होऊन माझ्या घरी आली आहे; परंतु तिला द्यायला माझ्याजवळ चांगले आसन नाही. पूजेची धड सामग्री नाही. कारण मी गरीब आहे. तेव्हा स्वतःच्याच शरीराच्या सिंहासनावर मी तिला स्थान दिले आहे आणि स्वतःच्या मस्तकावरील केसांनी मी तिची चरण-पूजा करीत आहे.

सृष्टी आणि प्रेमी यांची मोहिनी अशी व्यक्त झालेली आहे—

**पानीर जिकमिक पानीरे परुआ,**
**फुलर जिकमिक पाहि ।**
**सेनाई जिकमिक तेजरे बलते,**
**मुखट ऐ नुगुचे हाँहि ॥**

—पाण्याचे किडे पाण्यात चमकतात, फुलपाखरे फुलात चमकतात. माझा प्रियकर आपल्या तेजाने चमकतो, त्याच्या मुखावरचे हास्य कधीच मावळत नाही.

कितीतरी बालगीते लोकांच्या तोंडी परंपरेने आलेली आहेत. बाळ रडायला लागले म्हणजे आसामी आई त्याला असे अंगाई गीत गाऊन झोपवते—

**जोनबाई ए बेजी एति दिया ।**
**बेजीनो केलाइ ? मोना सीबलाइ ।**
**मोनानो केलाइ ? धान भराबलाइ ।**
**धान्नो केलाइ ? हाती किनिबलाइ ।**
**हातीनो केलाइ ? उथि फुरिबलाइ ।**
**उथि फुरिले की हे ? बर मानुह हे ।**
**बर मानुहे की करे ? गधूलिटे गधूलिटे**
**दबा कोब डुडुम डुम...।**

— जोनबाई, (या अंगाईगीतात 'जोन' म्हणजे चंद्राला बाळाची बहीण मानले आहे ) मला एक सुई दे. सुई कशाला ? एक थैली शिवायला. थैली कशाला ? रुपये भरायला. रुपये कशाला ? हत्ती घ्यायला. हत्ती कशाला ? पाठीवर बसायला. हत्तीवर बसायचे कशाला ? मोठा माणूस व्हायला. मोठा माणूस काय करतो ? संध्याकाळी डुडुम डुम ढोल वाजतो !

एक आई बागुलबुवा प्रमाणे भीती दाखवून कानखुवाला बोलावते व म्हणते—

**आरे कानखुवा, नाहिबी राती**
**दू यू कान काटी, तूर लगाय थूम साकी ।**

— अरे कानखुवा, तू येऊ नको रे ! माझ्या बाळाचे कान कापू नकोस. मी रात्रभर त्याच्या उशाशी दिवा लावून ठेवीन.

दुसरी एक आसामी माता बाळाला थोपटताना म्हणते आहे —

**टोपनी टोपनी हारली टोपनी**
**तोरे कले तलत घर ।**
**सकलो राइजर टोपनी आहिअे**
**मइनार चकूत घर ॥**

— गाई, गाई ( झोप ) दुबळ्या गाई, तुझे घर आहे केळीच्या खाली. सगळ्यांच्या डोळ्यातल्या झोपे, माझ्या बाळाच्या डोळ्यात येऊन बैस !

तिसरी आई म्हणते आहे —

**आमारे मइना शुब ए**
**बारीत बगरी रुब ए ।**

**बारीरे बगरी पकि सरिबो**
**मइनाई बुटलि खाबो ॥**

— माझा बाळ झोपून जाईल. बागेत बोर लावली जाईल. बोरं पिकली म्हणजे खाली पडतील, बाळ ती पटकन उचलून खाईल !

आपल्या बाळाचे आई आणखी असे कौतुक करत आहे—

**बापूकन घुनीया पाटरे चुरिया**
**मूरत हेंगुलिमा छाति ।**
**बाटर बाटरूबई रै रै सूधिछे**
**कोन विषयारे नाती ।**

बाळाला रेशमी झबले नी डोक्यावर रंगीत टोपी छान दिसते आहे. वाटेवरला वाटसरू थांबून विचारतो, ' कोण्या अधिकाऱ्याचा हा नातू आहे ? '

**असमिया म्हणी**

- ठेरो ठेरो करा, कथा साजि कोबा ।
  — अळम टळम करणे.
- चकुटो फुटा नाम है छे पद्मलोचन ।
  — फुटका डोळा नाव पद्मलोचन.
- बहिरेरं चँ भितरि कोवा भातुरी ।
  — मोठ्ठे दुकान नि सपक पक्वान्न.
- उरहर खं भगा ढारित तोंला ।
  — आपण हारली, सुनेला मारली.
- नाचित्र नाजाने चोतालखन हेरामगरिया ।
  — नाचायला येईना, अंगण वाकडे.

## असमिया लोककथा

### तेतोनची चलाखी

एके दिवशी दुपारच्यावेळी तेतोन एका शेताजवळून चालला होता. शेतात शेतकरी नांगर जोडून शेत नांगरीत होता. पण त्याचे बैल इतके म्हातारे झाले होते की, चाबकाचे फटके खाऊनही ते हलत नव्हते. हलले तर हळू चालत होते. शेतकरी कंटाळला. कुठंवर असले बैल हाकणार ? शेवटी रागारागाने म्हणाला,

" वाघ का खाईना या बैलाला! मरतही नाहीत. मेले तर नवीन जोडी तरी घेईन!"

तेतोनने हे ऐकले. तो ओरडून म्हणाला,

" काय झालं, बाबा?"

" अरे, कंटाळलो या बैलांना. एवढा हाकतोय, मारतोय, पण हलतच नाहीत. मी एक कोडीभर (वीस) रुपये जमवून ठेवलेत. पण हे मरतही नाहीत बेटे!"

" अरे बाबा, तळ्यातला चिखल फास त्यांच्या पाठीवर. चालतील भरभर." तेतोनने सल्ला दिला.

शेतकऱ्याने तळ्यातला चिखल आणला. बैलांच्या पाठीवर फासला. चिखलाच्या थंडाव्याने बैलांना बरे वाटले. ते भरभर नांगर ओढायला लागले.

थोड्या वेळाने इकडल्या तिकडल्या गप्पागोष्टी केल्यावर तेतोनने आपल्याला तहान लागल्याचा बहाणा केला. शेतातल्याच एका डबक्यातले घाण गढूळ पाणी ओंजळीत घेतले. शेतकरी म्हणाला,

" अरे, असले घाण पाणी कुठं पितात का माणसं?"

" बाबा, तहान फार लागली आहे. घशाला कोरड पडली आहे."

" मग माझ्या घरी जा. ते समोर माझंच घर आहे."

" मालकीण पाणी देईल का?"

" हां हां, का नाही देणार?"

तेतोन शेतकऱ्याच्या घरी गेला. म्हणाला,

" वहिनी, तुमच्या कारभाऱ्याने आत्ताच बैलाची जोडी खरेदी केली आहे, आणि जे कोडीभर रुपये ठेवले आहेत ते द्या!"

शेतकऱ्याच्या बायकोला काय करावे कळेना. एका अनोळखी माणसाला पैसे द्यायला तिचे मन तयार होईना. तेतोनने ओळखले. तो शेताकडे हात दाखवून पटकन् म्हणाला,

" बघा वहिनी! ती नवी पांढऱ्या रंगाची बैलजोडी. तुमची पहिली जोडी तांबड्या रंगाची होती ना!"

चिखल माखल्यामुळे तांबडे बैल पांढरे दिसत होते.

पांढरे बैल पाहूनही शेतकरीण जेव्हा पैसे देण्याचे चिन्ह दिसेना तेव्हा तेतोन

शेतकऱ्याकडे तोंड करून ओरडला—

" अरे बाबा, वहिनी देत नाहीत — "

ते ऐकून शेतकऱ्याने तिकडूनच ओरडून बायकोला सांगितले,

" अग तुला खाल्लं वाघानं. दे दे त्याला. का नाही देत ? "

एवढे झाल्यावर शेतकरणीने वीस रुपयातला एक रुपाया काढून ठेवला आणि बाकीचे रुपये तेतोनला दिले. रुपये हाती पडताच तेतोन लगबगीने पसार झाला.

संध्याकाळी दिवस मावळल्यावर शेतकरी घरी आला. हात पाय धुऊन जेवायला बसला. त्याला वाढता वाढता शेतकरीण खुदू खुदू हसत म्हणाली,

" मीच वस्ताद आहे चांगली ! "

" अरे वा ! आज भलतीच खुषीत दिसतेस तू ? काय झालं ग ? " शेतकऱ्याने विचारले.

" मी हुषारी करून कोडितला एक रुपाया वाचवला. "

" म्हणजे ? "

" एकोणीसच रुपये दिले त्याला. "

" कोणाला ? "

" त्या माणसाला. "

" कशासाठी ?

आणि मग शेतकरणीने सगळी हकिकत नवऱ्याला सांगितली. ती ऐकून शेतकरी चाटच पडला. जेवण अर्धेच टाकून उठला. तेतोनला शोधायला निघाला.

# संभाषण

असमिया भाषेतील काही प्रथम परिचयात्मक वाक्ये देवनागरीत येथे दिली आहेत. एखाद्या आसामी माणसाशी प्रारंभी बोलण्यासाठी आणि आसामीचाही अल्पसा परिचय होण्यासाठी यांचा उपयोग होईल.

| मराठी | असमिया |
|---|---|
| □ नमस्कार | — नमस्कार (नामॉश्कार् !) |
| □ आपले नाव काय ? | — आपोनार शुभनाम की ? |
| □ माझे नाव अमियाबाबू | — मोर नाम अमियाबाबू |
| □ आपले आडनाव काय ? | — आपोनार उपनाम कि ? |
| □ आपल्या वडिलांचे नाव काय ? | — आपोनार पिताकर नाम कि ? |
| □ आपण राहता कोठे ? | — आपुनि क'त थाके ? |
| □ मी गोहाटीत राहतो. | — आमि गौहाटीत थाको । |
| □ आपला पूर्ण पत्ता सांगा ! | — आपुनि निजर पूरा ठिकना कओक । |
| □ लिहून घ्या. | — लिखी लओक । |
| □ आपण कोठून येत आहात ? | — आपुनि कर परा आहि आछे ? |
| □ मी सरळ मुंबईहून येत आहे. | — मअि पोनेअि बोम्बाअिर परा आहि आछो । |
| □ आपण कोठे जाणार आहात ? | — अेतिया आपुनि कलै यात्र ? |
| □ मी आता नागपूरला जाईन. | — मअि अेतिया नागपुरलै याम । |
| □ तिथे आपले कोणी नातेवाईक आहेत ? | — आपोनार कोनोत्रा सम्पर्कीय तात आछि नेकी ? |

| | |
|---|---|
| ¤ माझ्या नात्यागोत्याची माणसे तिथे आहेत. | – मोर ओचर सम्पर्कीय लोक तात बहुत आछे। |
| ¤ तिथे माझे काही मित्रही आहेत. | – तान मोर केअिजनमान मित्र ओ आछे। |
| ¤ ठीक | – ठिक है। |
| ¤ तुमची प्रकृती कशी आहे? | – तोमार अबस्था केने कुवा? |
| ¤ माझी प्रकृती ठीक आहे. | – मोर अबस्था भाल। |
| ¤ ओ हो! या बसा. | – ओ! आहक, बहक! |
| ¤ इथून बाजार किती दूर आहे? | – इयार परा बजारलै किमान दूर? |
| ¤ बराच दूर आहे. | – बहुत दूरं आछे। |
| ¤ अगदी जवळ आहे. | – निचेइ उचरते। |
| ¤ गव्हाचा काय भाव आहे? | – घें हुर दाम की? |
| ¤ सव्वा रुपया शेर. | – सेरे पाँच शिकि। |
| ¤ चार शेर द्या. | – चारि सेर दियाँ |
| ¤ किती पैसे झाले? | – दाम किमान हल? |
| ¤ माझ्याजवळ मोड नाही. | – मोर ओछरत भाङनी नाइ। |
| ¤ ह्या शहराचे नाव काय आहे? | – एइ नगरखनर नाम कि? |
| ¤ ह्या शहराचे नाव दिग्बोई. | – एइ नगरखनर नाम दिग्बोई। |
| ¤ ही वस्तु कुठे मिळेल? | – एइ बस्तुटो कत पोवा जाय? |
| ¤ काय काम आहे? | – कि काम् आछे? |
| ¤ तुमचे शिक्षण किती झाले आहे? | – आपुनि किमान लैके पढिछे? |
| ¤ मी पदवीधर आहे. | – मइ ग्रेज्युएट आछो। |
| ¤ चहा घ्या. | – चाह खोवा। |

# आसाम – गीत

ओ मोर आपोनार देश
ओ मोर चिकुणी देश
एनेखन शुबला, एनेखन सुफला
एनेखन मरमर देश ।
ओ मोर सुरीया मात
असमर शुबदी मात
पृथिवीन् कतो विचारि नोपोवा
जनम टो करिलेड पात ।
ओ मोर ओपजा ठाई
ओ मोर असमी आई
साइलेउँ एबार मुखनि तोमार
हे पाँह मोर पलोवा नाइ ।

— लक्ष्मीनाथ बेजबरुआ

— हे माझ्या देशा, हे माझ्या प्रियतम देशा ! किती सुंदर ! किती फळा–फुलांनी युक्त हा देश ! माझा प्रियतम देश !

ही माझी सुस्वर भाषा ! ही माझी सुमधुर भाषा ! संपूर्ण पृथ्वीवर शोधूनही अशी भाषा कुठे आढळणार नाही, सगळा जन्म शोधण्यात घालवला तरी मिळणार नाही. हे माझ्या जन्मभूमी, हे माझ्या असमिया आई ! एकवार तुझे मुख मी पुन्हा पाहतो, पण तुझ्या दर्शनाची आस पूर्ण होतच नाही.

१२००५
ठाणे.

□ □

REFBK-0019005

REFBK-0019005


भारत
अफगानिस्तान
पाकिस्तान
तिब्बत
पंजाब
राजस्थान
उत्तर प्रदेश
बिहार
सिक्किम
भूटान
मणिपुर
त्रिपुरा
ब्रह्मदेश
गुजरात
मध्य प्रदेश
उड़ीसा
महाराष्ट्र
हैदराबाद
आंध्र प्रदेश
मैसूर
मद्रास

# आसाम

